सदैव आपल्या वाचकांसोबत | भाद्रपद कृ. ११ | पृष्ठ : १४ | मूल्य : रु. ५.०० मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, अकोला, छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, जळगाव येथून एकाच वेळी प्रकाशित

पत्रसमूह संस्थापक : स्व. श्री. रामगोपाल माहेश्वरी

# नवराष्ट्र

नवभारत पत्रसमूहाचे मराठी वृत्तपत्र

मुंबई, रविवार, २९ सप्टेंबर २०२४ | www.navarashtra.com | /navarashtra



दिग्दर्शकाचे कौतुक म्हणजे अचूक निरीक्षण

आतील पानावर



कुणी घर देता का घर

आतील पानावर




### पुरस्काराच्या रकमेत तिप्पट वाढ, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची उपस्थिती

# कृषी पुरस्कारांचे आज वितरण

**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. राज्यस्तरीय कृषी पुरस्काराचे वितरण रविवार, २९ सप्टेंबर रोजी करण्यात येणार आहेत. राज्यातील कृषी विभागातर्फे देण्यात येणाऱ्या मागील तीन वर्षाच्या कृषी पुरस्काराचे वितरण याप्रसंगी होणार आहेत. कृषी पुरस्कारांच्या रकमेत तिप्पट वाढ केल्यानंतर होणारा हा पहिलाच कृषी पुरस्कार वितरण सोहळा आहे. कृषी पुरस्कारांची रक्कम याआधीच शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली असून मुंबईत प्रातिनिधिक स्वरूपात राज्यपाल सी.पी. यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येणार असल्याची माहिती कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

मुंबई येथील नॅशनल स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया (डोम) वरळी येथे आयोजित करण्यात आला. कोविड तसेच विविध कारणांमुळे प्रलंबित असलेले राज्यातील सन २०२०, २०२१ व २०२२ या तीन वर्षातील एकूण ४४८ पुरस्कार राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते वितरित करण्यात येणार आहेत.

राज्यातील शेती, उद्यान आणि कृषिसंलग्न क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना दरवर्षी राज्य सरकार मार्फत डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, कृषिभूषण पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र, युवा शेतकरी, उद्यानपंडित, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी (सर्वसाधारण गट), वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी (आदिवासी), पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न आणि उत्कृष्ट कृषी शास्त्रज्ञ पुरस्कार असे २०९ पुरस्कार प्रतिवर्षी देण्यात येतात.



### शेतकऱ्यांचा राज्यपालांच्या हस्ते सपत्नीक सत्कार

राज्यात कृषि, कृषि संलग्न क्षेत्र तसेच फलोत्पादन क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना विविध पुरस्कार शासना मार्फत जाहीर झाले असून शेतकऱ्यांचा सपत्नीक राज्यपाल यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार होता. मात्र मागील सहा महिन्यांनंतरही पुरस्कार वितरणाचा मुहूर्त लागत नव्हता. मात्र आता २९ सप्टेंबर रोजी कृषी पुरस्काराचे वितरण होणार आहे.

### काही पुरस्कारार्थींच्या खात्यावर अर्धीच रक्कम जमा

कृषी पुरस्कार सन २०२० व २०२१या वर्षातील बक्षिसाची रक्कम वितरित करण्याबाबत शासन स्तरावरील शासन निर्णयानुसार हा निधी बीडीएस प्रणालीवर वितरित करण्यात आला आहे. मात्र काही पुरस्कारार्थी यांच्या खात्यावर निम्मीच रक्कम जमा झाल्याचे समजते.

### दोन वर्षांच्या पुरस्कारांचे होणार रविवारी वितरण

- गेल्या दोन वर्षांचे पुरस्कार जाहीर झाले. मात्र या पुरस्काराचे वितरण करण्यात आलेले नाही. याआधी कृषिरत्न पुरस्कारासाठी ७५ हजार, कृषिभूषणसाठी प्रत्येकी ५० हजार, शेतीमित्र आणि युवा शेतकरी पुरस्कारासाठी प्रत्येकी ३० हजार, शेतीनिष्ठ पुरस्कारासाठी प्रत्येकी ११ हजार रुपयांचे बक्षीस देण्यात येत होते.
- मात्र महाविकास आघाडी सरकारच्या काळात कृषिमंत्री दादा भुसे यांच्या काळात झालेल्या कृषी पुरस्कार सोहळ्यात तत्कालीन अर्थमंत्री अजित पवार यांनी या पुरस्कारांची रक्कम तिप्पट करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार रक्कम खात्यावर जमा झालेली आहे.

# चींगम राऊत यांनी सिंघम देवेंद्रजींची चिंता करू नये

## आमदार प्रवीण दरेकर यांनी उडवली खिल्ली

**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. 'चींगम' संजय राऊत यांनी 'सिंघम' देवेंद्रजींची चिंता करू नये, अशा शब्दात भाजप आमदार प्रवीण दरेकर यांनी उबाठा शिवसेना खासदार संजय राऊत यांची खिल्ली उडविली.

बदलापूरच्या शाळेतील चिमुकल्या मुलींवर अत्याचार केल्याचा आरोप असलेला अक्षय शिंदे याचे पोलिसांनी एन्काऊंटर केल्यावरून सामनाच्या अग्रलेखातून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधण्यात आला. सिंघम मुख्यमंत्री अशी त्यांची खिल्ली उडवत फडणवीसांवर टीका करण्यात आली. यावर 'एक्स' हॅण्डलवर प्रवीण दरेकर यांनी एक पोस्ट करत राऊत यांना सुनावलं आहे. महाराष्ट्रातील स्वयंघोषित चघळून चोथा झालेल्या 'चिंगम' संजय राऊत यांनी 'सिंघम' देवेंद्र फडणवीस यांची चिंता करू नये. देवेंद्रजींबद्दल अग्रलेख लिहून टीका करणं म्हणजे सूर्यावर थुंकण्याचा प्रयत्न आहे, पण ही थुंकी संजय राऊत यांच्याच तोंडावर पडली आहे. ज्यांनी आयुष्यभर 'चमचेगिरी' केली त्या संजय राऊत यांना धर्मवीरची पटकथा काय कळणार? धर्मवीरची पटकथा लिहिणं आणि सामनाच्या अग्रलेखातून 'चमचेगिरी' करणं यात फरक असतो." असे दरेकर म्हणाले.

### तुमचे चक्रव्यूह भेदण्यासाठी ते सक्षम



'देवेंद्र फडणवीस हे आधुनिक अभिमन्यू आहेत. तुमच्यासारख्या कितीही कपटी 'शकुनी'नी त्यांना घेरलं तरी तुमचं 'चक्रव्यूह' भेदण्यासाठी ते सक्षम आहेत. त्यामुळे तुम्ही देवेंद्रजींच्या चित्रपटाची काळजी करू नका. देवेंद्रजी फडणवीस जी पटकथा लिहितील तो चित्रपट सुपरहिट होईलच. पण त्यापूर्वी पत्राचाळीत मराठी माणसांची घरं तुम्ही हडप केली. त्यावर 'पत्राचाळीचा लुटारू राऊत' या चित्रपटाची पटकथा कशी वाटेल? याचा विचार करा, असे प्रवीण दरेकर म्हणाले.

# धारावी शिवसेनेने लढावी!

## संजय राऊत यांच्या विधानाने मविआत वादाची शक्यता

**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. धारावीतून विधानसभा निवडणूक शिवसेनेने लढवावी, अशी तेथील नागरिकांची इच्छा असून हा बाब उद्धव ठाकरे आणि काँग्रेसच्या निदर्शनास आणू, असे विधान उबाठा शिवसेना खासदार संजय राऊत यांनी केले. त्यांच्या या विधानामुळे महा विकास आघाडीत वाद होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

धारावी बचाव आंदोलनाचे नेते शनिवारी संजय राऊत यांना भेटले. यावरही संजय राऊत यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. राजू कोरडेंसह धारावीचे पदाधिकारी आम्हाला भेटले. धारावीची विधानसभा शिवसेनेने लढावी अशी त्यांची मागणी आहे. कारण हे आंदोलन शिवसेनेने जिवंत ठेवले आहे. आंदोलनाचे नेतृत्व शिवसेना करत आहे. त्यामुळे धारावीची विधानसभा शिवसेनेने लढावी अशी विनंती धारावी बचाव कृती समितीचे लोक करत आहेत. ते वारंवार आम्हाला भेटत आहेत. आज पुन्हा ते माझ्याकडे आले. त्यांची जी भूमिका आहे ती उद्धव ठाकरे आणि काँग्रेस हायकमांडच्या कानावरही घालू, असे राऊत म्हणाले.

### हा मतदार संघ सध्या आहे काँग्रेसकडे

दरम्यान, महाविकास आघाडीत धारावी मतदारसंघ काँग्रेसकडे आहे. धारावीतून वर्षा गायकवाड सातत्याने निवडणूक येत आहेत. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्या मुंबई उत्तर मध्य मतदारसंघातून निवडून आल्या असल्या तरी हा मतदारसंघ काँग्रेसकडे आहे. त्यामुळे संजय राऊत यांच्या नव्या भूमिकेमुळे आघाडीत वाद होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## मंदिरे, महत्वाची ठिकाणे अलर्टवर

**मुंबई,** (वा.) केंद्रीय गुप्तचर संस्थांकडून हाय अलर्ट देण्यात आला आहे. सणासुदीचे दिवस आणि आगामी निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील मंदिरे आणि इतर महत्वाच्या ठिकाणांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. मुंबईतील प्रभादेवी येथील सिद्धिविनायक मंदिर, जुहूतील इस्कॉन मंदिर आदी मंदिरात सुरक्षा वाढविली आहे. मुंबईत नुकताच गणपती उत्सव उत्साहात आणि सुरक्षितरित्या पार पडला आहे. आता मुंबईत नवरात्रोत्सव सुरु होणार आहेत. त्यानंतर दसरा आणि दिवाळी असा सणासुदीच्या माहोल असणार आहेत. या पार्श्वभूमीवर हायअलर्ट आल्याने अनेक ठिकाणी पोलिसांनी मॉकड्रील देखील केली आहे. मुंबईतील महत्वाच्या ठिकाणी पोलिसांची गस्त वाढविण्यात आली असून सर्व यंत्रणांना सतर्क राहण्यासाठी सांगण्यात आले आहे.

### वाद ● आनंद दिघे यांचे पुतणे आणि उबाठाचे पदाधिकारी केदार दिघे यांचे आवाहन

# धर्मवीर-२ सिनेमा नागरिकांनी बघू नये

**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. धर्मवीर-२ सिनेमा बघू नका, कारण त्यात सर्व गोष्टी काल्पनिक दाखविल्या आहेत, असे आवाहन आनंद दिघे यांचे पुतणे आणि शिवसेनेचे पदाधिकारी केदार दिघे यांनी केले आहे.

धर्मवीरच्या यशानंतर आता धर्मवीर-२ हा सिनेमा प्रदर्शित आहे. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी हा सिनेमा अत्यंत बकवास आणि बोगस असल्याचे म्हटले आहे. या सिनेमातील सर्व गोष्टी काल्पनिक असल्याची टीकाही संजय राऊत यांनी केली आहे. आता आनंद दिघे यांचे पुतणे केदार दिघे यांनीच एक्स हँडलवर पोस्ट करून हा सिनेमा पाहू नका, असे आवाहन केले आहे. स्वतःच्या फायद्यासाठी काढला भाग २ केदार दिघे म्हणाले, एकनाथ शिंदे यांच्या स्वप्नात दिघे साहेब येतात, असं काल्पनिक चित्र रंगून स्वतःच्या फायद्यासाठी धर्मवीर २ चित्रपट काढला गेला. दिघे साहेब स्वप्नात येऊन शिवसेना पक्ष चोर असे कधीच सांगणार नाहीत. या चित्रपटात दिघे साहेबांच्या प्रतिमेचा गैरवापर शिंदेनी केला आहे. ठाणेकर त्यांना माफ करणार नाहीत. आनंद दिघे आमच्या स्वप्नात येतात खरे तर जेव्हापासून यांनी गद्दारी केली आहे, तेव्हापासून दिघे साहेब आमच्या स्वप्नात येऊन सांगतात. शिंदे गटाला ठाण्यातून नेस्तनाबूत करा,...आमच्याकडे धनसंपत्तीची कमतरता आहे. परंतु ठाण्यातील निष्ठावंत शिवसैनिक सोबत आहेत!, असं केदार दिघे यांनी म्हटले आहे.

### गद्दारी कशी योग्य आहे हे दाखवण्याची प्रयत्न

- अडीच वर्षांपूर्वी मविआत जाऊन मी चुकलो होतो आणि आता मी योग्य मार्गावर आहे. मग आता योग्य मार्गावर चालताना अजित पवारांना मंत्रिमंडळात अर्थमंत्री केलेलं चालतं? हे हिंदुत्व आहे?, असा सवाल दिघे यांनी केला आहे.
- दिघे साहेबांचा पुतण्या म्हणून मी तमाम शिवसैनिक आणि जनतेला आवाहन करतो की, हा चित्रपट पाहू नये. या दिघे साहेबांच्या जीवनावर काहीही नसून फक्त एकनाथ शिंदे यांची गद्दारी कशी योग्य हे दाखवण्याचा प्रयत्न आहे, असे त्यांनी म्हटले आहे.




# कर्दे गावाला सर्वोत्कृष्ट पर्यटन गाव पुरस्कार

## पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी केले अभिनंदन

**मुंबई,** (वा.) महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील कर्दे गावाला कृषी पर्यटन श्रेणीत सर्वोत्कृष्ट पर्यटन गाव पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला आहे. भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने जागतिक पर्यटन दिनानिमित्त या प्रतिष्ठित पुरस्काराची घोषणा केली होती. पर्यटन संचालनालयाचे सह संचालक स्वप्निल कापडणीस,सरपंच सचिन तोडणकर, उपसरपंच दत्ताराम भुवड, कृषी अधिकारी सुनील खरात यांनी हा पुरस्कार दिल्ली येथे स्वीकारला. या स्पर्धेत यश मिळवल्याबद्दल पर्यटन मंत्री गिरीश महाजन, पर्यटन सचिव जयश्री भोज, पर्यटन संचालक डॉ.बी. एन. पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

या स्पर्धेत सहभागी झालेल्या ३० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील ९९१ गावांपैकी आठ वेगवेगळ्या श्रेणींमध्ये ३६ गावांची विजेते म्हणून निवड करण्यात आली होती. महाराष्ट्रातील १२६ ग्रामपंचायतीने यामध्ये सहभाग घेतला होता. स्थानिक अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या कृषी पर्यटनाला चालना देण्याच्या प्रयत्नांसाठी कर्दे गावाला मान्यता मिळाली.



### राज्याच्या पर्यटनाला मिळेल चालना

रत्नागिरीच्या किनारपट्टीवर वसलेले कर्दे हे गाव स्वच्छ समुद्रकिनारे, पांढरी वाळू आणि नयनरम्य परिसर यामुळे पर्यटकांना आकर्षित करत आहे. हा पुरस्कार महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे आणि यामुळे राज्याच्या पर्यटन विकासाला चालना मिळेल अशी अपेक्षा आहे.

शाश्वत पर्यटनाला चालना देण्याच्या गावाच्या प्रयत्नांची आणि स्थानिक पर्यावरण आणि संस्कृती जतन करण्याच्या त्याच्या वचनबद्धतेची मान्यता म्हणून हा पुरस्कार दिला जातो.

## ..म्हणून गडबड करता आली नाही

**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. मुंबई विद्यापीठाच्या सिनेटची निवडणूक बॅलेटवर झाली, म्हणून गडबड करता आली नाही, अशी प्रतिक्रिया ठाकरे गटाचे शिवसेना खासदार संजय राऊत यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.

मुंबई विद्यापीठाच्या सिनेटच्या निवडणुकीत १० पैकी १० जागा जिंकत आदित्य ठाकरेंच्या युवा सेनेने दणदणीत विजय संपादन केला आहे. विधानपरिषदेच्या पदवीधर मतदार संघात शिवसेनेचा विजय झाला होता आणि आता सिनेटमध्ये देखील आम्हाला यश मिळाले आहे. ईव्हीएमवर निवडणूक घेण्याची एबीव्हीपीच्या सर्व उमेदवाराची मागणी होती, पण बॅलेटवर मतदान झाले. त्यामुळे काही गडबड करता आली नाही. सुशिक्षित मतदारांनी युवासेना पर्यायाने शिवसेनेच्या बाजूने मतदान केल्याचे संजय राऊत म्हणाले. राज्यसरकार आणि भाजप आधी हे निवडणूकाच होऊ देत नव्हते. परंतू कोर्टाचा दट्टया बसला. नंतर यांना नाईलाजाने निवडणूक घ्यावी लागली. त्यात युवासेनेचे नेतृत्व आदित्य ठाकरे यांच्यावर पदवीधर सुशिक्षित मतदारांनी विश्वास दाखवला आहे.

# आयपीएस अधिकारी त्रिपाठींविरोधात पोलिसांकडे पुरावे आहेत का?

**मुंबई,** (वा.) आयपीएस अधिकारी सौरभ त्रिपाठीसह त्यांचा मेहुणा आणि विक्रीकर सहाय्यक आयुक्त आशुतोष मिश्रा यांच्याविरोधात कथित खंडणीसंदर्भात काही पुरावे आहेत का?, अशी विचारणा उच्च न्यायालयाने पोलीस प्रशासनाकडे केली असून त्याबाबत भूमिका स्पष्ट करण्याचेही आदेश दिले आहेत.

त्रिपाठीसह आशुतोष मिश्रा यांनी त्यांच्याविरुद्ध दाखल केलेला गुन्हा रद्द करावा, यासाठी न्यायालयात धाव घेतली आहे. त्या याचिकेवर न्या. अजय गडकरी आणि न्या. डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. तेव्हा, अंगाडिया खंडणीप्रकरणी दोन्ही याचिकाकर्त्यांविरोधात पोलिसांकडे ठोस पुरावे आहेत का?, तसेच त्यांच्याविरोधात याप्रकरणी आरोपपत्र दाखल करण्यात येणार आहे का? अशी विचारणी खंडपीठाने केली. त्यासंदर्भात ४ ऑक्टोबरपर्यंत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले.तत्पूर्वी, अंगाडिया कथित खंडणीप्रकरणी दाखल गुन्ह्यामध्ये त्रिपाठींचे नाव नाही, त्यांना अटकपूर्व जामीनही मिळाला आहे. योग्य रीतीने प्रकरणावर देखरेख ठेवली नाही, असा एकच आरोप त्यांच्यावर आहे. तसेच या प्रकरणात आरोपपत्र अद्याप दाखल झालेले नाही, असा दावा त्रिपाठींच्या वतीने अँड. संजीव कदम यांनी केला.

### काय आहे प्रकरण

डिसेंबर २०२१ रोजी अंगाडिया असोसिएशनने मुंबईचे तत्कालीन पोलीस आयुक्त हेमंत नागराळे यांच्याकडे डीसीपी त्रिपाठी यांनी व्यवसाय सुस्थितीत सुरू ठेवण्यासाठी मासिक १० लाखांची मागणी केल्याचा आरोप केले. नागराळे यांनी या आरोपांच्या चौकशीसाठी दक्षिण विभागाचे अतिरिक्त आयुक्त दिलीप सावंत यांची नियुक्ती केली. झोन २ मधील पोलीस निरीक्षक ओम वांगटे, एपीआय नितीन कदम आणि पीएसआय समाधान जमदाडे यांची चौकशी करण्यात आली.

## शरद पवार, उद्धव ठाकरेंमुळे त्याचे पक्ष फुटले : फडणवीस

**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. शरद पवार आणि उध्दव ठाकरे यांना त्यांच्या वारसांकडे सर्वकाही द्यायचे होते, म्हणून त्यांचे पक्ष फुटले. यासाठी पवार ठाकरेच जबाबदार आहेत, असा दावा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

फडणवीस यांनी खाजगी वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेल्या फुटी बद्दल भाष्य केले.

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडायला भाजप आणि आरएसएसचा हात आहे. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना हे दोन पक्ष सत्तेच्या लढाईमुळे फुटले आहेत. आपल्या मुलाला, मुलीला पक्षाचा वारसा द्यायचा आहे या महत्वाकांक्षेने त्यांचा घात केला, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. शरद पवारांचा पक्ष आम्ही फोडू शकतो का? ज्यांनी आयुष्यभर लोकांचे पक्ष फोडले त्यांचा पक्ष भाजपा कशी काय फोडू शकते? शरद पवारांचा पक्ष त्यांनीच फोडला. कारण नैसर्गिकदृष्ट्या त्यांचा वारसा त्यांनी इतक्या वर्षांपासून अजित पवारांकडे दिला होता, असे ते म्हणाले.

### # QUICK NEWS

## मित्रपक्षांना भाजपकडून सन्मानाची वागणूक

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क : केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक गॅस समितीच्या अध्यक्षपदी माझी नियुक्ती करण्यात आली असून यावरून भाजपकडून मित्रपक्षांना सन्मानाची वागणूक दिली जात असल्याचे सिद्ध होते, असे मत राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी व्यक्त केले. महायुतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे महत्व कमी झाल्याच्या कपोलकल्पित बातम्या गेले काही दिवस आमच्या हितचिंतकांनी देण्याचा प्रयत्न केला. मात्र भाजप आपल्या मित्रपक्षांना सन्मानपूर्वक वागणूक देतो त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे माझी केंद्रीय समितीवर नियुक्ती करण्यात आली हे आहे, असे प्रसार माध्यमांशी बोलताना सुनील तटकरे यांनी सांगितले.

# 'बाप से पहले, बेटेसे तो निपटले!'

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचे एकनाथ शिंदे, भाजपला आव्हान

**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. 'बाप को हात लगानेसे पहले, बेटेसे तो निपटले,' अशा शब्दात शिवसेना नेते विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपला आव्हान दिले.

मुंबई विद्यापीठाच्या सिनेटच्या निवडणुकीत १० पैकी १० जागा जिंकत आदित्य ठाकरेंच्या युवा सेनेने दणदणीत विजय संपादन केला आहे.

यावर ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे तसेच अयोध्या पौळ यांनीही एक्स हँडलवर पोस्ट शेअर करत विरोधकांना डिवचले. 'अगोदर पोराशी निपटा.. बापाचा विषय तुमच्या बसचा नाही! 'असे म्हणत या नेत्यांनी विरोधकांवर निशाणा साधला.



अब्दालीच्या फौजदारांनो, वाघाचे पट्टे अंगावर पेंट करून हिंडणाऱ्या लांडग्यानो.. अगोदर पोराशी निपटा.. बापाचा विषय तुमच्या बसचा नाही! आता करत बसा.. 'नरेटिव्ह.. नरेटिव्ह..' अशी खरमरीत टीका दानवे यांनी केली. शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या अयोध्या पोळ यांनीही 'एक्स' वर एक व्हिडीओ शेअर करत विरोधकांवर निशाणा साधला. ' बाप को हात लगानेसे पहले बेटेसे तो निपटले. हा तर फक्त ट्रेलर होता, विधानसभेच्या २८८ जागांचा, खासकरून गद्दारांच्या जागेवर जो निकाल लागेल, तो पिक्चर महाराष्ट्र अजून पाहणार आहे ' अशा शब्दांत अयोध्या पौळ यांनी शिंदे गटाला डिवचले.

## मी राजकारण सोडणार होतो : राज

**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. त्या वेळच्या राजकीय पक्षातील राजकारणाचा कंटाळा आल्याने मी राजकारण सोडणार होतो, असा गौप्यस्फोट मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उबाठा शिवसेनेचे नाव न घेता केला. राज ठाकरे यांनी 'एक नंबर' या चित्रपटाच्या ट्रेलर लॉन्चिंग कार्यक्रमाला हजेरी लावली. यावेळी ते बोलत होते.

राज ठाकरे म्हणाले, मी २००० साली एका वेगळ्या पक्षात होतो, त्यावेळेला त्या पक्षात जे काही राजकारण सुरु होते त्याला कंटाळून मी एक रिव्हर्सचा गियर टाकला होता. मला असे वाटत होतं की, नको ते राजकारण. मला त्या राजकारणात जायचंच नाही. माझी तशी इच्छाच नाही. मला असले गोंधळही घालायचे नव्हते, असे ते म्हणाले.

# मेट्रो ५ ठाणे-भिवंडीचा महत्वाचा टप्पा पूर्ण

**मुंबई,** (वा.) उच्च क्षमतेच्या क्रेन वापरून - ५७.५ मिटर आणि ४६.०० मिटर या दोन विशेष स्पॅनच्या यशस्वी उभारणीसह सध्या सुरू असलेल्या मेट्रो लाईन-५ ठाणे - भिवंडी प्रकल्पातील एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. हे दोन्ही गर्डर उभारण्याचे काम जटिल होते. त्यासाठी अभियांत्रिकी कौशल्य आणि अचूकता आवश्यक होती, यासह हे काम आव्हानात्मक होते. केवळ वाहतुकीच्या व्यस्त रस्त्याच्या मधोमधच गर्डर उभारणी एवढेच त्याचे स्वरुप नव्हते तर माजोवाडा फ्लायओव्हरच्या अगदी वर, दाट लोकवस्तीच्या निवासी भागात हे काम यशस्वीपणे पूर्णत्वास नेण्यात आले. सर्व सुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन करून, स्थानिक नियमांचे पालन करून व्यापक खबरदारी घेत हे काम करण्यात आले. स्थानिक प्राधिकरणांच्या मंजुरी आणि समर्थनामुळे वाहतूक व्यत्यय कमी करून, टीमने रात्रीच्या वेळी केवळ ५ तासांत ऑपरेशन अखंडपणे पार पाडले.

पिअर १०-११ दरम्यानच्या ५७.५० मीटर अंतरासाठी, घोडबंदर रोडवर २९० मेट्रिक टन वजनाच्या गर्डर्सचे टँडम लिफ्टिंग करण्यात आले. त्याचप्रमाणे, ठाणे - भिवंडी रस्त्यावरील ४६.०० मीटरचा स्पॅन २० मीटर क्रेन त्रिज्यामुळे सुपर - लिफ्ट व्यवस्था वापरून पूर्ण करण्यात आला.

### कोर्टकचेरी • दोन समुदायांत तेढ निर्माण होईल असे भाष्य केल्याचा व्हिडिओ आल्याचा दावा

# मुख्यमंत्र्यांसह नितेशविरुद्ध गुन्हा दाखल करा

**मुंबई,** (वा.) मुस्लिमविरोधी वक्तव्य करून दोन समुदायांत तेढ निर्माण केल्याप्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आमदार नितेश राणे यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश द्या, अशी मागणी करणारी याचिका उच्च न्यायालयात करण्यात आली आहे. या याचिकेवर लवकरच सुनावणी होण्याची शक्यता आहे.

संत महंत रामगिरी महाराज यांनी प्रेषित मोहम्मद यांच्याबद्दल अपमानास्पद टिप्पणी केल्याचा व्हिडिओसमोर आल्याचा दावा याचिकाकर्ते वकील मोहम्मद वासी यांनी याचिकेतून केला असून एका जाहीर सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आमदार नितेश राणे यांनी महंत रामगिरी महाराजांच्या भाषणांचे, टिपण्णीचे समर्थन केले.

### काय आहे याचिकेत दावा

- महाराष्ट्रातील जवळपास सर्वच ३६ जिल्ह्यांमध्ये साल २०२२ पासून किमान ५० 'हिंदू जन आक्रोश मोर्चा' रॅली काढण्यात आल्या आहेत, त्यापैकी बहुतेक रॅलींचे गोव्यातील हिंदू जनजागृती समिती नावाच्या कट्टरपंथी स्वयंसेवी संस्थेने गूढपणे आयोजित केल्याचा दावा याचिकेतून केला आहे.



- यातील प्रत्येक रॅलीचा कार्यक्रम ठरलेला असून त्यामध्ये खुल्या गाड्यांमधून नेते मंडळी अथवा रॅली काढणारी व्यक्ती फिरते. लाउडस्पीकर आणि डीजेच्या सहाय्याने भगवे झेंडे आणि टोप्यांच्या परिधान केलेला जनसमुदाय यात सहभागी होतो, असे चित्र प्रत्येक शहरात पाहायला मिळाले आहे.

### अल्पसंख्याकावर शाब्दीक हल्ले

- व्यासपीठावरील वक्ते अल्पसंख्याक, मुस्लिम आणि वक्फ मंडळावर शाब्दिक हल्ला करतात, लव्ह जिहाद, हलाल,मुस्लिम दुकानांवर बहिष्कार टाका, बाजार जिहाद, जमीन जिहाद, ‍जबरदस्तीचे धर्मांतर आणि मुस्लिम समुदायावर आर्थिक बहिष्कार टाकण्याचे आवाहन करतात. असे वृत्तपत्रांमध्येही छापून आले आहे.
- त्यासोबतच समाज माध्यमांचाही मुस्लिमविरोधी भाषणं अथवा वक्तव्यांसाठी वापर केला जातो, त्यातून निधी गोळा होतोच परंतु, त्यासोबतच राजकीय पोळीही शिजली जाते, असा दावाही याचिकेतून करण्यात आला आहे.
- त्यामुळे अशा मुस्लिमविरोधी वक्तव्यांना रोखण्याचे तसेच दोन समुदायांत तेढ निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणीही याचिकेत केली आहे.

# आनंद दिघेंना मारलं गेलंय

## संजय शिरसाट यांचा खळबळजनक दावा

**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क शिवसेनेचे माजी ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांना मारले गेले, हे संपूर्ण ठाणे जिल्ह्याला माहीत माहिती आहे, असा खळबळ जनक दावा शिवसेना शिंदे गटाचे प्रवक्ते आमदार संजय शिरसाट यांनी केला. यावर पुरावे घेऊन या, मी कोर्टाची पायरी चढायला तयार आहे असे प्रत्युत्तर आनंद दिघे यांचे पुतणे आणि ठाकरे गटाचे नेते केदार दिघे यांनी शिरसाट यांना दिले.

खाजगी वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत संजय शिरसाट म्हणाले, मी दिघेसाहेबांच्या अपघाताच्या दिवसांपासून अनेक बाबी अनुभवलेल्या आहेत. अपघातानंतरची परिस्थिती मी पाहिली आहे. दिघेंच्या डोक्याला मार लागला नव्हता. त्यांना जिथे मार लागला होता त्यामुळे मृत्यू होण्याचे कारण नव्हते. मग डिस्चार्ज दिल्यानंतर त्यांना हार्टअटॅक कसा आला? त्यामुळे ठाण्यातील लोक म्हणतात की दिघे साहेबांना मारले गेले. दिघे साहेबांचा घात झाला. आनंद दिघे यांच्या मृत्यूबाबत वेगवेगळ्या स्टोरीज आहेत. त्यांना कोणते इंजेक्शन दिले होते की त्यामुळे हृदयात फुगा तयार झाला आणि अटॅक आला. त्यामुळे हार्टवर परिणाम होऊन त्यांचा मृत्यू झाल्याचे अनेकांचे म्हणणं आहे. परंतु, त्या काळात या प्रकरणाची चौकशी व्हायला हवी होती ती झाली नाही.

### ...त्याची चौकशी झालीच पाहीजे

आनंद दिघेंना कोणी मारले असेल? असे त्यांना विचारले असता ते म्हणाले, "या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. यासंदर्भात माझ्याकडे पुरावे नाहीत. मी कुणावर थेट आरोप करू शकत नाही. साक्षीदार कधीतरी बाहेर येतील, असे शिरसाट म्हणाले.

### केदार दिघे यांचे प्रत्युत्तर

संजय शिरसाट २३ वर्षे काय करत होते? तुम्ही आज म्हणत आहात की दिघेसाहेबांचा घात झाला आणि संपूर्ण ठाण्याला माहित आहे. याचा अर्थ तुम्हा नेत्यांना याबाबतची माहिती असेल. मग तुम्ही तोंड गप्प करून का बसला होता? तुमचा स्वार्थ काय होता? तुम्ही पुरावे घेऊन या दिघे साहेबांचा पुतण्या म्हणून मी कोर्टाची पायरी देखील चढायला तयार आहे, असे प्रत्युत्तर केदार दिघे यांनी दिले.

सदैव आपल्या वाचकांसोबत |

मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, अकोला, छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, जळगाव येथून एकाच वेळी प्रकाशित

पत्रसमूह संस्थापक : स्व. श्री. रामगोपाल माहेश्वरी

# नवराष्ट्र

नवभारत पत्रसमूहाचे मराठी वृत्तपत्र

मुंबई, रविवार, २९ सप्टेंबर २०२४ | www.navarashtra.com | /navarashtra



बच्चन आणि महाराष्ट्रीयन जेवण
आतील पानावर



हृदयविकार सर्वात प्राणघातक आजार
आतील पानावर

## निवडणूक आयुक्तांची घोषणा : सण लक्षात घेऊन विधानसभेच्या तारखा जाहीर करणार

# २६ नोव्हेंबरआधी नवे सरकार

**9.59** कोटी मतदार महाराष्ट्रात | **4.59** कोटी पुरुष मतदार | **4.64** कोटी महिला मतदार | **19.48** लाख नवमतदार | **8** लाख १८६ मतदान केंद्रे



मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. केंद्रीय निवडणूक आयोगाचे पथक विधानसभा निवडणूक तयारीच्या पार्श्वभूमीवर तीन दिवस राज्याच्या दौऱ्यावर होते. निवडणूक आयोगाचे प्रमुख राजीव कुमार यांनी शनिवारी याबाबत पत्रपरिषदेत माहिती दिली. आम्ही राज्यातील ११ राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांशी चर्चा केली. त्याचबरोबर राज्याचे मुख्य सचिव, पोलिस महासंचालक, जिल्हा अधिकारी यांच्याकडून तयारीचा आढावा घेतला, असे राजीव कुमार म्हणाले.

ज्या उमेदवारांवर गुन्हे दाखल झाले आहेत त्यांनी स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात देऊन या संदर्भातील माहिती द्यावी असेही राजीव कुमार यांनी स्पष्ट केले. तसेच निवडणुकीच्या खर्चाच्या मर्यादेत सध्या तरी वाढ करणे शक्य नसल्याचे त्यांनी सांगितले. राज्यात २८८ विधानसभा मतदारसंघ आहेत. राज्यात ९.५ ९ कोटी मतदार आहेत. तर महिला मतदारांच्या संख्येत वाढ झाली आहे. महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबरला संपणार आहे. त्यापूर्वी निवडणुकीची प्रक्रिया करावी लागणार आहे, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे २६ नोव्हेंबरला राज्यात नवीन सरकार स्थापन होणार हे निश्चित झाले आहे. त्यासाठीची आचारसंहिताही लवकरच लागू होणार आहे. यावेळी राजकीय पक्षांनी काही महत्त्वपूर्ण सूचना केल्याचे राजीव कुमार म्हणाले. आगामी काळात दिवाळी, दसरा या सारखे मोठे सण आहेत. त्यामुळे सण, उत्सव लक्षात घेऊन निवडणुकांच्या तारखांची घोषणा करण्याची विनंती पक्ष नेत्यांनी केली होती, असेही निवडणूक आयुक्तांनी पत्रपरिषदेत स्पष्ट केले.

### आमचं महाराष्ट्र, आमचं मतदान

'आमचं महाराष्ट्र, आमचं मतदान' हा आमचा नारा आहे. लोकशाहीच्या उत्सवात लोक आपले योगदान देतील अशी आम्हाला अपेक्षा आहे, असे आयुक्त म्हणाले.

### खर्चाची मर्यादा वाढणार नाही

निवडणुकीत सध्या ४ ० लाखाची मर्यादा आहे. ती वाढवावी अशी मागणी राजकीय पक्षांनी केली होती. मात्र, खर्चाची मर्यादा देशव्यापी असते. दोन ते तीन वर्षात आम्ही आढावा घेत असतो. त्यामुळे सध्या तरी खर्चाची मर्यादा तीच राहील, असे राजीव कुमार यांनी स्पष्ट केले.

### नवमतदारांची मोठी संख्या

कुमार म्हणाले, वृद्ध मतदारांना केंद्रात जाणे शक्य नसेल तर घरुन मतदान करण्याची सोय उपलब्ध करणार. पहिल्यांदा मतदान करणाऱ्या मतदारांची संख्याही महाराष्ट्रात चांगली आहे. १ ९.४८ लाख नवमतदार आहेत. हे मतदारच लोकशाहीला पुढे घेऊन जातील.

### पक्षांच्या आयोगाला सूचना

1. निवडणुकीत पैशांचा वारेमाप वापर रोखण्यासाठी उपाययोजना करा
2. मतदान केंद्रात कोणत्याही व्यक्तीला मोबाईल नेण्यास मनाई करा
3. आठवड्याच्या मधल्या काळात निवडणूक घ्याव्यात
4. फेक न्यूज रोखण्याची व्यवस्था करा
5. मतदान केंद्रावर सोयी-सुविधा देण्यात याव्यात
6. वृद्ध मतदारांना येण्या-जाण्याची व्यवस्था करावी
7. पोलिंग एजंट हा स्थानिक असावा

# सीतारामन यांच्यावर खंडणीचा गुन्हा

## निवडणूक रोखेप्रकरणी बंगळुरूच्या विशेष न्यायालयाचा आदेश

बंगळुरू, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. निवडणूक रोख्यांद्वारे खंडणी उकळल्याच्या आरोपांखाली सीतारामन यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश बंगळुरूच्या विशेष न्यायालयाने दिले आहेत. कनार्टकमधील जनाधिकार संघर्ष परिषदेचे (जेएसपी) सह-अध्यक्ष आदेश अय्यर यांनी सीतारामन आणि इतरांविरोधात निवडणूक रोखेच्या माध्यमातून धमकी देऊन खंडणी उकळल्याची तक्रार दाखल केली होती. जन अधिकार संघर्ष परिषदेने एप्रिल २ ०२३ मध्ये सीतारामन, ईडीचे अधिकारी, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा, भाजपा नेते नलिन कुमार कटील, बीवाय विजयेंद्र यांच्या विरोधात याचिका केली होती. सुनावणीदरम्यान न्यायालयाने बंगळुरूच्या टिळक नगर पोलिस ठाण्याला निवडणूक रोख्यांद्वारे खंडणीचा गुन्हा नोंदविण्याचे निर्देश दिले. एसीएमएम कोर्टाने आदेश काढून तक्रारीची प्रत आणि रेकॉर्ड पोलिस स्टेशनला पाठवण्याचे निर्देश दिले आहेत. प्रलंबित एफआयआरमुळे सुनावणी १ ० ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली.



### मंत्रिपदाचा राजीनामा द्या

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी सीतारामन यांच्यावर टीका केली आहे. ते म्हणाले की, निर्मला सीतारामन यांच्याविरोधात लोकप्रतिनिधींच्या विशेष न्यायालयाने एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले आहेत. इलेक्टोरल बाँडद्वारे खंडणी उकळण्यात त्यांचा सहभाग होता. आता त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याने त्यांनी केंद्रीय मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी सिद्धरामय्या यांनी केली आहे.



### पेट्रोल, डिझेल जीएसटीत आणण्याची तयारी : पुरी

पुणे (ए). केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंग पुरी म्हणाले की, पेट्रोल आणि डिझेल जीएसटीच्या कक्षेत आणण्यासाठी एकमत निर्माण करण्याची गरज आहे. पुणे इंटरनॅशनल सेंटरच्या १४ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात 'आगामी दशकात भारताची ऊर्जा सुरक्षा वाढविण्यासाठी रणनीती आणि उपाययोजना' या विषयावर व्याख्यान देताना ते म्हणाले की, मी पेट्रोल आणि डिझेल जीएसटीच्या कक्षेत आणण्याविषयी बोलत आहे.

## इस्रायलने हवाई हल्ल्यात घातले कंठस्नान

# हिजबुल्लाचा म्होरक्या नसराल्लाहचा खात्मा

बैरुत, वृत्तसंस्था. इस्रायलच्या हल्ल्यात हिजबुल्लावरचा म्होरक्या हसन नसराल्लाह याचा खात्मा करण्यात आला आहे. इस्रायली लष्कराने (आयडीएफ) शनिवारी याला दुजोरा दिला आहे. आता नसराल्लाह जगाला घाबरवू शकणार नाही, असे इस्रायलने म्हटले आहे. २७ सप्टेंबर रोजी आयडीएफने लेबनानची राजधानी बैरूतमधील हिजबुल्लाच्या मुख्यालयावर ८ ० टनाच्या बॉम्बने हवाई हल्ला केला. नसराल्लाहही त्यावेळी येथे उपस्थित होता.



### नसराल्लाहची मुलगी ठार

हसन नसरल्लाह याची मुलगी जैनब नसराल्लाह हिचाही हल्ल्यात मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आला आहे. लेबनॉनमध्ये नुकत्याच झालेल्या हल्ल्यांमध्ये हिजबुल्लाहच्या क्षेपणास्त्र आणि रॉकेट दलाचा प्रमुख मोहम्मद काबिसीही मारला गेला आहे.



### निलफोरुशानला टिपले

या हल्ल्यात इराणचा टॉप कमांडर अब्बास निलफोरुशानचाही खात्मा करण्यात आला आहे. इस्त्रायली सैन्याने पुष्टी केली की दहियेहमध्ये अनेक इमारतींवर हल्ला झाला. यामुळे येथे सगळीकडे धुराचे लोट दिसून आले आहेत.




### खोमेनींना सुरक्षित स्थळी हलविले

नसराल्लाह यांच्या मृत्यूनंतर इराणमधील सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खोमेनी यांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. खोमेनी म्हणाले, आपण इस्रायलला किती ताकदीने रोखू शकतो यावर आता या प्रदेशाचे भवितव्य अवलंबून आहे.

# सात पोलीस होणार निलंबित

## फडणवीस कार्यालय तोडफोड प्रकरण



मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रालयातील दालनात येऊन दादर येथील महिला धनश्री सहस्त्रबुद्धे हिने तोडफोड केली होती. याप्रकरणी येथे बंदोबस्तावर असलेल्या ७ पोलिसांना जबाबदार धरत त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे. मंत्रालयात या महिलेने प्रवेश पास न घेताच प्रवेश केला होता. त्यामुळे त्या प्रवेशद्वारावर तैनात असलेल्या ७ पोलिसांवर निलंबनाची कारवाई केली जाणार आहे. गेल्या गुरुवारी (२६ सप्टेंबर) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास ही महिला फडणवीस यांच्या मंत्रालयातील कार्यालयात ही महिला घुसली होती. तेथे तिने दालनाबाहेरच्या झाडांच्या कुंड्या फेकून आरडाओरड केला होता. तसेच फडणवीस यांच्या दालनावर असलेली त्यांच्या नावाची पाटीही काढून फेकून दिली. त्यानंतर ती पसार झाली होती. विशेष म्हणजे फडणवीस यांच्या कार्यालयासमोरच राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांचे कार्यालय आहे. त्यांना ही घटना समजताच त्यांनी तेथे उपस्थित असलेल्या पोलीस आणि सरकारी कर्मचाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले होते.

## राज ठाकरेंची टीका ● असे पैसे देण्यापेक्षा राज्यात उद्योग आणा

# बहिणींमुळे सरकारी भाऊ संकटात

अमरावती, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी लाडकी बहीण योजनेवरून नाराजी व्यक्त केली आहे. विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मनसे कसून तयारीला लागली असून राज ठाकरे सध्या विदर्भाच्या दौऱ्यावर आहेत. अमरावतीमध्ये पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारताना राज ठाकरे यांनी लाडकी बहीण योजनेवर भाष्य केले.



सत्ताधाऱ्यांच्या स्वार्थासाठी योजना असेल तर परिणाम वाईट होतो. जानेवारीत पगार द्यायला सरकारच्या तिजोरीत पैसे राहणार नाहीत. राज्य खड्ड्यात घातले जात असेल तर ते चुकीचे आहे. समाजातील कोणताही घटक फुकट काही मागत नाही. महिलांना अशा प्रकारे पैसे न देता राज्यात नवीन उद्योग आणा. त्यांना रोजगार देऊन सक्षम केले पाहिजे, असे म्हणत राज ठाकरेंनी या योजनेवर अप्रत्यक्षरित्या टीका केली आहे.

### ठाकरे विदर्भ दौऱ्यावर

लोकसभा निवडणुकीत राज ठाकरे यांनी राज्यात महायुतीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला होता. मात्र आगामी विधानसभा निवडणुका लढवण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कार्यकर्ते झटून कामाला लागले असून त्याच पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे दोन दिवस विदर्भाच्या दौऱ्यावर होते. राज ठाकरे यांनी शनिवारी पूर्व विदर्भातील सहा जिल्ह्यातील मनसे पदाधिकाऱ्यांचा आढावा घेतला.

### वक्तव्याचे प्रणिती शिंदेंकडून समर्थन


राज ठाकरे यांनी केलेल्या वक्तव्याचे महाविकास आघाडीच्या नेत्या आणि काँग्रेसच्या सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी अप्रत्यक्षपणे समर्थन केले आहे. राज्यासाठी राबराब राबणाऱ्या नोकरदारांच्या पगारी करायला जर सरकारकडे पैसे नसतील तर यापेक्षा लाजिरवाणी गोष्ट काय असेल, असे प्रणिती शिंदे म्हणाल्या.

### प्रफुल्ल पटेल यांचा पलटवार

राज ठाकरे यांच्या वक्तव्यानंतर महायुतीमधल्या नेत्यांनी त्यांना प्रत्युत्तर देत पलटवार केला आहे. ज्यांच्या पोटात दुखते तेच अशी वक्तव्य करतात, असे म्हणत अजित पवार गटातील नेते प्रफुल्ल पटेल यांनी राज ठाकरेंवर टीका केली. आमच्या सर्व बहिणी आमचे स्वागत करत आहेत, असेही ते म्हणाले.

# १०-१२ वी परीक्षा फीमध्ये ₹५० वाढ

पुणे, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. दहावी आणि बारावीची परीक्षा फीमध्ये १२ टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय शिक्षण मंडळाने घेतला आहे. कागद महागल्यामुळे यंदापासून दहावी आणि बारावीच्या परीक्षांची फी वाढवण्यात आली. त्यामुळे आता विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यासाठी ५० रुपये जास्त मोजावे लागणार आहे. राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने यंदापासून परीक्षा फीमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला. दरवर्षी विद्यार्थ्यांची संख्या वाढत असल्यामुळे कागदाच्या किमतीतही वाढ होत आहे. त्यामुळे परीक्षा फीमध्ये वाढ करण्यात आले असल्याचे शिक्षण मंडळातील अधिकाऱ्यांनी सांगितले.



### इतर शुल्कातही वाढ

दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेआधी ४२० रुपये फी भरावी लागत होती. आता त्यांनी या परीक्षेसाठी ४७० रुपये फी भरावी लागणार आहे. तर बारावीच्या विद्यार्थ्यांना आतापर्यंत परीक्षा फी ४४० रुपये भरावी लागत होती. पण आता बारावीच्या विद्यार्थ्यांना ४९० रुपये परीक्षा फी भरावी लागणार आहे. दरम्यान, या शुल्कासह प्रशासकीय शुल्क, गुणपत्रिका शुल्क, प्रमाणपत्र शुल्क आणि प्रात्यक्षिक परीक्षा शुल्कातही वाढ करण्यात आली आहे.

### मणिपूरमधील मैतेई गावामध्ये गोळीबार

इम्फाळ (ए). मणिपूरमधील जिरीबाम जिल्ह्यातील एका गावात शनिवारी काही संशयित उग्रवाद्यांनी गोळीबार केला, ज्यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. पोलिसांनी ही माहिती दिली. काही सशस्त्र लोकांनी जवळच्या डोंगर आणि घनदाट जंगलातून मोंगबुंग मैतेई गावावर अंदाधुंद गोळीबार केला, त्यानंतर परिसरातील गावातील स्वयंसेवकांनी प्रत्युत्तर दिले. अनेक महिला, लहान मुले आणि वृद्धांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे.

## आयबीच्या इशाऱ्यानंतर पोलिस सतर्क

# मुंबईतील धार्मिक स्थळे अतिरेक्यांच्या निशाण्यावर



मुंबई, वृत्तसंस्था. केंद्रीय गुप्तचर यंत्रणेकडून मिळालेल्या धोक्याच्या सूचनेनंतर मुंबईत हायअलर्ट जारी केला आहे. शहरात आगामी सणासुदीच्या काळात दहशतवादी हल्ले घडवण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो अशी माहिती आयबीकडून मिळाली आहे. यानंतर धार्मिक स्थळांसह गर्दीच्या ठिकाणी पोलिसांकडून चोख सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. धमकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी विशेष खबरदारी बाळगली आहे. पोलिसांना मॉक ड्रील करण्याच्या सूचना आहेत. गर्दीच्या ठिकाणी आणि धार्मिक स्थळांवर मॉक ड्रिल तयारी करण्याच्या सूचना वरिष्ठांकडून मिळाल्या आहेत. सर्व डिसीपींना त्यांच्या संबंधित झोनमधील सुरक्षा व्यवस्थेकडे विशेष लक्ष देण्याचे आदेश दिले आहेत.

- नुकतेच क्रॉफर्ड मार्केट परिसरात एक मॉक ड्रिल आयोजित करण्यात आला होता. हा परिसर प्रचंड गर्दीचा ओळखला जातो, त्याठिकाणी २ प्रमुख धार्मिक स्थळही आहे असे एका अधिकाऱ्याने सांगितले.
- मुंबईतील इतर ठिकाणीही मॉक ड्रिल करून सुरक्षेची तयारी तपासली जात आहे. शहरातील सर्व मंदिरांना सुरक्षेबाबत सतर्क केले आहे. खबरदारीचा उपाय म्हणून संशयास्पद हालचालीबाबत कळवावे असे आवाहन पोलिसांनी केले आहे.
- गर्दीची ठिकाणे, धार्मिक स्थळांवर मुंबई पोलिसांकडून करडी नजर ठेवली जात आहे. याठिकाणी पोलिसांची गस्तही वाढवली आहे.

### # QUICK NEWS

### टाटाच्या प्लांटला आग, १५०० कर्मचाऱ्यांची सुटका

होसूर (ए). तामिळनाडूतील होसूर येथील टाटा इलेक्ट्रॉनिक्सच्या उत्पादन युनिटमध्ये शनिवारी भीषण आग लागली. सेलफोन उत्पादन विभागात आग लागली, त्यानंतर कर्मचाऱ्यांना परिसर रिकामा करावा लागला. आगीमुळे मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे. कारखान्यात आग लागली तेव्हा सुमारे १,५ ० ० कर्मचारी ड्युटीवर होते. आगीचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले की, श्वासोच्छवासाचा त्रास असलेल्या तीन कर्मचाऱ्यांना खासगी रुग्णालयात नेण्यात आले, त्यांची प्रकृती स्थिर आहे.

# नेपाळमध्ये पूर, भूस्खलन; ६६ ठार

## ६० जण जखमी

काठमांडू, वृत्तसंस्था. नेपाळमध्ये संततधार पावसामुळे आलेल्या पूर आणि भूस्खलनात किमान ६६ जणांचा मृत्यू झाला असून ६ ० जण जखमी झाले आहेत. यासंदर्भात अधिकाऱ्यांनी शनिवारी सांगितले की, गुरुवारपासून नेपाळमधील अनेक भागात मुसळधार पाऊस पडत असल्याने आपत्ती अधिकाऱ्यांनी अचानक पूराचा इशारा दिला आहे. नेपाळ पोलिस उपप्रवक्ते बिश्वो अधिकारी यांनी सांगितले की, देशभरात एकूण ७ ९ लोक बेपत्ता आहेत, त्यात काठमांडूतील १६ जणांचा समावेश आहे. मात्र, या काळात एक हजाराहून अधिक लोकांचे प्राण वाचले आहेत.



### ४४ महामार्ग बंद

देशभरात ४४ ठिकाणी मुख्य महामार्ग बंद करण्यात आले आहेत. काळजीवाहू पंतप्रधान आणि शहरी विकासमंत्री प्रकाश मान सिंह यांनी गृहमंत्री, गृह सचिव आणि सुरक्षा यंत्रणांच्या प्रमुखांसह विविध मंत्र्यांची तातडीची बैठक बोलावली. शोध आणि बचाव कार्याला गती देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत.दुसरीकडे पुरामुळे मुख्य वीजवाहिनी तुटल्याने दिवसभर खंडीत झालेला काठमांडू येथील वीजपुरवठा सायंकाळी पूर्ववत होऊ शकला. काठमांडूत २२६ घरे पाण्याखाली गेली असून बाधित भागात ३००० सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

## हायकोर्टाचे निरीक्षण • सत्र न्यायालयाने फेटाळलेला अटकपूर्व जामीन मंजूर

# लग्नाच्या आमिषाने बलात्काराचा आरोप विवाहिता करू शकत नाही

मुंबई, वा. लग्नाचे आमिष दाखवून आपल्यावर बलात्कार केल्याचा आरोप एखादी विवाहित स्त्री करू शकत नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण उच्च न्यायालयाने नोंदवले आहे. बलात्काराचा आरोप असलेल्या अर्जदाराला अटकपूर्व जामीन मंजूर करताना न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले. या प्रकरणात माहिती देणारी महिला स्वतः विवाहित असल्याने, अर्जदाराने दिलेल्या लग्नाच्या खोट्या वचनाला बळी पडल्याचा दावा करू शकत नाही. महिला विवाहित असल्यामुळेच कोणत्याही परिस्थितीत तिचे अर्जदाराशी लग्न होणार नाही, याची कल्पना तिला होती. दुसरीकडे, अर्जदार देखील विवाहित आहे म्हणूनच, लग्नाच्या खोट्या वचनाचा सिद्धांत येथे चुकीचा असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते, असेही न्या. मनिष पितळे यांच्या एकलपीठाने आदेशात नमूद केले आणि अर्जदाराला अटकपूर्व जामीनही मंजूर केला.



### दोघांनीही केले दावे-प्रतिदावे

पीडितेने आपल्या जबाबात अर्जदारासोबत मैत्री असल्याचे आणि अर्जदाराने आपल्याशी लग्न करण्याचे वचन दिल्याचे सांगितले होते. परंतु, अर्जदाराने आपल्याला लॉजमध्ये नेऊन जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप महिलेने केला होता. तसेच तिचा व्हिडिओ प्रसारित करण्याची धमकी दिल्याचा आरोपही तिने केला होता. तर अर्जदार आणि पीडिता दोघेही विवाहित असल्यामुळे शारीरिक संबंध ठेवण्यासाठी लग्नाचे कोणतेही खोटे वचन देण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचा दावा अर्जदाराने केला.

### व्हिडीओचा पुरावा नाही

अर्जदाराच्या या युक्तिवादाशी न्यायालयाने सहमती दर्शवली. तसेच अर्जदाराने व्हिडिओ प्रसारित केले होते हे दाखवण्यासाठी पीडितेच्या वतीने रेकॉर्डवर काहीही सादर करण्यात आले नसल्याचेही न्यायालयाने अर्जदाराला अटकपूर्व जामीन मंजूर करताना आदेशात नमूद केले.

# २ दहशतवादी ठार; चार जवान जखमी

## काश्मीरमधील कुलगाममध्ये चकमक

श्रीनगर (ए). जम्मू-काश्मीरच्या कुलगाममधील आदिगाम देवसर भागात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये शनिवारी चकमक झाली. या चकमकीत सुरक्षा दलांनी २ दहशतवाद्यांचा खात्मा केला. तसेच लष्कराचे तीन जवान आणि कुलगाम एएसपी जखमी झाले आहेत. चौघांनाही उपचारासाठी श्रीनगरला हलवण्यात आले आहे. काश्मीर झोन पोलिसांनी सांगितले की, या परिसरात २ ते ३ दहशतवादी लपल्याचा संशय होता. पोलिस आणि लष्कराने संयुक्त मोहिमेचा भाग म्हणून आदिगाममध्ये शोध मोहीम राबवली. या दरम्यान, दहशतवाद्यांनी त्यांच्यावर गोळीबार केला, त्यानंतर चकमक सुरू झाली. सध्या कारवाई सुरू आहे.








# या नेत्यांना माध्यमांचे भान येणार कधी?

भारतीय जनता पक्षाचे मुख्यमंत्रीपदाचे संभाव्य उमेदवार अशी ज्यांची ख्याती व प्रचार केला जातो, त्या देवेन्द्र फडणवीस यांच्याच नागपूर जिल्ह्यातील कामटी विधानसभा मतदारसंघातील आमदाराने असे काही तारे तोडले आहेत की भाजपाला कुठे पाहु आणि कुठे नको, असे व्हावे.

एकूणच आपल्या राजकीय नेत्यांना आधुनिक माध्यमांचे भान अजिबातच नाही हे वारंवार दिसलेच आहे. त्यातीलच ताजे उदाहरण सावरकर नामक या भाजपा आमदाराने दिले आहे. कुठे ते स्वातंत्र्यवीर आणि कुठे हे वाचाळवीर. नावातील साम्य सोडले तर टेकचंद व वि. दा. सावरकरांमध्ये काहीही साम्य दिसूच शकत नाही.

लोकसभा निवडणुकीत भाजपाचा जमिनीपासून चार अंगुळे वर, हवेत, चालणारा रथ दाणदिशी जमिनीवर आदळला. त्यात महाराष्ट्राचा वाटा मोठा होता. मावळत्या लोकसभेत २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत, भाजपाची खासदारांची संख्या २३ होती. तर मित्रपक्ष (अखंड) शिवसेनेची विजयी खासदारांची संख्या होती १८. एकूण दोघांचे मिळून ४१ खासदार मावळत्या लोकसभेत होते. पण नव्या लोकसभेत ती संख्या कुठच्या कुठे उडाली.

काँग्रेसप्रणित महाराष्ट्र विकास आघाडीने भाजपा प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी तसेच राज्यातील महायुतीवर मात केली. भाजपाची स्वबळावरील खासदारांची संख्या २३ वरून थेट ९वर घसरली. मित्रपक्ष एकनाथ शिंदेच्या शिवसेनेचे सात तर दुसरा मित्रपक्ष अजितदादा पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा केवळ एक खासदार असे मिळून महायुतीचे सतरा वीर लोकसभेत महाराष्ट्राने धाडले. तो मोठाच हादरा दिल्लीतील महाशक्तीला होता.

त्या दणक्याने भानावर आलेले दिल्लीतील आणि मुंबई, नागपुरातील भाजपा नेते विचार करू लागले आणि त्यांनी गेलेला जनाधार परत मिळवण्यासाठी महायुतीच्या राज्य सरकारचा वापर तातडीने सुरू केला. शेतकरी, गरीब, नोकरदार, युवा आणि महिला वर्गाला लक्ष्य करून योजनांचा धडाका लावला. शेतकऱ्यांसाठी सोयाबीन, कापसाला अधिकचे भाव, कर्जमाफीतील उरलेल लाभ, केंद्राच्या शेतकरी सन्मान योजनेतील राज्याचा निराळा अधिकचा वाटा, महिलांना घरगुती गॅसचे तीन मोफत सिलेंडर, युवकांसाठी विविध महामंडळाच्या शिष्यवृत्या आदींमध्ये वाढ, कौशल्य विकासाच्या अनेक योजना आदि सर्व गोष्टींबरोबरच, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, हे एक मोठे पाऊल शिंदे सरकारने उचलले.

> टीव्ही कॅमेरे तर दूरच, समोर बसलेल्या कार्यकर्त्यांच्या खिशातील मोबाईल हे अत्यंत प्रभावी प्रसारमाध्यम बनले आहे आणि फोनवरून शूटिंग करणारा प्रत्येक कार्यकर्ता हा स्फोटक क्लीपच्याच शोधात आहे, याचे भान राजकीय नेत्यांनी सतत बाळगायला हवे. तरच असे अडचणीचे प्रसंग टाळता येतील.






या योजनेसाठी पात्र ठरणाऱ्या राज्यातील किमान दोन कोटी महिलांच्या बँक खात्यांमध्ये विधानसभा निवडणुका जाहीर होण्याच्या आधी दरमहा पंधराशे प्रमाणे किमान तीन हप्ते पडले पाहिजेत, अशी पावले राज्य सरकार टाकत आहे. लाडक्या बहिणींच्या खात्यात दरमहा पंधराशे रुपये थेट जमा कऱण्याची ही योजना बघता बघता बरीच लोकप्रियही झाली आहे. पण त्याला महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आक्षेपही घेतले आहेत.

जरी योजना चांगली असली तरी ती आणण्याची सरकारची नियत साफ नाही, अशी टीका पहिल्या दिवसापासून होते आहे. उद्धव ठाकरे, शरद पवार, पृथ्वीराज चव्हाण आदिंनी सरकारवर टीका करतानाच योजना भली व कल्याणकारक असून त्याचा लाभ शिंदे सरकारला निवडणुकीत होऊ शकतो, हे थोडेफार मान्यही केले आहे. सर्वांच्याच मनात या योजनेमुळे महायुतीच्या मतपेटीत भरघोस वाढ होईल, अशी भीती वा आशा (आपापल्या राजकीय भूमिकेनुसार) जरी असली तरी विरोधकांच्या टिकेला खतपाणी घालण्याचा उद्योग आजवर सत्तारूढ बाजूने कोणीच केला नव्हता.

बित्तंबातमी
**अनिकेत जोशी**

एकनाथ शिंदे, देवेन्द्र फडणवीस आणि अजितदादा पवार हे महायुतीचे नेते राज्याच्या सर्व भागात जाऊन योजनेचा लाभ महिलांना देण्यासाठी मेळावे घेत आहेत. तिथे महिलांमध्ये थेट जाऊन राखी बांधून घेण्याचेही कार्यक्रम शिंदे, फडणवीस, पवार करत आहेत. योजना आणली राष्ट्रवादीच्या मंत्री अदिती तटकरे यांच्या महिला बालकल्याण खात्याने. नाव आहे मुख्यमंत्र्यांची लाडकी बहीण योजना असे आणि पैसा दिला जातोय तो अजित पवारांच्या अखत्यारीतील अर्थखात्याकडून. शिवाय या योजनेचे मूळ जनक भाजपा नेते मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान हे आहेत. तेंव्हा भाजपा नेतेही श्रेयाचे वाटेकरी आहेतच. योजनेच्या यशापेक्षा श्रेयावरून महायुतीत रस्सीखेच सुरू असल्याचेही आपण पाहातच आहोत. अजित पवार यांनी राज्यभर स्वतंत्र मेळावे घेऊन ही योजना आपणच आणल्याचे मतदारांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. तसे टीव्ही कॅम्पेनही अजित पवारांच्या राष्ट्रवादीने केल्यानंतर महायुतीतील वाद चव्हाट्यावर आला.

अशा एकंदरीत स्थितीत नागपूर शेजारच्या कामठी मतदारसंघातील भाजपाचे आमदार टेकचंद सावरकरांनी जाहीर कार्यक्रमात विरोधकांची टीका योग्यच होती याचाच जणु निर्वाळा दिला आहे. "सरकारने ही योजना आणली, हा मतांसाठी केलेला जुगाड आहे", अशा प्रकारचे उद्गार या महाशयांनी काढले आहेत.

एका कार्यक्रमात आमदार महोदय म्हणाले की "आम्ही एवढी मोठी भानगड कशासाठी केली, तुम्ही इमानदारीने सांगा. ज्या दिवशी तुमच्या घरापुढे मतदानाची पेटी येईल, त्यावेळी माझ्या लाडक्या बहिणी कमळाला मत देतील, यासाठी आम्ही हे जुगाड केलंय. हे सर्वजण खोटं बोलले असतील. मात्र, मी खरं बोलतो. माझं बोलणं खरं आहे की नाही? नाहीतर बोलायचं एक आणि करायचं एक, मी काय रामदेव बाबांचा कार्यकर्ता आहे का?", असंही आमदार टेकचंद सावरकर यांनी म्हटले.

टेकचंदांना बहुधा वाटत होते की मी काय विनोद करतोय, लोक माझ्या बोलण्यावर काय खूष आहेत, पण सध्याच्या समाज माध्यमांच्या सुगीच्या युगात त्या भाषणातील नेमके जुगाड व भानगड वर्णनासह काढलेले उद्गार एका क्लीपमध्ये आले व ती क्लीप वेगाने सर्वत्र पसरवण्याचे काम सुरू झाले असून ते उद्गार भाजपाला महागात पडणारे ठरणार आहेत.


"बघा, आम्ही म्हटलेच होते की लाडकी बहीण योजना फक्त मतांच्या बेगमीसाठीच सरकारने आणलेली आहे. निवडणुका संपल्या की योजना फेकून देतील. लाडक्या बहिणींच्या हाती नंतर काहीच पडणार नाही..." अशा प्रकारची टीका काँग्रेसने सुरू केली आहे. टेकचंद महाशयांच्या त्या उद्गारांवर विधानसभेतील विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी लगेचच ट्वीट केले आहे व त्या ट्वीटमध्ये ती क्लीपही त्यांनी जोडली आहे. सहाजिकच आता तमाम दृष्य व श्राव्य माध्यमांच्या हाती, छापील वृत्तपत्रांच्याही हाती नवे कोलीत मिळाले असून भाजपाला टीव्ही पडद्यावरून व वृत्तपत्रांच्या स्तंभांतून धुण्याचे कार्यक्रम सुरू झाले आहेत.

व्हाटसअप, ट्विटर, फेसबुक, इन्टाग्राम अशा आधुनिक माध्यमांचे महत्व तमाम राजकीय नेत्यांनी सतत लक्षात ठेवायला हवे. अशाच भयंकर चुका पूर्वी आर. आर. पाटील (विरोधी उमेदवाराला बलात्कार करायला निवडणुका होईपर्यंत थांबायला काय झालं होतं!) काँग्रेस राजवटीत पाटबंधारे मंत्री असताना अजितदादा पवार (धरणातील पाणी कसे काय वाढवायचे, आता मी त्यात XXX करु काय) आदि अनेक उदाहरणे या पूर्वी घडलेली आहेत.

समोर लावलेले टीव्हीचे माईक पत्रकार परिषद सुरू होण्यापूर्वीही व नंतरही सुरुच असतात, याचे भान नसणारे तत्कालीन काँग्रेस प्रांताध्यक्ष माणिकराव ठाकरे यांनी, तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण हे पक्षनिधीला पैसा देत नाहीत, अशी तक्रार तेव्हाचे मंत्री सतीश चतुर्वेदींकडे करणे, हाही प्रकार त्यातलाच होता. पण टीव्ही कॅमेरे तर दूरच, समोर बसलेल्या कार्यकर्त्यांच्या खिशातील मोबाईल हे अत्यंत प्रभावी प्रसार माध्यम बनले आहे आणि फोनवरून शूटिंग करणारा प्रत्येक कार्यकर्ता हा स्फोटक क्लीपच्याच शोधात आहे, याचे भान राजकीय नेत्यांनी सतत बाळगायला हवे. तरच असे अडचणीचे प्रसंग टाळता येतील.

# वृद्धावस्था आनंदी करा

**जगात वृद्धांबाबत होणारे गैरवर्तन व अन्याय रोखण्यासाठी दर वर्षी १ ऑक्टोबर हा आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय संयुक्त राष्ट्र संघाने १४ डिसेंबर १९९० ला घेतला. या पूर्वी १९८२ मध्ये जागतिक आरोग्य संघटनेने 'वृद्धावस्था आनंदी करा' हा नारा देऊन 'सर्वांसाठी आरोग्य मोहीम' सुरू केली होती. या दिवशी ज्येष्ठांच्या प्रती आदर व्यक्त केला जातो. भारतात काही वर्षे हा दिवस महात्मा गांधींच्या जयंती दिवशी म्हणजेच २ ऑक्टोबरला साजरा केला जात होता.**




वैद्यक शास्त्रातल्या प्रगतीमुळे माणसाच्या जगण्याची वयोमर्यादा आज चाळीस वरून ऐंशी वर्षापर्यंत आली आहे.

## वृद्ध/ज्येष्ठांची संख्या

भारतात १९५१ साली २ कोटी ,२००१ साली ७.६ कोटी तर २०११ साली १०.४कोटी तर सध्या १३ कोटी पेक्षा अधिक ज्येष्ठ नागरिक आहेत.

दिवसेंदिवस ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढत आहे.येत्या १० वर्षात ज्येष्ठ नागरिकांच्या संख्येत ४१टक्क्यांनी वाढ होणार आहे. तर २०५० पर्यंत ज्येष्ठ नागरिकांची संख्या १.५ अब्जावधी पेक्षा जास्त होईल, असा अंदाज जागतिक आरोग्य संघटनेने वर्तविला आहे.

काळानुसार वृद्धांचे टप्पे पुढीलप्रमाणे केले जातात.

1. ६० ते ७० वर्षे-तरुण वृद्ध (यंग ओल्ड).
2. ७० ते ८० वर्षे-मध्यवयीन वृद्ध (मिडल ओल्ड).
3. ८० व ८० च्या पुढे-पूर्ण वृद्ध (ओल्ड ओल्ड).

अनेक वृद्ध वयाच्या ७० ते ८० वर्षापर्यंत कार्यक्षम असतात. जीवशास्त्रानुसार माणसाचं प्रत्येक दहा मिनिटांनी वय वाढत असतं. वाढत्या वयानुसार इंद्रियांची काम करण्याची शक्ती कमी होत जाते. जणुकांमध्ये बदल होतात.

## आजार, औषधे व दुष्परिणाम

सध्याच्या विभक्त कुटुंब पद्धतीमुळे अनेक वृद्धांना उपेक्षित करण्यात येत आहे.एकाकीपणाचा परिणाम त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होत आहे.

दिवसेंदिवस रोगप्रतिकारक शक्ती कमी होत जातं असल्याने अनेक शारीरिक व मानसिक आजार होतात. आज जगात ६ कोटी ३० लाखांपेक्षा अधिक वृद्ध लोक नैराश्य या मानसिक आजाराने ग्रस्त आहेत.

सर्व आजारांत प्रामुख्याने पचनसंस्थे संबंधित रोग पु.५.८-स्त्री.६.४, श्वसन संस्थेचे रोग पु.३२.२- स्त्री.२९.४, मज्जा(चेता) संस्थेचे रोग १०.८-स्त्री.१९.९, रक्ताभिसरण संबंधित रोग पु.२१.८ -स्त्री.२२.५, अन्य आजार पु.१४.८- स्त्री.१६.४ होतात. हेच प्रमाण तरुणांमध्ये अर्धे आहे.

विशेष
**डॉ. अंकुश जाधव**

- **साधारणतः** ६.९ टक्के वृद्धांमध्ये एकावेळी एकच आजार, ७५.५ टक्के वृद्धांमध्ये एकाच वेळी २ ते ३ आजार,१३.२ वृद्धांमध्ये ४ आजार दिसून येतात.
- **सामान्यतः** कॅन्सर, संधिवात, भ्रम, बद्धकोष्ठता, मूत्रपिंडाचे विकार, खोकला, कंप, मधुमेह, उच्च रक्तदाब, अस्थिभंग, मोतीबिंदू, अर्धांगवायू, प्रोस्टेट ग्रंथीची वाढ होणे, हृदय विकार-धमनीचे रोग, हाडे ठिसूळ होणे इ.शारीरिक तर बुद्धिभेद, नैराश्य, अल्झायमर इ.मानसिक आजार होतात.
- **सामान्यतः** जे लोक एकाच वेळी विविध आजारांसाठी सहा औषधे घेतात त्यांच्यात १८ टक्के तर सहा पेक्षा अधिक औषधे घेतात त्यांच्यात ८०टक्के औषधांचे दुष्परिणाम (ADR) दिसून येतात. या प्रकारच्या होणाऱ्या दुष्परिणामुळे १० ते २० टक्के लोकांना रुग्णालयात भरती होतात तर ५ते१२ टक्के लोकांना भरती करणे आवश्यक असते.

रोगाच्या अत्यावस्थ अवस्थेत (इमर्जन्सी) अवस्थेत अलोपॅथिक उपचार अवश्य घ्यावेत, परंतु नंतर आयुर्वेदिक उपचार घ्यावेत. आयुर्वेदिक उपचार बरेच दिवस/महिने घ्यावेत. हृदय रोग, रक्तदाब इ.आजारांसाठी तुम्ही आयुष्यभर उपचार घेताच ना?

## शक्यतो असा आहार घ्या



वृद्धावस्थेत आयुर्वेदानुसार वात दोषाचे आधिक्य असते. या वात दोषाचे शमन करणारा आहार घेणे आवश्यक असते. गोड, आंबट व खारट हे तिन्ही दोष वात दोषाचे शमन करतात. (मर्यादित खावेत) जुने तांदूळ, गहू, ज्वारी, जव, मूग, उडीद, कारले, भोपळा, दोडका, सुरण, पालक, द्राक्षे, डाळिंब, खजूर, खोबरे,दूध, लोणी, तूप, तीळ, मध, आले, लसूण, पुदिना, दालचिनी, शेंगदाणे, वेलची, सैंधव मीठ, मटनाचे सूप इ.पदार्थांचा आहारात समावेश करावा.

## सामान्य तपासण्या

सामान्यतः सर्व प्रकारच्या तपासण्या नियमित कराव्यात. त्यात संपूर्ण रक्त, साखर, कोलेस्टेरॉल, युरीक ॲसिड, प्रोटेईन्स इ. तपासण्या कराव्यात.

## हे करा

फार गडबडीने वा फार संथपणे जेवू नये. फार थंड पाणी पिऊ नये. अंघोळीसाठी शक्यतो गरम/कोमट पाण्याचा वापर करावा, कारण गरम पाणी हे वात दोष शामक आहे. वृद्धावस्थेत वात दोषाचे प्रमाण जास्त असते.

भूक लागलीच तर खा. केवळ नेहमीची वेळ झाली म्हणून खाऊ नका. तहान लागलीच तर पाणी प्या. भरपेट, भरपूर खाण्याचे टाळा. अनियमित जेवू नये, इन्स्टंट पदार्थ, चायनीज पदार्थ खाऊ नयेत. मानसिक ताण तणाव, नैराश्य, भविष्याची चिंता इ.करण्याचे टाळावे. शक्यतो झोप पूर्ण झाल्यावरच उठावे. कार्यरत रहावे. वृद्धावस्थेचे परिणाम कमी जाणवावेत, त्याचे परिणाम कमी दिसावेत यासाठी च्यवनप्राश सारखे अन्य अवलेह खावेत. नियमित व्यायाम-चालणे, योगासने, प्राणायाम इ.व्यायाम करावा.

**आयुष्य आनंदात जगा।**
**कारण ते किती बाकी आहे**
**ते कोणालाच माहीत नसते.**

वृद्धावस्था आनंदात घालवा व इतरांनाही आनंदात. ठेवा,ठेवण्याची प्रेरणा द्या.

**(लेखक, भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाचे सेवानिवृत्त सहायक संचालक आहेत.)**

# हरयाणातील 'कास्ट फॅक्टर' कुणाच्या फायद्याचा?

**भारतीय राजकारणात कितीही नाही म्हटले, तरी जात, धर्म याला महत्त्व आहे. जातीच्या आधारावरच जिथे उमेदवारी दिली जाते, तिथे मतदारांनी जातीचा विचार केला, तर त्यांना दोष देण्यात अर्थ नाही. हरियाणातील काँग्रेस आणि भाजपनेही 'कास्ट फॅक्टर' ला अतिशय महत्त्व दिले आहे. हा 'कास्ट फॅक्टर' कुणाच्या फायद्याचा ठरतो, हे मतमोजणीनंतरच कळू शकेल.**






हरयाणा विधानसभा निवडणुकीच्या प्रचारातून राजकीय अजेंडा निश्चित केला जात आहे. भाजप सत्तेची हॅट्ट्रिक करण्याचा प्रयत्न करत असताना काँग्रेस दहा वर्षांचा वनवास संपवण्याच्या तयारीत आहे. माजी मुख्यमंत्री भूपेंद्र सिंह हुड्डा प्रत्येक रॅलीत काँग्रेसला '३६ समुदायांचा' पाठिंबा मिळत असल्याचे सांगत आहेत. भाजपचे नेतेही '३६ समुदायां'च्या हिताची भाषा करीत आहेत. एवढेच नाही, तर गावातील सामाजिक पंचायत आणि खापच्या बैठकीत ३६ समाजांचा उल्लेखही ऐकायला मिळतो. हरियाणात जाट विरुद्ध जाट नसलेल्या राजकीय पक्षांमध्ये जातीय राजकारण खेळले जात असेल; परंतु मुद्दा ३६ समुदायांच्या हितसंबंधांचा आणि प्रतिनिधित्वाचा आहे. काँग्रेसने सर्वाधिक ३५ जाट उमेदवार उभे केले आहेत, तर भाजपने सर्वाधिक २४ ओबीसी उमेदवारांना तिकीट दिले आहे. अशा प्रकारे भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांनी जागेच्या राजकीय 'मूड'नुसार उमेदवार निवडले असले, तरी ३६ समाजाच्या जोरावरच तिथे कोण सत्तेत येईल, हे ठरणार आहे. अशा स्थितीत प्रश्न पडतो, की हरियाणातील ३६ समुदाय कोणते आहेत आणि त्यांचे राजकीय महत्त्व काय आहे? हरयाणामध्ये संपूर्ण समाजासाठी ३६ समुदायांचा वापर केला जातो. हरयाणामध्ये जाट समाजातील लोकांची संख्या सर्वाधिक आहे. ते सामान्य श्रेणीत येतात, तर उत्तर प्रदेश आणि राजस्थानसारख्या राज्यांमध्ये ते ओबीसी वर्गात येतात. हरयाणात जाट जातीची लोकसंख्या २५ ते २७ टक्के आहे. त्यानंतर २१ टक्के दलित आहेत. ते रविदासी आणि वाल्मिकीसह विविध पोटजातींमध्ये विभागले गेले आहेत. ओबीसी लोकसंख्या ३० ते ३२ टक्के आहे. त्यात गुर्जर, यादव, सैनी, प्रजापती, कंबोज, कुम्हार, सुनार (सोनार), लोहार अशा सुमारे ३२ पोटजाती आहेत. उच्चवर्णीय समाजात पंजाबी, ब्राह्मण, राजपूत, वैश्य (बनिया) अशा जाती आहेत. याशिवाय मुस्लिम समाजही विविध जातींमध्ये विभागलेला आहे. केवळ हरयाणामध्येच नव्हे, तर पश्चिम उत्तर प्रदेश आणि राजस्थानमध्येही ३६ समुदायांचे आवाज ऐकू येतात. जाटांपासून गुर्जर आणि मुस्लिमांपर्यंत ३६ समुदायांचा पाठिंबा असल्याचे सांगण्यात येते; परंतु ३६ समुदायांची चर्चा हा केवळ मुहावरा आहे. कारण हरियाणात ३६ पेक्षा जास्त जाती आहेत. '३६ बारादरी' हा शब्द सामान्यतः हरयाणाच्या बंधुत्वासाठी वापरला जातो. याचा उपयोग समाजात एकोपा वाढवण्यासाठी केला जातो.

अजमेर-मेरवारा गॅझेटियर (१९५१) मध्ये ३७ जातींचे अस्तित्व नमूद केले आहे, ३६ नाही. मध्ययुगीन पर्शियन लेखकांनी त्यांच्या प्रवासवर्णनांमध्ये उत्तर भारतात ३६ बिरादरी (कुळे किंवा राज्ये) अस्तित्वात असल्याचा उल्लेख केला आहे. राजपूतांच्या इतिहासात ३६ राजवंशांचा उल्लेख आहे. हरियाणाच्या निवडणुकीत ३६ समुदायांच्या पाठिंब्याबद्दल बोलून नेते आपली प्रतिमा संपूर्ण समाजाचे नेते म्हणून रंगवण्याचा प्रयत्न करतात. एखाद्या विशिष्ट व्होटबँकेपर्यंत पोहोचण्यासाठी अनेकांना आपल्या जाती-समूहांचे हीत लक्षात ठेवायला आवडते, असे राजकारणात दिसून आले आहे. अशा स्थितीत संपूर्ण समाजाचा पाठिंबा मिळवण्यासाठी नेते ३६ समाजांच्या सामाजिक हितासाठी बोलतात. या वेळी काँग्रेसने चाल खेळली आहे. २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत हरयाणात भूपेंद्र सिंह हुड्डा यांच्या नेतृत्वाखाली भाजपने जाटांचा पक्ष म्हणून काँग्रेसची संभावना करून गैर-जाट मते आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. अशा स्थितीत हरयाणातील जाट व्होट बँक भाजपसोबत जात नसल्याचे मानले जात आहे. काँग्रेस आणि भूपेंद्र हुड्डा केवळ जाट समर्थक प्रतिमा तोडण्यासाठी ३६ समुदायांना पाठिंब्याची भाषा करतात. हरयाणात जाट, दलित, ओबीसी, पंजाबी, ब्राह्मण आणि मुस्लिम यांना तिकीट देऊन ३६ समाजाचा पाठिंबा मिळवण्याचा जुगार काँग्रेसने खेळला आहे. हरयाणातील जाट मतांची राजकीय ताकद आणि महत्त्व पाहून भाजपही जाटविरोधी प्रतिमेतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत आहे. लोकसभा निवडणुकीत जाट समाजाने संघटित होऊन काँग्रेसच्या बाजूने मतदान केले होते. त्यामुळे भाजपचे नुकसान झाले आहे. या वेळी या निवडणुकीत भाजपने १७ जाट उमेदवार उभे केले आहेत. याशिवाय ओबीसी, ब्राह्मण आणि पंजाबीच नव्हे, तर दोन मुस्लिमांनाही तिकीट देऊन ३६ समाजाचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. हरियाणातील निवडणुका धर्मापेक्षा जातीच्या मुद्यावर लढवल्या जात आहेत. जात जनगणनेच्या बहाण्याने काँग्रेस सातत्याने जातीचा मुद्दा उपस्थित करत आहे, तर कुमारी सेलजा यांच्या निमित्ताने भाजप काँग्रेसला दलितविरोधी ठरवत आहे. अशा स्थितीत हरयाणाच्या निवडणुका केवळ जाती आणि आरक्षणाच्या मुद्द्यांपुरत्या मर्यादित केल्या जात आहेत.

विशेष
**भागा वरखडे**

हरयाणाच्या जातीय राजकारणाचा परिणाम मागील निवडणुकीत दिसून आला आहे. जाट विरुद्ध जाट नसलेल्या मतांनी निर्णायक भूमिका बजावली आहे. भाजपने आपल्या रणनीतीच्या आधारे काँग्रेसला पराभूत करण्याची रणनीती आखली आहे. राज्यातील सत्तेची दशा आणि दिशा जाट, ओबीसी आणि दलित समाज ठरवतात. या तीन जातींभोवती भाजप आणि काँग्रेसने आपापले डाव खेळले आहेत. अशा स्थितीत सत्तेच्या सिंहासनापर्यंत पोहोचण्यासाठी कोणाचे समीकरण काम करते हे पाहावे लागेल. भाजप आणि काँग्रेस प्रत्येकी ८९ जागांवर निवडणूक लढवत आहेत. काँग्रेसने 'सीपीआय-एम'साठी एक जागा सोडली आहे, तर भाजपच्या एका उमेदवाराने अर्ज मागे घेतला आहे. जाट समाजाच्या हातात सत्तेच्या चाव्या दीर्घकाळापासून आहेत. काँग्रेस आणि भाजपने उमेदवार निवडीत जातीय समीकरणाची पूर्ण काळजी घेतली आहे. काँग्रेसने जाट समाजावर लक्ष केंद्रित केले आहे, तर भाजपने ओबीसी समाजावर. काँग्रेसने ३५ जाट, २० ओबीसी, १७ दलित, ४ ब्राह्मण, ५ मुस्लिम, ६ पंजाबी, दोन वैश्य आणि राजपूत समाजातील एक उमेदवार उभा केला आहे. भाजपने जाट समाजातील १७ उमेदवार दिले आहेत. २४ ओबीसी, ११ ब्राह्मण, दोन मुस्लिम, १० पंजाबी, ६ वैश्य आणि तीन राजपूत उमेदवार उभे केले आहेत. भाजपने 'नॉन-जाट सोशल इंजिनीअरिंग'च्या माध्यमातून सलग दोनदा हरयाणाची निवडणूक जिंकली आहे. या वेळी ओबीसी, ब्राह्मण आणि पंजाबींसोबतच भाजपने जाटांनाही तितकेच महत्त्व दिले आहे. याशिवाय दलित समाजासाठी राखीव असलेल्या १७ जागांवर उमेदवार उभे करण्यात आले आहेत. आतापर्यंत भाजपचे राजकारण बिगर जाट मते मिळवण्यावर आधारित होते; मात्र या वेळी जाटांना सोबत घेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. जाट मतांशिवाय सत्तेची लढाई जिंकता येणार नाही, हे भाजपला समजले आहे. दलित मते मिळवण्यासाठी भाजप कुमारी सेलजा यांच्या मुद्द्याला काँग्रेसविरोधात राजकीय शस्त्र बनवण्याचा प्रयत्न करत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही आरक्षण आणि सेलजा यांच्या निमित्ताने दलितांना आपल्या गोटात सामावून घेण्याचे प्रयत्न केले आहेत. जाट, ओबीसी, दलित यांच्यासह ब्राह्मण आणि पंजाबी समाजाच्या मतपेढीचा फायदा घेण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. ओबीसींची मते टिकवण्यासाठी भाजपने २४ उमेदवार उभे केले आहेत, तर काँग्रेसने २० जागांवर तिकीट देऊन राजकीय संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. ओबीसी असलेल्या नायबसिंग सैनी यांना भाजपने पुढे केले असून गुर्जर आणि यादव समाजावरही मोठा विश्वास व्यक्त केला आहे. ओबीसी मते टिकवून ठेवण्याचा काँग्रेसचा प्रयत्न असला, तरी त्यात जाट आणि दलित मतांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. अशा स्थितीत जाट-दलित समीकरणासोबत ओबीसी, पंजाबी आणि मुस्लिम यांनाही ठेवण्याची काँग्रेसची रणनीती आहे. हुड्डा भलेही ३६ समुदायाची भाषा बोलत असतील; पण त्यांनी ३० ते ३५ टक्के टक्के असलेल्या ओबीसींना केवळ २० तिकिटे दिली आहेत आणि जाट समाजातील ३५ उमेदवार उभे केले आहेत. तसेच मेवात पट्ट्यातील मुस्लिम मतांचे राजकीय महत्त्व लक्षात घेऊन भाजपने दोन तर काँग्रेसने पाच मुस्लिमांना तिकीट दिले आहे. सुमारे सात टक्के मुस्लिम मतदार ही काँग्रेसची मुख्य व्होटबँक मानली जाते. हरयाणात ब्राह्मण मतदार ८ ते ९ टक्के आहेत. या निवडणुकीत भाजपने काँग्रेसपेक्षा ब्राह्मणांना जास्त महत्त्व दिले आहे. भाजपने ११ ब्राह्मण तर काँग्रेसने ६ ब्राम्हण उमेदवार उभे केले आहेत. येथे एकेकाळी ब्राह्मण समाज काँग्रेसचा पारंपरिक मतदार मानला जात होता; परंतु सध्या तो भाजपच्या पाठीशी उभा आहे. त्याचप्रमाणे हरियाणात जवळपास ९ टक्के पंजाबी मतदार आहेत. भाजपने पंजाबी समाजातील १० उमेदवार उभे केले आहेत, तर काँग्रेसने ८. हरियाणात ओबीसी दर्जा मिळावा यासाठी जाट अनेकवेळा रस्त्यावर उतरले; पण भाजप ही मागणी पूर्ण करू शकले नाही. शेतकऱ्यांच्या आंदोलनात जाटांचाही चांगला सहभाग होता आणि कुस्तीगीरांच्या आंदोलनातही हा समाज एकत्र उभा राहिला. अशा स्थितीत जाट आणि दलितांसह ओबीसींना आकर्षित करण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे.

निमिष विनोद माहेश्वरी यांचेसाठी मुद्रक आणि प्रकाशक अचला श्रीनिवास यांनी नवभारत प्रेस लि. प्लॉट नं. १३, सेक्टर-८, सानपाडा (पूर्व), नवी मुंबई-४०० ७०५,येथे मुद्रित करून १८९-ए, आनंद कॉम्पलेक्स, एस.जी. मार्ग, चिंचपोकळी (पश्चिम), मुंबई- ४०० ०११ येथून प्रकाशित केले. एडिटर इन चीफ- निमिष विनोद माहेश्वरी. कार्यकारी संपादक- संजय मलमे* (*पी.आर.बी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे)
मुंबई फोन : ०२२-४९६४२३०९
सानपाडा प्रेस फोन : ०२२-४६१६०८९४
वर्ष १०, अंक २८७ RNI NO . MAHMAR/२०१४/५९८६२

## अकोल्यात ५७ हजार ७५८.५ हेक्टर क्षेत्रावरील पिके गेली वाया

# अतिवृष्टीमुळे पिके मातीत

**अकोला, (वा.)** जिल्ह्यात ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे ५७ हजार ७५८.५ हेक्टर क्षेत्रावरील विविध पिके मातीत गेली आहेत. पावसामुळे झालेल्या हानीचा अंतिम अहवाल जिल्हा प्रशासनाकडून विभागीय आयुक्तांना सादर करण्यात आला आहे. त्यानुसार शेतकऱ्यांना वितरीत करण्यासाठी एकूण ७९ कोटी ४४ लाख ३५ हजार ९०८ रुपयांच्या मदत निधीची आवश्यकता आहे. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून ऐन सणासुदीच्या काळात अडचणीत वाढ झाली आहे.जिल्ह्यात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून अहवाल देण्याचे निर्देश राज्याचे महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी महसूल, कृषी अधिकाऱ्यांनी वेळेत व प्रत्येक नुकसानीची काळजीपूर्वक नोंद घेऊन सविस्तर पंचनामे सादर करण्याचे निर्देश दिले. अंतिम अहवालानुसार, एकूण ३४९ गावांतील ५७ हजार ३१९ खातेदारांच्या एकूण ५७ हजार ७५८.५ हेक्टर क्षेत्रावरील विविध पिकांचे नुकसान झाले आहे. नुकसान भरपाईसाठी एकूण ७९ कोटी ४४ लाख ३५ हजार ९०८ रुपयांच्या मदत निधीचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. फळ पिके सोडून जिरायत पिकाचे २२७ गावांतील ५६ हजार ९८४.५३ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. त्यासाठी ७७ कोटी ४९ लाख ८९ हजार ६०८ रुपयांच्या मदत निधीची मागणी करण्यात आली आहे. फळ पिके सोडून बागायत क्षेत्राचे २२ गावांतील १५९.६ हेक्टर क्षेत्र बाधित असून, ४३ लाख नऊ हजार २०० रुपयांच्या निधीचा प्रस्ताव आहे.



### अधिकाऱ्यांकडून करण्यात आलेले पंचनामे कृषी अधिकाऱ्यांकडे

जिल्ह्यात वेळोवेळी विविध नुकसानग्रस्त भागाची पाहणीही केली. त्यानुसार महसूल, कृषी, ग्रामविकास खात्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून पंचनामे करण्यात आले आहेत. त्याचा अंतिम अहवाल जिल्हाधिकारी अजित कुंभार, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांच्या संयुक्त स्वाक्षरीने पाठविण्यात आला आहे.

### २२६.५८ हे. क्षेत्र पिकांचे फळ बाधित

- फळ पिकांचे ३० गावांतील २२६.५८ हेक्टर क्षेत्र बाधित झाले. ८१ लाख ५६ हजार ८८० रुपयांच्या निधीचा प्रस्ताव आहे.
- त्याचप्रमाणे, अतिवृष्टीने ७० गावांतील ३८७.७९ हेक्टर जमीन खरडून गेली असून, ६९ लाख ८० हजार २२० रुपये निधीचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.
- शासनाने तात्काळ मदत देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

## २०२३-२४ या वर्षात अन्नधान्य उत्पादनात वाढ

**मुंबई, (वा.)** जूनमध्ये संपलेल्या २०२३-२४ या पीक वर्षात भारताचे अन्नधान्य उत्पादन विक्रमी ३३२.२२ दशलक्ष टनावर पोहोचले आहे. गहू आणि तांदळाच्या बंपर उत्पादनामुळे हा विक्रम झालेला आहे असे कृषी मंत्रालयाने बुधवारी सांगितले.वर्ष २०२३-२४ चा अंतिम अंदाजानुसार मागील वर्षीच्या ३२९.६ दशलक्ष टन पेक्षा २.६१ दशलक्ष टन जास्त अन्नधान्य उत्पादनात वाढ झालेली आहे, असे मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे. २०२३-२४ यावर्षी उत्पादन विक्रमी उत्पादन १३७.८२ दशलक्ष टनावर पोहोचले, जे २०२२-२३मध्ये १३५.७५ दशलक्ष टन होते.




## विठ्ठल-रुक्मिणीच्या पूजेची ऑनलाईन नोंदणी

### विठ्ठल भक्तांना खुशखबर

**पंढरपूर, (वा.)** अखेर १ ऑक्टोबर पासून श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या नित्यपूजा, पाद्यपूजा, तुळशी पूजा, चंदन उटी पूजा याची नोंदणी सुरू होणार असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली आहे. यापूर्वी १ सप्टेंबर पासून ऑनलाईन नोंदणी होणार असे मंदिर प्रशासनाने जाहीर केले होते. मात्र संगणक प्रणाली विकसित करण्यास उशीर झाल्याने आता एक महिन्यानंतर म्हणजे १ ऑक्टोबरपासून भाविकांना या सर्व पूजेचे ऑनलाईन बुकींग करता येणार आहे. विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या पूजा वाटपात कायम गैरप्रकार होत असल्याची तक्रार सातत्याने होत होती. याची अनेक उदाहरणे समोर येत असताना मंदिर प्रशासनाने या गैरप्रकारला पूर्णपणे पायबंद घालण्यासाठी पाऊल उचललं आहे. देवाच्या सर्व पूजा थेट ऑनलाईन पद्धतीने वितरित करण्याची संगणक प्रणाली आणल्याने आता यात घोटाळे करणाऱ्यांना काही गैरप्रकार करता येणार नाही.



### संगणक प्रणाली विकसित करण्याचे काम पूर्ण



सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या २० ऑगस्ट रोजीच्या मंदिर समितीच्या सभेत निर्णय घेण्यात आला होता. यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्याचे काम पूर्ण झाले असून आता भाविकांना पूजेची नोंदणी https://www.vitthalrukmini-mandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून करता येणार आहे. याबाबत अधिक माहिती, अटी व शर्ती मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे, असे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

## निवडणुकीपूर्वी घड्याळ चिन्ह गोठवा!

### सुप्रीम कोर्टात १ ऑक्टोबरला सुनावणी

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे निवडणूक चिन्ह गोठवून दुसरे चिन्ह द्या, अशी मागणी शरद पवार गटाकडून करण्यात आली आहे. शरद पवार गटाने सुप्रीम कोर्टात याबाबत याचिका दाखल केली आहे. येत्या १ ऑक्टोबर रोजी यावर सुनावणी पार पडेल. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव आणि घड्याळ चिन्ह अजित पवारांना दिले. पवार गटाने या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर आता त्यांनी पुन्हा एक याचिका दाखल करत विधानसभा निवडणूकीपूर्वी अजित पवार गटाचं घड्याळ चिन्ह बदलण्याची मागणी केली आहे. त्यामुळे आता विधानसभा निवडणूकीपूर्वी अजित पवारांच्या राष्ट्रवादीला नवीन चिन्ह मिळणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### न्यायालयात सुनावणीची शक्यता कमी

सुप्रीम कोर्टात सप्टेंबर महिन्यात हे प्रकरण ८ दिवस सूचीबद्ध करण्यात आले. मात्र, एकाही दिवशी यावर सुनावणी होऊ शकली नाही. या प्रकरणाला तारीख पे तारखी मिळत असल्याचे दिसत आहे. आता या प्रकरणाला सर्वोच्च न्यायालयाने ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या दिवशी सूचीबद्ध केले आहे. मात्र, त्यादिवशीही इतर प्रकरणे अगोदर न्यायालयासमोर असल्याने सुनावणी होण्याची शक्यता कमीच दिसत आहे.

## जळगावमध्ये महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा

**जळगाव, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** महाराष्ट्र टेबल टेनिस असोसिएशनच्या मान्यतेने जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनतर्फे जळगावांत ३० सप्टेंबरपासून आमदार चषक राज्य अजिंक्यपद (मानांकन) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. एकलव्य क्रीडा संकुल येथे सदर स्पर्धा ४ ऑक्टोबर पर्यंत असणार आहे. या स्पर्धेसाठी विविध गटांचे मानांकन राज्य असोसिएशनने आज जाहीर केले. यामध्ये अर्जुन पुरस्कारविजेती मधुरिका पाटकर हिला अव्वल मानांकन मिळाले आहे. रेगन अलबुकर (पुरुष गट,मुंबई उपनगर),१९ वर्ष वयोगट मुले- कुशल चोपडा (नाशिक) मुली- अनन्या चांदे (मुंबई उपनगर),१७ वर्ष वयोगट मुली- नायशा रेवस्कर( पुणे),मुले- पार्थ मगर (मुंबई शहर),१५ वर्ष वयोगट मुले- मयुरेश सावंत (ठाणे),मुली- नायशा रेवस्कर (पुणे),१३ वर्ष वयोगट मुली- मायरा सांगळेकर (मुंबई उपनगर).

# QUICK NEWS

### पिण्याच्या पाण्यातून १०० जणांना विषबाधा

**नांदेड, (वा.)** नांदेड शहराजवळच्या नेरली या गावात शंभरहून अधिक जणांना विषबाधा झाली. पिण्याच्या पाण्यामुळे विषबाधा झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले. गावातील सार्वजानिक पाणीपुरवठ्याच्या टाकीतून पाणी पुरवठा केला जातो. याच टाकीतील पाणी पिल्याने विषबाधा झाली.

शुक्रवारी रात्री काही जणांना उटल्या , जुलाब , चक्कर येणे असा त्रास होउ लागला. नंतर मात्र हा प्रकार वाढत गेला. मोठ्या संख्येने रूग्ण वाढत असल्याने मिळेल त्या वाहनाने रुग्णांना शासकीय आणि खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

रात्रीतून शंभरहून अधिक जणांना विषबाधा झाली. शनिवारी सकाळपासुन देखील अनेकाना असाच त्रास झाला. त्यांची तपासनी करुन उपचार करण्यात आले. गावात आरोग्य पथक तळ ठोकून आहे. आलेल्या रुग्णाची तपासणी करुन उपचार दिले जात आहेत. जास्त त्रास असेलल्या रुग्णांना पुढील उपचारासाठी रुग्णालयात पाठवले जात आहे. सार्वजानिक टाकीतील पाणी दूषित झाल्याने हा प्रकार घडल्याच डॉक्टरांनी सांगितले.

## यवतमाळमधील बेंबळा प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होणार

### देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा प्रकल्पामुळे बाधित झालेल्या मौजा धामक या गावाचे पूर्णतः पुनर्वसन करावे अशी प्रकल्पग्रस्तांची मागील १५ वर्षांपासून मागणी होती. आज झालेल्या नियामक मंडळाच्या बैठकीत अमरावती जिल्ह्याच्या नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील मौजा धामक या गावाचे पूर्णतः पुनर्वसन करण्यास मंजुरी देण्यात आली. यामुळे सदर गावातील प्रकल्पग्रस्तांचे नवीन ठिकाणी दर्जेदार पुनर्वसन करण्यात येणार असून प्रकल्पग्रस्त म्हणून विविध शासकीय योजनांचा देखील त्यांना लाभ होणार असल्याची माहिती जलसंपदा तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



विदर्भातील सिंचन प्रकल्पांसाठी सरळ खरेदीने जमिनी देणाऱ्या शेतकऱ्यांना हेक्टरी रुपये पाच लक्ष रुपये दराने ८३२ कोटी रुपये सानुग्रह अनुदानास विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियमक मंडळाची मान्यता देण्यात आली.

विदर्भातील अमरावती प्रदेशातील पाचही जिल्हे तसेच नागपूर प्रदेशातील वर्धा, भंडारा, गोंदिया आणि नागपूर या जिल्ह्यांमधील अंदाजे १६ हजार ६३३ हेक्टर जमीन सन २००६ ते २०१३ दरम्यान सरळ खरेदीने संपादित करण्यात आलेली होती.




## बारामतीतील 'त्या'मुलींवर ११ जणांनी केला अत्याचार

**पुणे, (वा.)** बारामती तालुक्यातील दोन अल्पवयीन मुलींना दारू पाजून पुण्यातील हडपसर परिसरात लैंगिक अत्याचार केल्याची घटना १४ सप्टेंबर रोजी घडली होती. या प्रकरणात पोलिसांनी अटक केलेल्या चार आरोपींकडे अधिक तपास केला असता आणखी ७ जणांनी त्यांच्यावर अत्याचार केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणात आतापर्यंत ११ आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.

ज्ञानेश्वर भारत आटोळे, अनिकेत प्रमोद बेंगारे, यश ऊर्फ सोन्या शिवाजी आटोळे (वय २१, रा. सावळ, ता. बारामती), त्यानंतर जयेश अशोक मोरे या चार आरोपींना सुरुवातीलाच अटक केली होती.

### दारू पाजून केला अत्याचार

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बारामती तालुक्यातील नववीत शिकणाऱ्या दोन अल्पवयीन मुली १४ सप्टेंबर रोजी घरामध्ये कोणालाही न सांगता निघून गेल्या होत्या. त्या दोघी हडपसर या ठिकाणी आल्यावर आरोपी ज्ञानेश्वर आटोळे याच्याशी पीडित मुलींनी संपर्क साधला. त्यानंतर आटोळे याने हडपसर परिसरातील दोघा मित्रांना सांगितले की, रूमवर दोन मुली आल्या आहेत. त्यानंतर त्याचे तीन मित्र रुमवर आले आणि त्यांनी दोघींना दारु पाजून लैंगिक अत्याचार केला.

आता ओंकार भारती, ओम कांबळे, आप्पा शेंडे, अक्षय मोडक, सूरज इंदलकर, संस्कार वाघमारे आणि श्रेणिक भंडारी यांना अटक केली आहे.



# सलमानची अभिमान वाटणारी स्वरसाधना

**नंदकुमार पाटील । नवराष्ट्र : छोट्या पडद्यावरचा रियालिटी शोचा सिलसिला हा काही आजचा नाही. गेल्या अनेक दशकापासून तो सुरू आहे. आता फरक एवढाच आहे की यात सर्वोत्कृष्ट गायक, कलाकार वेगवेगळ्या जबाबदार पार पडताना दिसतो आहे. 'इंडियन आयडॉल' या रियालिटी शोमुळे घराघरात पोहोचलेला सलमान अली आता सूत्रसंचालन करतो आहे. शिवाय त्याचा सहभाग असलेला कार्यक्रम पुढल्या दोन महिन्यात षणमुखानंद या भव्य दिव्य सभागृहात होणार आहे. यानिमित्तान सलमानच्या अभिमान वाटणाऱ्या स्वरसाधनेचे स्मरण.**





पिढ्यानपिढ्या घरात संगीताची साधना केली जाते म्हटल्यानंतर भविष्यात तो त्याचा व्यवसाय होऊ शकतो परंतु या प्रवासात सर्वांनाच राष्ट्रीय पातळीवर नेतृत्व करता येईल असे यश मिळेलच असे नाही. अलीकडे रियालिटी शो आल्यामुळे सच्चा दिलाने संगीताची साधना करणाऱ्या गायक कलाकाराला आता प्रतिष्ठेचे स्थान मिळायला लागले आहे. अर्थात त्यासाठी फक्त स्पर्धेत गुणवत्ता दाखवून चालत नाही तर त्यासाठी साधनही महत्त्वाची आहे. गाण्याच्या क्षेत्रात ज्यांनी म्हणून योगदान दिले आहे. त्यांना रसिकाची मने जिंकणे सोपे झाले आहे.

सलमान अली यांनी गायनाच्या क्षेत्रात नाव मिळवले आहेतच परंतु अलीकडे त्याच्याकडे सूत्रसंचालनाची जबाबदारी ही सोपवलेली आहे. या वर्षाच्या अखेरीस त्याच्याकडून एक चांगली गोष्ट होणार आहे. ती म्हणजे प्रथमच ३००० प्रेक्षकांच्या समोर त्याची एकट्याची गाणी ही सादर होणार आहेत. त्याच्या नावाने ३००० हजार प्रेक्षकांना निमंत्रित केले जाणार आहे. त्यासाठी भव्य दिव्य षण्मुखानंद सभागृह निवडले आहे. सलमान हा तसा हरियाणाचा वैशिष्ट्य पद्धतीची गाणी गाण्याला हरियाणाने प्राधान्य दिले आहे. ते काहीसे गुण त्याच्याकडे आलेले आहे. अर्थात त्यासाठी अनेक पिढ्यांचे योगदान त्याच्या पाठीमागे आहे. त्यामुळे तो सहज उत्स्फूर्तपणे गाणी गाऊ शकतो. सूफी गीत गाणे सोपे नसते. त्याचा परिणाम रियालिटी शोमध्ये झालेला आहे. सोनी टीव्हीवरती इंडियन आयडॉल हा रियालिएट शो दाखवला गेला होता त्याच्यामध्ये सर्वप्रथमचा मान मिळवणारा तो गायक ठरलेला आहे. रुपेरी पडद्यावर अनेकांची गाणी गाणारा हा सलमान पुढे रुपेरी पडद्यावरती नायक म्हणून चमकणाऱ्या कितीतरी कलावंतांसाठी त्याने आपला स्वर दिलेला आहे. दबंग ३, सुई धागा, सॅटेलाईट शंकर आधी अनेक चित्रपट सांगता येतील की ज्यात स्वर ऐकायला मिळतो. या सलमानने अनेक रियालिटी शॉमध्ये भाग घेतलेला आहे. त्याच्यामध्ये परिक्षक म्हणूनही जबाबदारी स्वीकारलेली आहे. गायक, परिक्षक, सूत्रसंचालन आणि आता स्वतःचा भव्य दिव्य लाईव्ह शो या साऱ्या गोष्टी लक्षात घेता सलमानची संगीतसाधना त्याला उपयुक्त ठरत आहे असे दिसते.

## लिटिल चॅम्पपासून प्रवास सुरू

झी टीव्हीवरील आयकॉनिक सिंगिंग रिअलिटी शो 'सा रे ग म प' मेंटॉर्सच्या नव्या पॅनलसह आणि आपल्या नवीन पर्वासह गायक सलमान अली पुनरागमन करत आहे. नयी आवाज, नया अंदाज असलेल्या या पर्वामध्ये भारतातील नवीन उदयोन्मुख आवाज आणि मेंटॉर्स सचिन-जिगर, सचेत-परंपरा आणि गुरू रंधावा हे दिसून येतील. या पर्वामध्ये सूत्रधार विपुल रॉयसोबत 'सा रे ग म प' 'लिटल चॅम्प्स २०११' चा उपविजेता सलमान अली हा या शो चे सहसूत्रसंचालन करताना दिसणार आहे. सलमानने आपला प्रवास लिटल चॅम्प्स स्पर्धक म्हणून सुरू केला आणि त्यानंतर २०२१ मध्ये तो 'इंडियन प्रो म्युझिक लीग' या शोमधील एका टीमचा हिस्सा होता. पण आता प्रथमच तो शो चे सहसूत्रसंचालन करताना दिसून येणार आहे. हल्लीच्या भागामध्ये सलमानने स्पर्धकाच्या रूपात त्याने सरप्राईजिंग प्रवेश केला. 'मस्त कलंदर' या त्याच्या परफॉर्मन्सनंतर तो या कार्यक्रमात सहभागी झालेला आहे.



## जिथे घडला, तिथे रमला

त्यांनी त्याच्या आयुष्यात कधीही विचार केला नव्हता की एक दिवस तो शो चे सूत्रसंचालन करेन. आज १३ वर्षांनंतर या शो चे सूत्रसंचालन करण्याची संधी त्याला मिळाली आहे. ही त्याच्या करिअरमधील मोठी झेप आहे. आज जेव्हा त्याला हे करायला मिळत आहे तेव्हा आयुष्याचे एक वर्तुळ पूर्ण झाल्याची भावना त्याच्यि मनात आहे. त्याने सारेगामापाचे त्यांनी हा त्यांनी हाजी वाहिनीचे आभार मानले आहेत. मोठ्या विश्वासाने जबाबदारी टाकली आहे म्हटल्यानंतर त्या दृष्टीने काय करता येईल हाही विचार त्याचा सुरू झा ले ला आहे.

# 'धर्मवीर' दोन जिगरबाजांची गाथा

**आनंद दिघे हे सच्चे कार्यकर्ते, कट्टर शिवसैनिक होते. त्यांचा दरारा, कारारीपणा सर्वकाही ठाणेकरांनी अनुभवलाच परंतु यानिमित्ताने तो संपूर्ण भारतभर ही पसरला होता. महाराष्ट्रासाठी बाळासाहेब ठाकरे यांचे नाव घेतले जात होते तर ठाणे आणि त्या परिसरात आनंद दिघे यांचे नाव घेतले जात होते. त्यांच्या सानिध्यात आलेला प्रत्येक कार्यकर्ता, नागरिक हा समाधानी होता. त्याला कारण म्हणजे त्यांच्या दरबारात गेले म्हणजे काम फत्ते होणार ही अशा त्यांनी निर्माण केली होती.**



सामंजस्याने, विचाराने जर प्रश्न सुटत नसेल तर वेळप्रसंगी जीवाची परवा न करता सामोरे जाण्याची ही त्यांची तयारी होती त्यामुळे सामान्य माणसासाठी आनंद दिघे म्हणजे देवच होते. त्यांचे हे कर्तुत्व रुपेरी पडद्यावर यावे अशी इच्छा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना झाली. त्यांनी ते अभिनेता मंगेश देसाई याच्याकडे ती व्यक्तही केली. त्यांनी निर्मितीची जबाबदारी स्वीकारली 'धर्मवीर' मुक्काम पोस्ट ठाणे हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. हा चित्रपट फक्त मराठी प्रेक्षकांना नाही तर अमराठी प्रेक्षकांनी सुद्धा या चित्रपटाचे कौतुक केले होते. आता पुढे काय म्हणताना 'धर्मवीर टू' साहेबांच्या हिंदुत्वाची गोष्ट हा चित्रपट उदयाला आला आणि तो प्रदर्शितही झालेला आहे. अर्थात त्याचे दिग्दर्शन हे प्रवीण तरडे यांनी केले आहे. कथा, पटकथा ही बाजू त्यांनी या चित्रपटासाठी सांभाळलेली आहे. फरक इतकाच की पहिला चित्रपट हा पूर्णपणे आनंद दिघे यांचे समग्र दर्शन घडवणारे होते तर दुसरा भाग हा दिघे आणि त्यांचे कट्टर शिष्य एकनाथ शिंदे यांच्या कार्याचे दर्शन घडवणारे आहे. या कथाला अनेक वर्षाचे संदर्भ असले तरी कथा मात्र ही अलीकडच्या काळा सुरू होते. दिघे आणि शिंदे यांच्या विचारांचे विचारांचे, कार्याचे, हिंदुत्वाचे, त्यांच्या जागृती विषयी आणि महिलांविषयी असलेले प्रेम सारे काही एक एक करून उलघडायला लागते. त्यासाठी पालघरला दोन साधूंची झालेली हत्या पासून हा प्रवास सुरू होतो तो अखेर तिसराही भाग येणार याची जाणीव करून देणाऱ्यापर्यंत पोहोचतो. शिंदे मुख्यमंत्रीपदावर काम करत असताना जी काही सेवा घडली त्या प्रत्येक कृतीच्या मागे आनंद दिघे यांचे विचार, त्यांचा समजूतदारपणा विविध प्रसंगातून अधोरेखित केला आहे. यानिमित्ताने राम मंदिर, श्री मलंगगड, दहावी सराव परीक्षा, नथुराम गोडसे नाटक, करोनाचा काळ, सावरकरांचा देखावा या साऱ्या गोष्टी एक एक करून पुढे यायला लागतात. दिग्दर्शक तरडे यांनी या संपूर्ण कथेची बांधणी इतकी उत्तम केलु आहे की प्रेक्षकांना आता पुढे काय होणार याची उत्सुकता निर्माण होते. हे करत असताना शिंदे आणि दिघे यांचे कार्य समाजासाठी किती पूरक, स्पष्ट, प्रेरणा आणि आधार देणारे आहे याचे हा दर्शन घडवलेले आहे.

चित्रपट समीक्षण

चित्रपट म्हटल्यानंतर तो फक्त कथा पोहोचवणारा न होता तो पाहणाऱ्या प्रत्येक माणसांमध्ये भिन्नला पाहिजे. या दृष्टीने तांत्रिकदृष्ट्या ज्या काही गोष्टी कराव्या लागतात त्या दिग्दर्शकाने केल्या आहेत. त्यामुळे हा चित्रपट फक्त मनोरंजन करणारा झालेला नाही तर तो काळा बरोबर ही पुढे सरकलेला आहे. याचा प्रत्यय येतो. त्यामुळे मराठी बरोबर अमराठी प्रेक्षकांना सुद्धा हा चित्रपट पाहायला आवडेल. तेवढ्यासाठीच मराठी बरोबर हिंदीतही हा चित्रपट प्रदर्शित केला आहे. आनंद दिघे यांचे व्यक्तिमत्व करारी, भिडस्त, धाडसी असले तरी त्यांच्यामध्ये भावनिक, जिव्हाळा, नातेसंबंध जोडणारा माणूसही तेवढाच दडलेला आहे. ते दोन-चार प्रसंग या चित्रपटामध्ये पाहायला मिळतात. चित्रपट शिंदे आणि दिघे यांचा असला तरी त्यांच्या सानिध्यात आलेले अनेक व्यक्ती यात पाहायला मिळतात आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या सर्व व्यक्तिरेखा प्रसिद्ध अशा कलावंतांवर सोपवले आहे. त्यामुळे चित्रपट पाहताना आपले लाडके कलाकार यात एका वेगळ्या भूमिकेत आपल्याला पाहायला मिळतात. ही नामावली तशी फार मोठी आहे त्यातूनही सुनील तावडे, समीर धर्माधिकारी, ऋषिकेश जोशी, विजय कदम, आनंद इंगळे, कमलाकर सातपुते, राजेश भोसले, सुनील बर्वे, उदय सबनीस यांच्यासोबत प्रवीण तरडे, विजय निकम, दीपक करंजीकर आधी अनेक नावे याबाबतीत घेता येतील. त्यामुळे त्यांच्यातला हुबेहूबपणा दिसणे हे साऱ्या गोष्टी दिग्दर्शक, वेशभूषाकार, रंगभूषाकार यांनी दाखवलेला आहे. यामुळे अलीकडचा जो काही शिंदे यांचा बहुचर्चित वेगवान प्रवास आहे तो यानिमित्ताने उभा राहताना दिसतो. मंत्रिमंडळातील बरेचसे मंत्री शिंदे यांच्या सानिध्यातले आलेली व्यक्तिमत्व यात डोकावताना दिसतात.

### 'धर्मवीर २' ची नोंद घेणारी कमाई

प्रवीण तरडे यांच्या दिग्दर्शनातला 'धर्मवीर २' हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला असून पहिल्या दिवशी या चित्रपटाने विक्रमी कमाई केलेली आहे. तब्बल १ कोटी ९२ लाखांचा गल्ला कमावला असून २०२४ या वर्षात पहिल्या दिवशी सगळ्यात जास्त कमाई करणारा मराठी सिनेमा ठरला आहे. १५०० पेक्षा ही अधिक शोजने या चित्रपटाची सुरुवात करण्यात आली आहे. केवळ मुंबई, ठाणे नाहीतर संपूर्ण महाराष्ट्रात चित्रपटला उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

# 'स्वरगंधर्व' सुधीर फडके ऑस्करच्या यादीत

**ऑस्करच्या यादीत मराठी चित्रपटाच्या नावाची नोंद होणे म्हणजे जागतिक बहुमानच यावे लागेल. तो प्राप्त होण्यासाठी प्रत्येक दिग्दर्शक, निर्माता आपल्या पद्धतीने प्रयत्न करीत असतो. यंदा नाही म्हटले तरी ऑस्करच्या या यादीत सर्वोत्तम म्हणावेत अशा २९ चित्रपटांचा समावेश आहे. त्यात योगेश देशपांडे दिग्दर्शित 'स्वरगंधर्व सुधीर फडके' यांच्या चित्रपटाचा समावेश आहे.**



बाबूजींचा संगीतमय प्रवास उलगडणारा हा चित्रपट काही महिन्यांपूर्वी प्रदर्शित झाला होता. महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारतात या चित्रपटाला प्रेक्षकांनी पसंती दर्शवली आहे. प्रेक्षकांसह श्रीधर फडके, आशा भोसले, माधुरी दीक्षित अशा अनेक दिग्गजांनी या चित्रपटाचे भरभरून कौतुक केले. विशेष म्हणजे अमेरिकेतही या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तिथेही या चित्रपटाचे शोज हाऊसफुल्ल झाले होते. प्रेक्षकांचे एवढे प्रेम मिळवल्यानंतर आता हा चित्रपट फिल्म फेडरेशन ऑफ इंडिया यांच्याकडून ऑस्कर साठी निवड होतं हीच मुळात कौतुकास्पद बाब आहे. सौरभ गाडगीळ प्रस्तुत रिडिफाईन प्रॉडक्शन्स निर्मित या चित्रपटाचे सौरभ गाडगीळ आणि योगेश देशपांडे निर्माते आहेत. तर चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन योगेश देशपांडे यांचे आहे. 'स्वरगंधर्व सुधीर फडके' या चित्रपटात सुनील बर्वे, मृण्मयी देशपांडे, सागर तळाशीकर, मिलिंद फाटक, आदिश वैद्य, सुखदा खांडकेकर, अपूर्वा मोडक, अविनाश नारकर, शरद पोंक्षे, उदय सबनीस, चिन्मय पटवर्धन, निखिल राऊत, विभावरी देशपांडे, धीरेश जोशी, परितोष प्रधान यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

# 'इंद्रायणी' इरिनाची एन्ट्री



'इंद्रायणी' ही मालिका कलर्स मराठीवर दाखवली जाते. यात आता एका परदेशी अभिनेत्रीचा प्रवेश होणार आहे. त्यासाठी चकित होण्याचे कारण नाही. बिग बॉस मराठीमध्ये एक स्पर्धक म्हणून दिसलेली ही परदेशी अभिनेत्री म्हणजे इरीना रुडाकोवा हिची इंट्री यात होतं आहे. त्यामुळे इरिना आणि इंदूमध्ये नक्की काय शिजते आहे, असा प्रश्न सर्वांनाच पडला होता. आता 'कलर्स मराठी' वाहिनीने 'इंद्रायणी' मालिकेचा नवा प्रोमो शेअर करत या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. 'इंद्रायणी' मालिकेच्या नव्या प्रोमोमध्ये विठूच्या वाडीत आलेली एक गोरीपान फॉरेनर दिसून येत आहे. तिचं परीसारखं रूप, सोनेरी केस अशा सर्वच गोष्टींची विठूच्या वाडीला भूरळ पडलेली पाहायला मिळत आहे. ही परी दुसरीतिसरी कोणी नसून 'बिग बॉस मराठी' फेम इरिना रूडाकोवा आहे. इरिनाच्या येण्याने 'इंद्रायणी' मालिकेत काय गमतीजमती घडतात? तिची डॉक्यूमेंट्री पूर्ण होणार की नाही? इंदू आणि इरिनाची मैत्री होणार का? तसेच इरिना कीर्तनही शिकणार का? या सर्व गोष्टी 'इंद्रायणी' मालिकेच्या आगामी भागांत प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहेत. 'इंद्रायणी' या मालिकेबद्दल बोलताना इरिना म्हणाली, 'इंद्रायणी' ही मालिका माझ्यासाठी एक महत्त्वाचा प्रोजेक्ट आहे. मालिकेतील माझं पात्र खूप गोड आणि सकारात्मक आहे. त्यामुळेच हे पात्र मला खूप भावलं. सेटवरील सगळ्यांसोबत काम करताना मजा येतेय. मजा करण्यासह इथला प्रत्येक जण खूप मेहनतीने काम करत आहे'.



# सोनालीची रुक्मिणी

सोनाली कुलकर्णी या अभिनेत्रीकडे एकदा भूमिका सोपवली कि ती उत्तम करणार हा विश्वास तिने दिग्दर्शकाकडे संपादित केलेला आहे. त्यामुळे हिंदी, मराठी अशा अनेक चित्रपटांमध्ये ती सातत्याने दिसते आहे. प्रत्येक वेळी तिचा अभिनयाचा स्तर हा उंचावलेला दिसतो. अशा या सोनाली कुलकर्णीचा 'मानवत मर्डर्स' हा चित्रपट ४ ऑक्टोंबरला सोनी लिव्हवर प्रदर्शित होत आहे. त्यात ती रुक्मिणीची व्यक्तिरेखा साकार करते आहे. ही थ्रिलर सिरीज १९७०च्या दशकात महाराष्ट्रातील ग्रामीण भागात घडलेल्या कुप्रसिद्ध हत्याकांडाला प्रकाशझोतात आणते. या सिरीजमध्ये प्रतिभावान कलाकारांसह राष्ट्रीय पुरस्कार-विजेते कलाकार देखील आहेत.

सोनाली यांनी रूक्मिणीच्या भूमिकेत आपली सर्वोत्तम अभिनयाची भर केली आहे. रुक्मिणी आपल्या पूर्ण न झालेल्या इच्छांची पूर्तता करण्यासाठी विलक्षण, घातक उपाययोजनांचा अवलंब करते. तिच्या प्रवासाबाबत सांगताना ती सांगते, 'ही भूमिका ऑफर करण्यात आल्यापासून आणि कथानक वाचल्यापासून मानवी मन कशाप्रकारे विलक्षण कृत्य करू शकते हे पाहून अचंबित झाले. ही भूमिका साकारताना मोठी जबाबदारी पार पाडत असल्यासारखे वाटले. मी रूक्मिणीचे पैलू परिपूर्णपणे सादर करण्याचा प्रयत्न केला आहे.' आशिष बेंडे यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे.आशुतोष गोवारीकर, सई ताम्हणकर, मकरंद अनासपुरे यांच्यासोबत सोनाली ही मुख्य भूमिकेत दिसणार आहे. ती पुढे सांगते, या सर्वांमध्ये अनोखी कौशल्ये आणि सर्जनशीलता आहे. मी या लक्षवेधक कथानकाप्रती प्रेक्षकांची प्रतिक्रिया पाहण्यासाठी खूप उत्सुक आहे.' महेश कोठारे व आदिनाथ कोठारे निर्मित आणि गिरीश जोशी यांची निर्मिती असलेली सिरीज आहे. रमाकांत एस. कुलकर्णी यांची आत्मचरित्रात्मक कलाकृती 'फूटप्रिंट्स ऑन द सँड ऑफ क्राइम'वर आधारित ही सिरीज आहे.

# दिग्दर्शकाचे कौतुक म्हणजे अचूक निरीक्षण

**निर्माता, पटकथा लेखक आणि दिग्दर्शक निखिल अडवाणी यांची ओळख ही फक्त दिग्दर्शक म्हणून नाही तर एक प्रगल्भ विचारसरणीचा दिग्दर्शक म्हणून अशी ही त्यांची ओळख आहे. समाजाचे केलेले निरीक्षण ते आपल्या कथानकात उतरवत असतात. त्यामुळे अशा दिग्दर्शकांकडून ज्यावेळी कौतुक होते त्यावेळी अचूक निरीक्षणाचा अनुभव येतो. हा अनुभव अभिनेत्री शर्वरी वाघ हिला आलेला आहे.**



निखिलने अलीकडेच तरुण आणि गतिशील अभिनेत्री शर्वरीचे कौतुक केले आहे, ज्यांनी त्यांच्या नवीनतम चित्रपट 'वेदा' मध्ये मुख्य भूमिका साकारली आहे. दोन दशकांहून अधिक काळाच्या कारकिर्दीमध्ये निखिल यांनी बॉलिवूडमध्ये आपली ठळक छाप पाडली आहे. शर्वरीने कमी कालावधीतच बॉलिवूडमधील सर्वात आश्वासक नव्या चेहऱ्यांपैकी एक म्हणून स्थान मिळवले आहे. शर्वरी बद्दल बोलताना निखिल सांगतो, 'मला नेहमीच असे वाटत आले आहे की शर्वरीमध्ये एका पिढीत एकदा होणारी अभिनेत्री होण्याची क्षमता आहे. तिची अभिनयासाठी असलेल्या निष्ठा, आवड आणि कामगिरीसाठी असलेली तीव्रता पाहून मी थक्क झालो. इतक्या कमी वयात तुमच्यात हे गुण दिसून येणे दुर्मीळ आहे.

हे स्पष्टपणे दाखवते की शर्वरी आपल्या कारकिर्दीत ठसा उमटवू इच्छित आहे. ती पडद्यावर उत्तम कामगिरी करण्यासाठी सर्वस्व देत आहे, कारण इंडस्ट्रीत तिच्यासाठी हेच तीच ओळखपत्र आहे. ती या इंडस्ट्रीतील कोणालाही ओळखत नाही, त्यामुळे तिच्या अभिनयामुळेच तिच्यासाठी इथे दरवाजे उघडतील, आणि ती नेमके तेच करत आहे.''वेदा' मधील शर्वरी च्या उत्कृष्ट कामगिरीवर चर्चा करताना आणि तिच्या प्रवासाचा मागोवा घेत निखिल अडवाणी म्हणाले, 'इतक्या कमी वेळात शर्वरी एक अशी अभिनेत्री बनली आहे जीच्या कडे लक्ष दिले पाहिजे आणि यामुळे मला खूप आनंद होतो. मला वाटते, तिच्या वयातील कोणीही वेदामध्ये तितका दमदार अभिनय करू शकला नसता. तिचा प्रवास पुढे कसा उलगडतो हे पाहण्यासाठी मी खूप उत्सुक आहे आणि एक मार्गदर्शक, दिग्दर्शक म्हणून, ज्यांनी तिच्यासोबत काम केले आहे, मी त्यांना शुभेच्छा देतो.' शर्वरी लवकरच आलिया भट्टसोबत 'अल्फा'मध्ये दिसणार आहे. 'अल्फा' शर्वरी च्या कारकिर्दीत एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे, जिथे ती शाहरुख खान, सलमान खान, हृतिक रोशन, एनटीआर ज्युनिअर, दीपिका पादुकोण, कॅटरिना कैफ आणि कियारा अडवाणी सारख्या सुपरस्टार्ससोबत दिसणार आहे.

# आत्म-शोधाच्या हृदयस्पर्शी प्रवासा

**प्रेक्षकांमध्ये सध्या आनंदाचे वातावरण पाहायला मिळते. त्याला कारण म्हणजे मनोरंजन करणारी अनेक साधने उपलब्ध झालेली आहेत. त्यामुळे घरबसल्या अनेक सिनेमाचा आनंद प्रेक्षकांना घेता येतो. झी फाईवने ४ऑक्टोबरला आत्म शोधनाची हृदयस्पर्शी म्हणावी अशी 'कलर्स ऑफ लव्ह' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आणलेला आहे.**



प्रेम, नुकसान आणि स्वतःला शोधण्याच्या प्रवासातील आव्हानांचे अन्वेषण करणारा हृदयस्पर्शी चित्रपट, स्मरण साहू, भक्ती कूबावत, पवन चोप्रा, आणि दीपिका अमीन यांसारख्या प्रतिभावान कलाकारांच्या समावेशाने सजलेला आहे. हा चित्रपट दिव्येश लिम्बानीने लिखित आणि निर्देशित केला आहे आणि भारगव धामेलिया यांच्याकडून द्वारे निर्मित करण्यात आले आहे. ही कथा अवी शर्मा, एक आकर्षक तरुण डॉक्टर आणि सेक्स थेरपिस्ट यावर आधारित आहे, जो एका हृदयद्रावक ब्रेकअपनंतर निराशेच्या गर्तेत सापडतो. आपल्या प्रसिद्ध लेखक आई, विद्या शर्मा यांच्या संगोपनात वाढलेल्या अवीला, आनंदाच्या शोधात एक आत्म-शोधाचा प्रवास सुरू करावा लागतो, जिथे तो राजतला भेटतो, आणि त्याच्यासोबत प्रेम आणि उपचारांचे खरे सार उघड करतो.

अवी शर्मा यांच्या सुंदर प्रवासाचे वर्णन करते, जो एक प्रगतिशील सेक्स थेरपिस्ट आहे, ज्याला त्याच्या प्रसिद्ध लेखक आई विद्या शर्मा यांनी वाढवले आहे. मानवी मनोविज्ञानाचे सखोल ज्ञान असतानाही, अवी दोन भयंकर ब्रेकअपनंतर नैराश्यात जातो. शांतता शोधण्यात अयशस्वी झाल्यावर, तो राजत, एक प्रसिद्ध मानसोपचार तज्ञ, कडे जातो, आपल्या आईच्या सुचनेवर. अवी आपल्या गूढ भावना समोर आणत असताना, तो प्रेम आणि स्वतःबद्दल अनपेक्षित सत्ये उघड करू लागतो. ज्या वेळी आशा जवळ येते, त्यावेळी अतीताकडून एक अनपेक्षित संदेश येतो, जो त्याला जुन्या जखमांमध्ये आणि उपचारांच्या नव्या मार्गावर निवड करण्यास भाग पाडतो.

# बच्चन आणि महाराष्ट्रीयन जेवण

**भारतातल्या प्रत्येक अभिनेत्यासाठी महाराष्ट्र ही कर्मभूमी राहिलेली आहे. त्यामुळे उज्वल यशाबद्दल भरभरून बोलले जाते त्यावेळी या महाराष्ट्राबद्दल ते तेवढेच आपुलकीने बोलत असतात. अमिताभ बच्चन यांनी खूपदा महाराष्ट्राबद्दल गौरवास्पद उद्गार काढले आहे. त्याचबरोबर त्यांनी प्रत्यक्ष सहभागही दर्शवलेला आहे. अजय फणसेकर यांच्या 'अक्का' या चित्रपटांमध्ये त्यांनी सहभाग घेतला होता. काही मराठी चित्रपटांच्या प्रमोशनसाठी अमिताभ पुढे आले होते. सोनी इंटरटेनमेंट वाहिनी वरती 'कौन बनेगा करोडपती' या कार्यक्रमात कोणी महाराष्ट्रीयन कलाकार आला की त्याच्याबरोबर ते महाराष्ट्रातल्या एकंदरीत सांस्कृतिक चळवळीवर बोलत असताना, जीवनाविषयी ते बोलत असतात. यावेळी त्यांनी महाराष्ट्रीयन जेवणातला साधेपणा आणि श्रीखंड बद्दलचे भरपूर कौतुक केले आहे. त्यावेळी त्यांच्यासमोर बीडचे किशोर अहेर हे बसले होते.**



आगामी एपिसोडमध्ये स्पर्धात्मक परीक्षेची तयारी करत असलेला, लायब्ररीयन म्हणून काम करणारा किशोर आपल्या आजोबांच्या स्मृतीत आपल्या गावात एक शैक्षणिक संस्था उभी करण्याचे स्वप्न घेऊन आला आहे. या स्पर्धकांशी खाद्यपदार्थांविषयी खुमासदार गप्पा मारताना श्रीखंडाच्या आठवणीने बिग बींचे डोळे चमकले त्यांना आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या दिवसांची आठवण आली, जेव्हा त्यांच्या हातात फारसे पैसे नसायचे. त्या काळात ते मुंबईतल्या एका छोट्याशा महाराष्ट्रियन रेस्टॉरंटमध्ये जायचे, जिथे माफक दरात रुचकर जेवण मिळायचे. किशोरने बिग बींना वडा पाव वगळता, त्यांची आवडती महाराष्ट्रीयन डिश कोणती असे विचारल्यावर बच्चन यांनी विनाविलंब उत्तर दिले, वडा पाव तर आता जगभरात प्रसिद्ध झाला आहे पण श्रीखंड ही माझी आवडती मिठाई आहे. त्यात खरोखरच काही तरी खास असते.

मी जेव्हा पहिल्यांदा नोकरीच्या शोधात मुंबईत आलो, तेव्हा इथल्या स्थानिक खाद्य पदार्थांची मला माहिती नव्हती आणि माझ्याकडे फारसे पैसेही नसायचे. पण, तेव्हा हे रेस्टॉरंट मला सापडले. आता ते आहे की नाही मला माहीत नाही. अगदी कमी पैशात तिकडे महाराष्ट्रीयन जेवण मिळायचे.

# मराठी-गुजराती नाटक आदान प्रदान

**महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनाच्या वतीने विविध कार्यक्रम घेतले जातात यानिमित्ताने दोन भाषेचा सलोखा निर्माण होण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम राबवले जातात. 'महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमी' या संस्थेच्या वतीने आजच मराठी गुजराती नाटक आदान प्रदान हा विशेष उपक्रम होणार आहे. या निमित्ताने सदाबहार, अभीजात नाटकांचे अंशतः एकपात्री सादरीकरण या होणार आहे.**



दुर्गाराज जोशी, मोनिका ठक्कर यांच्या सूत्रसंचालनात सुजाता मेहता, रमेश भिडे, निखिला इनामदार, सतीश व्यास, प्रवीण कुमार व्यास हे कलाकार सहभागी होणार आहेत. या निमित्ताने डॉ. श्रीराम लागू ,डॉ. काशिनाथ घाणेकर, प्रभाकर पणशीकर, भक्ती बर्वे इनामदार, विजया मेहता या मराठी प्रज्ञावंत कलाकारांबरोबर गुजरातीतले उपेंद्र त्रिवेदी, प्रवीण जोशी, क्रांती मडिया, पद्माराणी, सरिता जोशी यांनी सादर केलेल्या नाटकाचे सादरीकरण येथे होणार आहे. यात अभिवाचनाचा सुद्धा सहभाग असणार आहे. डोंबिवली पूर्व येथे असलेल्या पेंढारकर सभागृहात आज सायंकाळी ५ वाजता हे नाटकाची देवाण-घेवाण होणार आहे. या कार्यक्रमाचा विनामूल्य प्रेक्षकांना आनंद घेता येईल. या आयोजनात ओमकार कला मंडळ आणि श्रीकला संस्कार ज्ञान यांनी ही पुढाकार घेतलेला आहे.

**जाहीरनामा कार्यक्रम : निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसची वाढली डोकेदुखी**

# शैलजा-सुरजेवालांची पाठ






चंदीगड, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. हरयाणा विधानसभा निवडणुकीसाठी मतदान आता तोंडावर आले आहे. अशात काँग्रेसमधील गटबाजी अजूनही मिटली नसल्याचे दिसत आहे. काँग्रेसने शनिवारी जाहीरनामा प्रसिद्ध केला. अनेक मोठ्या घोषणा काँग्रेसने केल्या आहेत. पण, जाहीरनाम्यातील घोषणांबरोबर चर्चा सुरू झाली आहे, ती खासदार कुमारी शैलजा आणि रणदीप सुरजेवाला यांच्या अनुपस्थितीची. दोन दिवसांपूर्वी राहुल गांधींच्या प्रचारसभेत पक्षात एकजूट असल्याचा संदेश दिला गेला, पण २ दिवसांतच त्याला छेद दिला गेला आहे. काँग्रेसने हरयाणा विधानसभा निवडणुकीसाठी जाहीरनामा प्रसिद्ध केला. या कार्यक्रमाला काँग्रेसचे हरयाणा प्रदेशाध्यक्ष उदय भान, माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत आणि माजी मुख्यमंत्री भूपेंद्र सिंह हुड्डा यांच्यासह काँग्रेसचे अनेक नेते उपस्थित होते. पण, जाहीरनामा प्रसिद्धी कार्यक्रमाला खासदार कुमारी शैलजा आणि रणदीप सुरजेवाला उपस्थित नसल्याचे दिसून आली. महत्त्वाची गोष्ट म्हणजे शैलजा आणि सुरजेवाला यांच्या गटातील कोणताही नेता काय कार्यक्रमाला हजर राहिला नाही. त्यामुळेच काँग्रेसमधील गटागटातील शीतयुद्ध मिटले नसल्याचे अधोरेखित झाले आहे.

**गहलोत,हुड्डांच्या हस्ते काँग्रेसचा जाहीरनामा प्रसिध्द :** हरयाणा विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने शनिवारी चंदीगडमध्ये आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. या ४० पानी जाहीरनाम्यात काँग्रेसने लोकांना २५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार आणि महिलांना दरमहा २००० रुपये देण्याचे आश्वासन दिले आहे. याशिवाय सतलज-यमुना लिंक कालव्यातून पाणी आणण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे. गेल्या सात दिवसांपूर्वी दिल्ली येथे काँग्रेस पक्षाने हरयाणातील जनतेसाठी, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या नेतृत्वाखाली 'सात वादे-पक्के इरादे' नावाने सात आश्वासनांची घोषणा केली होती. काँग्रेसने आपला जाहीरनामा जाहीर करताना, आपण सर्व घटकांवर लक्ष केंद्रित केल्याचे म्हटले आहे. तसेच, आपण मागील सरकारमध्ये दिलेली आश्वासने पूर्ण केल्याचा दावाही पक्षाने यावेळी केला आहे. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी हरयाणामध्ये एक मजबूत क्रीडा धोरण आणले जाईल. काँग्रेस नेते अशोक गेहलोत जाहीरनामा जाहीर करताना म्हणाले, आम्ही घोषणापत्र जाहीर केले आहे आणि काँग्रेसच सरकार स्थापन करेल, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे. या जाहीरनाम्याचा नियमितपणे आढावा घेतला जाईल आणि सर्व आश्वासने पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

## दलित समाजाचा मुख्यमंत्री व्हावा- कुमारी शैलजा

हरयाणातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसमध्ये अनेक ज्येष्ठ नेते मुख्यमंत्रीपदासाठी दावा करीत आहेत. दरम्यान, काँग्रेसमध्ये दलित समाजातून मुख्यमंत्री होऊ शकतो. दलित समाजाचीही ही मागणी आहे. काळानुरूप बदलही होत असतात. राहुल गांधींनाही दलित समाजाला पुढे आणायचे आहे आणि मुख्यमंत्री कोणाला करायचे हा निर्णय हायकमांड घेईल, असे काँग्रेसच्या खासदार कुमारी शैलजा यांनी सांगितले आहे.



सिरसाच्या खासदार कुमारी शैलजा यांनी शुक्रवारी कालनवली येथे निवडणूक प्रचार केला. काँग्रेसचे उमेदवार शिशपाल केहरवाला यांच्या समर्थनार्थ कुमारी शैलजा यांची जाहीर सभा झाली. यावेळी कुमारी शैलजा यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या की, हरयाणात भाजपाचा सफाया झाला आहे. काँग्रेस बहुमताने सरकार स्थापन करणार आहे. माझ्या रक्तात काँग्रेस आहे, मी मरेपर्यंत काँग्रेसमध्येच राहणार आहे.

# हायकोर्टाने मागवली गहाळ फाईल

## जामा मशीद प्रकरणात भारतीय पुरातत्व खात्याला कोर्टाने फटकारले



दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. दिल्ली हायकोर्टाने भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (एएसआय) च्या अधिकाऱ्यांवर नाराजी व्यक्त केली आहे. मुघल काळात राष्ट्रीय राजधानीतील जामा मशिदीला 'संरक्षित स्मारक' घोषित करू नये, असे नमूद असलेली तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या स्वाक्षरीची फाईल फाईल एएसआय अधिकारी सादर करू शकले नाहीत. हायकोर्टाने अधिकाऱ्यांना एक शेवटची संधी देत ऑक्टोबरमध्ये पुढील सुनावणीपर्यंत फाईल सादर करण्याचे आदेश दिले.

### ही अखेरची संधी

अखेरची संधी देत न्यायालयाने एएसआयच्या सक्षम अधिकाऱ्याला ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या सुनावणीच्या पुढील तारखेला या प्रकरणातील प्रतिज्ञापत्र आणि मूळ फाइल सादर करण्यास सांगितले. न्यायालयाने एएसआयच्या अतिरिक्त महासंचालकांना या प्रकरणाचे वैयक्तिक निरीक्षण करण्यास सांगितले आणि केंद्र सरकारचे वकील अनिल सोनी आणि मनीष मोहन यांची बैठक घेऊन सर्वसमावेशक प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे याची खात्री करावी. हायकोर्ट जनहित याचिकांवर सुनावणी करत होते ज्यात अधिकाऱ्यांना जामा मशीद संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याचे आणि त्याभोवतीचे सर्व अतिक्रमण हटवण्याचे निर्देश देण्याची मागणी केली आहे.



### याआधीच्या सुनावणीत दिले होते निर्देश

२८ ऑगस्ट रोजी हायकोर्टाने केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालय आणि एएसआय यांना मनमोहनसिंग यांच्या निर्णयाची फाईल सादर करण्याचे निर्देश दिले होते. सुनावणीदरम्यान खंडपीठाने आदेशाचे पालन न केल्याबद्दल एएसआय अधिकाऱ्याला प्रश्न विचारला आणि म्हणाले, फाइल कोण देत नाही? आम्ही सचिवांना बोलावू. २०१४ मध्ये, सुहेल अहमद खान आणि अजय गौतम यांनी दाखल केलेल्या जनहित याचिका (पीआयएल) प्रकरणांमध्ये जामा मशिदीचे इमाम मौलाना सय्यद अहमद बुखारी यांच्या 'शाही इमाम' या पदवीच्या वापरावर आणि त्यांच्या मुलाची नायब इमाम म्हणून नियुक्ती करण्यावर आक्षेप घेण्यात आला होता.

# भाजपाकडून पाकला 'क्लीन चिट'!

## दहशतवादाच्या मुद्यावरुन ओमर यांचा आरोप




जम्मू, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. शांततापूर्ण जम्मू प्रदेशातील प्राणघातक दहशतवादी हल्ले हे भाजपाच्या कथित अपयशाचे प्रतिबिंब आहे. त्यामुळे या पक्षाने जम्मू-काश्मीरच्या जनतेची माफी मागितली पाहिजे, असे मत नॅशनल कॉन्फरन्सचे (एनसी) उपाध्यक्ष ओमर अब्दुल्ला यांनी मांडले. केंद्रशासित प्रदेशातील दहशतवादासाठी एनसी, काँग्रेस आणि पीडीपीवर आरोप करून भाजपाने पाकिस्तानला 'क्लीन चिट' दिली आहे, असे ते म्हणाले. उधमपूर पूर्व विधानसभा मतदारसंघात 'एनसी'चे उमेदवार सुनील वर्मा यांच्या समर्थनार्थ आयोजित ओम यांनी निवडणूक सभा घेतली. यावेळी पत्रकारांशी बोलताना ओमर यांनी गृहमंत्री अमित शाहा यांच्यावर सडकून टीका केली.

**# QUICK NEWS**

## छपरा एक्स्प्रेसला उलथवण्याचा कट

बलिया, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. देशात रेल्वे अपघातांची मालिका सुरूच आहे. शनिवारी बलिया-छपरा रेल्वे सेक्शनच्या मांझी रेल्वे पुलाजवळ रेल्वे रुळावर दगड टाकून बदमाशांनी लखनौ-छपरा एक्सप्रेस रुळावरून उलथवण्याचा प्रयत्न केला. चालकाच्या समजुतदारपणामुळे मोठी घटना टळली. या प्रकरणाचे वृत्त समजताच रेल्वे विभागात खळबळ उडाली आहे. रेल्वे रुळावर नेमका किती मोठा दगड ठेवण्यात आला हे कळू शकलेले नाही. ज्या ठिकाणी दगड दिसला त्या पलीकडे घाघरा नदी वाहते. नदीत धूप रोखण्यासाठी जे कठडे टाकले आहेत, ते कुणीतरी रुळावर ठेवले होते. सकाळी १०.२० वाजता गाडी सुरेमानपूरहून छपरासाठी निघाली होती, चालकाला मांझी पुलापूर्वी बकुल्हा-मांझी दरम्यान १८-१० किमी अंतरावर एक मोठा दगड पडलेला दिसला. चालकाने आपत्कालीन ब्रेक लावून ट्रेन थांबवली, त्यामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. इमर्जन्सी ब्रेकिंगमुळे इंजिनच्या सेफ्टी गार्डचे नुकसान झाले. ड्रायव्हर, गार्ड आणि प्रवाशांनी दगड हटवला आणि ट्रेन पुढे सरकली.

**चालकामुळे टळला अपघात**

## हरयाणात गृह मतदानाला सुरूवात

चरखी दादरी. भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार, दादरी आणि बध्रा विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षांवरील आणि ४० टक्क्यांहून अधिक अपंग मतदारांचे घरोघरी जाऊन मतदान करण्याचे काम शुक्रवारी सुरू झाले. दादरी जिल्हा प्रशासनाने घरोघरी मतदानासाठी सहा चमू तयार केल्या होत्या. यातील तीन पथके दादरी विस परिसरात तर तीन पथके बध्रा विस परिसरात शुक्रवारी रवाना झाली होती. संध्याकाळपर्यंत संघांकडून घरोघरी मतदान सुरू होते. शनिवारीही चमूनी गृह मतदान विविध ठिकाणी करून घेतले.

## विक्रमादित्य सिंह यांना सुक्खुंचा धक्का

शिमला, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. उत्तर प्रदेशच्या धर्तीवर रस्त्यावरील विक्रेते आणि भोजनालयांना त्यांच्या दुकानांसमोर नामफलक लावण्याची परवानगी देण्याच्या निर्णयावरून हिमाचल प्रदेशातील सुक्खू सरकारमध्ये गदारोळ झाला आहे. आता मात्र हा निर्णय झाला नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. यावर सुख्खू सरकारने स्पष्टीकरण दिले आहे. राज्य सरकारच्या प्रवक्त्याने सांगितले की, पथविक्रेते धोरणाबाबत समाजातील विविध घटकांकडून सूचना प्राप्त झाल्या असून या प्रकरणाच्या प्रत्येक पैलूचा संवेदनशीलतेने विचार केला जात आहे.

## लाच दिल्याशिवाय काम होत नाही: चौहान

रांची, एजन्सीज. झारखंडमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होतो, पैशाशिवाय येथे काहीही होत नाही. हेमंत सोरेन यांच्या नेतृत्वाखालील सरकारने विविध योजनांसाठी केंद्रीय निधीचा दुरुपयोग केला. मनरेगासाठी मिळालेल्या निधीच्या विनियोगाची चौकशी सुरू करण्यात येणार असल्याचे केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितले. चौहान म्हणाले की, जनता जेएमएमच्या नेतृत्वाखालील आघाडीला त्याच्या चुकीच्या कारभारासाठी कधीही माफ करणार नाही. या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या झारखंड विधानसभा निवडणुकीत त्यांनी मतदारांना या "भ्रष्ट" सरकारला सत्तेतून काढून टाकण्याचे आवाहन केले.

# कुणी घर देता का घर

## केजरीवालांसाठी घराचा शोध सुरू

दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल लवकरच दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांचे अधिकृत निवासस्थान रिकामे करणार आहेत. शहरातील सिव्हिल लाइन्स परिसरात आणि नवी दिल्ली मतदारसंघाजवळ नवीन घरांसाठी शोध सुरू आहे. पक्षांनी शनिवारीच ही माहिती दिली. महिन्याच्या सुरुवातीला दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणारे केजरीवाल म्हणाले की, ते त्यांचे अधिकृत 'फ्लॅगस्टाफ रोड' निवासस्थान नवरात्रीच्या काळात रिकामे करणार आहेत. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापासून नवरात्रोत्सव सुरू होतो. आम आदमी पार्टीने एका निवेदनात म्हटले आहे की, अरविंद केजरीवाल लवकरच मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान रिकामे करतील आणि त्यांच्या नवीन निवासस्थानासाठी शोधमोहीम तीव्र करण्यात आली आहे. केजरीवाल दिल्ली विधानसभा मतदारसंघाजवळ घर शोधत आहेत कारण त्यांना तेथील लोकांशी संपर्क साधायचा आहे.

### मतदान यादीतून 'आप' समर्थकांचे नावे वगळण्याच प्रयत्न

आम आदमी पार्टीचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संघावर निशाणा साधला आहे. भाजपा मतदान यादीतून आप समर्थकांची नावे मतदार यादीतून काढून टाकण्यात व्यस्त आहे, असा खळबळजनक आरोप केजरीवाल यांनी केला आहे. येत्या फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाचा पराभव होणार आहे, याची जाणीव त्यांना झाली आहे. भाजपाने आप मतदारांची ओळख पटविण्यासाठी आणि मतदार यादीतून त्यांची नावे काढून टाकण्यासाठी शहरातील भागात पगारी कर्मचारी तैनात केले आहेत.



**जुलानाचा संग्राम ● जाट व्होटबँक विभागली तर वाढू शकतात फोगटच्या अडचणी**

# कविता दलाल यांच्या एंट्रीने रंगत

**विधानसभा दंगल**

चंदीगड, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. विनेश फोगट आणि कविता दलाल या दोन आंतरराष्ट्रीय स्तरावरील महिला कुस्तीपटू आमनेसामने आल्यानंतर येथील जुलाना मतदार संघातील निवडणूक अधिकच रंजक बनली आहे.

जंतरमंतर ते पॅरिस ऑलिम्पिकपर्यंत कुस्तीपटूंच्या लैंगिक शोषणाच्या प्रकरणात संघर्ष करताना दिसलेल्या विनेशसाठी जुलानाची राजकीय दंगल हे एका मोठ्या आव्हानापेक्षा कमी नाही. १५ वर्षांपासून येथे विजयाच्या प्रतीक्षेत असलेल्या काँग्रेसचे खाते उघडण्याची मोठी जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आहे. सहानुभूतीच्या जोरावर काँग्रेस आणि विनेशला येथे विजयाची आशा आहे, मात्र जातीचा सापळा विजयात अडथळा ठरत आहे. जाट प्राबल्य असलेल्या जुलानामध्ये गैर-जाट मतदारांना कमी लेखणे महागात पडू शकते. जाट आणि गैर-जाट मतदारांच्या ध्रुवीकरणाच्या जोरदार प्रयत्नांमध्ये भाजपाचे कॅप्टन योगेश बैरागी थेट लढत देत आहेत.

**दोन खेळाडू सेवानिवृत्त अधिकारी, कॅप्टन यांच्या रंगतदार लढत:** जुलानाची जागा प्रसिद्ध करण्यासाठी विनेशचे नाव पुरेसे होते, पण 'आप'ने ती प्रसिद्ध करण्यात कोणतीही कसर सोडली नाही. आपने डब्ल्यूडब्ल्यूई आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू आणि कविता दलाल, ज्यांनी या खेळात पहिली भारतीय महिला होण्याचा विक्रम केला आहे, त्यांना उमेदवार म्हणून निवडले आहे. कविता ही मुळात जुलानाची मुलगी आणि विनेश ही या ठिकाणची सून. सून आणि सून यांच्यातील भांडणामुळे लोकांची कोंडी वाढली आहे. ती केवळ खेळाडूंसाठीच नाही तर समाजातील सर्व घटकांसाठी बोलणार असल्याचे विनेशचे म्हणणे आहे. शेतकऱ्यांसोबतच सैनिक आणि मागासलेल्या लोकांचे प्रश्नही त्या मांडणार आहेत.



त्याचवेळी व्हीआरएस घेऊन भाजपामध्ये दाखल झालेल्या डॉ.सुरेंद्र लाथेर यांना तिकीट न मिळाल्याने त्यांनी इनेलोमध्ये प्रवेश केला. अभय चौटाला यांनीही त्यांना लगेच उमेदवार घोषित केले. जननायक जनता पक्षाचे विद्यमान आमदार अमरजित सिंह धांडा हेही जुलाना मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. राजकीय परिस्थिती पाहता लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभेतही जाट मतदार एकत्र येण्याची शक्यता आहे. तसेच बिगर जाट मतदारांचीही गर्दी होत आहे. विनेश फोगट यांचे गावागावात जल्लोषात स्वागत होत आहे, परंतु शहरातील मतदार शांत आहेत आणि अद्याप त्यांचे पत्ते उघडत नाहीत. मुद्द्यांऐवजी इथे विनेश फोगटचा जास्त उल्लेख आहे.

## देशात बेरोजगारी आहे की नाही ?



दिल्ली, पंतप्रधानांनी हे सांगावे की तरुणांची बेरोजगारी आहे की नाही. २०२३-२४ मध्ये हा दर १०.२ टक्के राहिला नाही. पीरियडिक लेबर फोर्स सर्व्हेच्या आकडेवारीचा दाखला देत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला.

# झारखंडचा जाहीरनामा भाजपा ३ ऑक्टोबरला जारी करणार

रांची, (ए). झारखंडमधील विधानसभा निवडणुकीसाठी भाजपा आपला जाहीरनामा ३ ऑक्टोबरपासून जारी करेल अशी माहिती आसामचे मुख्यमंत्री हिमंता विश्व सरमा यांनी दिली आहे. ८१ सदस्यीय झारखंड विधानसभेच्या निवडणुका या वर्षाच्या अखेरीस होणार आहेत आणि पुढील महिन्यात तारखा जाहीर होण्याची शक्यता आहे. पक्षाच्या निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतल्यानंतर सरमा यांनी शुक्रवारी पत्रकारांना सांगितले की, "आम्ही ३ ऑक्टोबरपासून आमच्या जाहीरनाम्यातील मुख्य मुद्दे प्रसिद्ध करू. पंतप्रधान नरेंद्र मोदी २ ऑक्टोबर रोजी हजारीबागमध्ये भाजपाच्या परिवर्तन यात्रेच्या समारोप सभेला संबोधित करणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाहा यांनी सुरू केलेल्या भाजपाच्या 'परिवर्तन यात्रे'चे २ ऑक्टोबरपर्यंत राज्यातील २४ जिल्ह्यांतील ८१ विधानसभा मतदारसंघांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट आहे. ५,४०० किलोमीटर अंतर पार करावे लागेल.



### भाजपा मित्र पक्षांसोबत निवडणूक लढवेल

आसामचे मुख्यमंत्री हिमंता विश्व सरमा यांनी शनिवारी जाहीर केले की भाजपा झारखंडमधील आगामी विधानसभा निवडणुका रालोआच्या नेतृत्वात लढेल. मित्र पक्ष ऑल झारखंड स्टुडंट युनियन (AJSU) आणि जनता दल (युनायटेड) सोबत घेईल. मित्रपक्षांमधील जागावाटपाचा करार अंतिम टप्प्यात आहे. मित्रपक्षांशी ९९ टक्के जागांवर करार झाला आहे. उर्वरित एक-दोन जागांसाठी बोलणी सुरू आहे.


**महावितरण — ई-निविदा सुचना**

महावितरण कंपनी, बारामती ग्रामीण मंडल व मंडलांतर्गत विभागीय कार्यालय बारामती, केडगांव व सासवड येथे तांत्रिक, यंत्रचालक व अतांत्रिक रिक्त पदांच्या जागेवर ठेकेदारामार्फत बाह्यस्त्रोत पध्दतीने कंत्राटी कामगार नेमण्याकरीता नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदारांकडून तांत्रिक बोली व वाणिज्य बोली पध्दतीने निविदा क्र.२४,२५,२६ व क्र. २७/२४-२५ द्वारे १ वर्षाच्या कालावधीकरीता निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर निविदा महावितरण कंपनीच्या http://works.mahadiscom.in/e-tender/etender या संकेतस्थळावर दि.२८.०९.२०२४ ते दि.१४.१०.२०२४ या कालावधीत विक्रिकरीता उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारीख दि. १४.१०.२०२४ रोजी १७.०० पर्यंत राहील.

टीप : कोणत्याही टप्प्यावर निविदा रद्द करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहील.

HO PR No.230/24 Dt.27.09.2024 — अधीक्षक अभियंता(बाग्रामं) महावितरण, बारामती ग्रामीण मंडल.

**उत्तर मध्य रेल्वे**

ई-निविदा सूचना क्र. : JHS-N-W-59-24 — दिनांक : २६.०९.२०२४

ई-निविदा सूचना

वरि. विभागीय सिग्नल व दूरसंचार अभियंता/झाशी, डीआरएम यांचे कार्यालय, झाशी हे भारताचे राष्ट्रपती व त्यांच्यावतीने खालील कामांकरिता ऑनलाइन (ई-टेन्डरिंग) द्वारे खुली निविदा आमंत्रित करत आहेत.

ई-निविदा क्र. : JHS-N-W-59-24

कामाचे विवरण : झाशी विभागाच्या व्हीजीएलजे ते डीएचओ च्या अनुभागातील ट्रॅकसहित डब्ल्यू मेटल कॅटल बॅरियरच्या अभियांत्रिकी संबंधित कामांसहित एस अँन्ड टी कामांची तरतूद करणे.

अंदाजित मूल्य : रु. ४,६९,२५,८८३.१४ | इसारा रक्कम : रु. ३,८४,६००/-

निविदा प्रपत्राचे मूल्य : निल | निविदा उघडण्याची तारीख : दि. २१.१०.२०२४ रोजी दु. ३.०० वा.

स्वीकृती पत्र जारी होण्याच्या तारखेपासून पूर्णत्व कालावधी : १२ महिने

• ऑनलाइन निविदा दि. २१.१०.२०२४ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत सादर करत आहेत. • संपूर्ण माहिती व बोलीच्या सादरीकरणाकरिता कृपया भारतीय रेल्वेची वेबसाइट www.ireps.gov.in (NORTH CENTRAL RLY/JHANSI DIVISION- S AND T) वर पहा. 1716/24 (MG)

North central railways @CPRONCR www.ncr.indianrailways.gov.in

**पश्चिम रेल्वे – अहमदाबाद (सर्वेक्षण व बांधकाम) ई – निविदा सूचना**

ई – निविदा क्र. : Dy.CE-C-V-DSL-NLY-11, Date : 25.09.2024. उपमुख्य अभियंता (बांधकाम) ५, पश्चिम रेल्वे, अहमदाबाद हे भारताच्या राष्ट्रपतींकरिता व त्यांच्या वतीने खालील कामाकरिता ई -निविदा मागवीत आहेत. १. कामाचे वर्णन व त्याचे ठिकाण : Dy.CE-C-V-DSL-NLY-11, २. कामाचे वर्णन : पश्चिम रेल्वेच्या अहमदाबाद विभागावर भूज - नलिया गेज परिवर्तन प्रकल्पासंदर्भात भूज - नलिया अनुभागादरम्यान भूज स्थानकात पोहोच मार्गासमवेत प्रवासी सुविधा, डिफेन्स लोडिंग प्लॅटफॉर्म, टो/अर्थ रिटेनिंग वॉलचे बांधकाम व लँड बाऊंड्री पोस्ट/पिलरची तरतूद आदी कामे. ३. कामाचे अंदाजित मूल्य : रु. ३९,०७,५९,६०४.८२, ४. बोली सुरक्षा : रु. २१,०३,८००.००, ५. निविदेचा प्रकार : द्वी पॅकेट प्रणाली, ६. कार्यपूर्तता कालावधी : ४ महिने, ७. समाप्ती दिनांक व वेळ : दि. १७.१०.२०२४ रोजी दु. ३.०० वा. ८. वेबसाइटचा तपशील व सूचना फलकाचे ठिकाण जेथे संपूर्ण तपशील पाहता येऊ शकेल व कार्यालयाचापत्ता : www.ireps.gov.in, उपमुख्य विद्युत अभियंता (बांधकाम) ५ यांचे कार्यालय, पश्चिम रेल्वे, अहमदाबाद. 51

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

**पश्चिम रेल्वे – वडोदरा विभाग — अभियांत्रिकी विभाग**

ई – निविदा सूचना क्र. : DYCE-BR-BRC-17-2024 उपमुख्य अभियंता (ब्रिज - लाइन),वडोदरा, पश्चिम रेल्वे, प्रतापनगर, वडोदरा - ३९० ००४ हे भारताच्या राष्ट्रपतींकरिता व त्यांच्या वतीने खालील कामांकरिता ई - निविदा मागवीत आहेत. अ.क्र. : १, निविदा क्र. : DYCE-BR-BRC-17-2024, कामाचे वर्णन : पश्चिम रेल्वेच्या विविध अनुभागांवर एसएसई बीआर बीआरसी यांच्या कार्यक्षेअंतर्गत पूल क्र. आरओबी - ८ए, ४५२, ४९ एडीएन च्याएका स्पानचे इन्स्ट्रूमेंटेशन व कंडिशन मॉनिटरिंगचा वापर करून विद्यमान पुलांचे निर्धारण. कामाचे अंदाजित मूल्य : रु. १,७३,४६,४५०.००, जमा करावयाची बोली सुरक्षा : रु. २,३६,७००.००, ई –निविदा सादरीकरण व ई –िनविदा उघडण्याची तारीख व वेळ : ऑनलाइन निविदा दि. २५.१०.२०२४ रोजी दु.३.०० पूर्वी सादर करण्यात यावी व त्याच दिवशी दु. ३.३० वाजता उघडण्यात येईल. वेबसाइटचा तपशील व सूचना फलकाचे ठिकाण जेथे संपूर्ण तपशील पाहता येऊ शकेल : वेबसाइट www.ireps.gov.in, उपमुख्य अभियंता (ब्रिज लाइन), वडोदरा पश्चिम रेल्वे, प्रतापनगर, वडोदरा - ३९० ००४. 187

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

अ‍ॅड. जयश्री शिंदे

**घोडेगाव येथील मे. श्रीमती एम. एस. माळी सो. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर घोडेगांव ता. आंबेगांव जि. पुणे, यांचे कोर्टात**

**जाहिर समन्स**

रे. मु. नं. १२९/२०२१ निशाणी क्र. ५६

सखाराम राउ पिंगळे ....वादी

विरुध्द

प्रतिवादी क्र. ५ रामदास तुकाराम पिंगळे रा. अंकित को.ऑप. सोसायटी, प्लॉट नं. १२२ रुम नं. २५, आशा हॉटेजी गल्ली, छत्रपती शिवाजीराजे मैदान, चारकोप, कांदीवली पश्चिम, मुंबई ४०००६७ ...प्रतिवादी

ज्यापेक्षा वादी यांनी तुमच्याविरुध्द वाटप व निरंतर मनाईचा दावा दाखल केला आहे, म्हणून सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी तुम्हाला याद्वारे दि. ११/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता घोडेगांव येथील मा. न्यायालयात जातीने हजर राहण्यासाठी बोलावण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्टयर्थ तुम्ही ज्यांचा आधार घेवू इच्छिता असे सर्व दस्तऐवज त्या दिवशी रुजू करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत वादाची सुनावणी होवून निर्णय देण्यात येईल याची दखल घ्यावी.

तसेच, तुम्हाला अशीही दखल देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पूर्वी तुम्ही बजावणीसाठी तुमचा पत्ता दाखल न केल्यास तुमचा बचाव रद्द होण्यास पात्र ठरेल.

आज दि. २६/०९/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — हूकूमावरून, सही/- सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय, घोडेगांव

**स्वप्नसिध्दी को-ऑप. हौ. सोसायटी (लिमिटेड)**

नोंदणी क्र.: एम.यू.एम./एम. एम. आर. डी. ए./एच.एस.जी.(टी.सी.)/१५४/२००८-०९

CTS-NOS 100(PT) 115 (PT) 146, 146/1/2, 147, 148(PT) New CTS Nos. 148B/1 to 10

बिल्डिंग नं. -डीआर-१, एम.एम.आर.डी.ए. वसाहत, शिवाजी नगर, राम मंदिर रोड, गोरेगांव (प.), मुंबई - ४०० १०४.

**जाहिर नोटीस**

या नोटीस द्वारे सर्वांना कळविण्यात येते की संस्थेमधील सदनिका क्र. 604 ही MMRDA मार्फत सिप्ते हसन जलील यांच्या नावे दिनांक 22/05/06 रोजी वितरित करण्यात आली आहे. त्यांचे निधन दिनांक 18/06/2014 साली झाले आहे. तसेच त्याची पत्नी कै. अहमदी बेगर सिप्ते हसन शेख यांचे निधन 22/03/2020 रोजी झाले आहे. या सदनिकेची वारस म्हणून अख्तरी बेगम यांनी मुलगी या नात्याने भाग दाखला व हित संबंध सदनिका आपल्या नावे करण्यात यावे असा अर्ज संस्थेमध्ये दिला आहे. तसेच परिशिष्ट-17 नुसार कागदपत्र सोबत जोडले आहे. या सदनिकेवर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कर्ज असल्यास किंवा इतर कोणी वारस असल्यास ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून 15 दिवसात त्यानी संस्था अध्यक्ष/सचिव, यांच्याकडे तक्रार दाखल करावी. त्या 15 दिवसात कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार दायल न झाल्यास अख्तरी बेगम ह्या एकमेव मुलगी वारस आहे असे समजून त्यांची शिफारस मा. उपनिबंधक सहकारी संस्था. 1st मलजा MMRDA वान्द्रे पूर्व मुंबई-51 यांच्याकडे करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार संस्था स्विकारणार नाही तसेच कोणत्याही प्रकारचे नुकसान संख्या भरून देणार नाही ह्याची सर्वांनी नोंद घ्यावी. धन्यवाद

| मयत सभादांचे नाव | स. क्रमांक | वारसदार अर्जदार |
|---|---|---|
| शेख सिप्ते हसन जलील | 604 | अख्तरी बेगम / मुलगी |

स्वप्नसिध्दी को.ऑ.है.सो.लि. यांच्या वतीने

**पश्चिम रेल्वे – राजकोट विभाग — विविध कामे**

ई – निविदा सूचना क्र. : 23 of 2024-25, date 23.09.2024 कार्यालयाचा पत्ता : विभागीय रेल्वे व्यवस्थापक (अभियांत्रिकी), पश्चिम रेल्वे, कोठी कम्पाऊंड, राजकोट, गुजरात -३६० ००१. वेबसाइट : www.ireps.gov.in.

| अ. क्र. | ई – निविदा क्र. | कामाचे वर्णन | अंदाजित एनआयटी मूल्य | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | DRM - RJT - 2024-25 - E - 53 | एक वर्ष कालावधीकरिता सहाय्यक विभागीय अभियंता, राजकोट यांच्या कार्यकक्षेअंतर्गत पुलांची वार्षिक दुरुस्ती व देखभाल. | रु. ९९,०१,६९०.०० | रु. १,९८,०००.०० |
| २. | DRM - RJT - 2024-25 - E - 54 | राजकोट विभाग : अ) सुरेंद्र नगर - धांगध्रा कॉलनीच्या क्वार्टर्समध्ये (ब्लॉक क्र. एम१ ते एम २१ - एकूण ३८ युनिट्स) पाणी व्यवस्था, डब्ल्यूसी, बाथरूम, किचन, बॅक झफरी, फ्रन्ट व्हरांडा कोर्टयार्ड यांची सुधारणा. ब) सुरेंद्रनगर येथील डीएचजी कॉलनीच्या स्टाफ क्वार्टर्समध्ये गळणारे छत, नाले प्रणाली, पाणी व्यवस्था, डब्ल्यूसी बाथ, किचन, दरवाजे, खिडक्या, झफरी व्हरांडा व सी/वाय यार्ड, रोड येथे दुरुस्ती कामे व उद्यान सुधारणा कामे. क) लीलापूर रोड, बजरंगपुरा व बाला रोड - वरिष्ठ अनुभाग अभियंता (कार्ये), सुरेंद्रनगरअंतर्गत प्लॅटफॉर्म कॉपिंगची दुरुस्ती व वॉर्निंग टाइल व प्लॅटफॉर्म पृष्ठभाग कामांची तरतूद. | रु. ४,०९,६५,०००.७१ | रु. ३,५४,८००.०० |
| ३. | DRM - RJT - 2024-25 - E - 55 | वांकानेर - क्वार्टर नं. एम/३५, एम/३७, एम/३९, टी/१४, टी /१५, एम/३२, टी/२३, ईएल/३३ व टी/११ येथील मंगलोर टाइल रूफ बदलण्याचे काम. | रु. ७६,१०,९०६.१४ | रु. १,५२,२००.०० |

वरील सर्व निविदांकरिता : निविदा उघडण्याची तारीख व वेळ – दि. १५.१०.२०२४ रोजी दु. ३.०० वा.

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly • आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly 98

**उत्तर मध्य रेल्वे — शुद्धिपत्रक क्र. २**

निविदा सूचना क्र. : एनसीआर एस अॅन्ड टी, ईपीसी - कवच - डीएचओ - बीना, दि.०९.०८.२०२४

कामाचे वर्णन : उत्तर मध्य रेल्वेच्या झाशी विभागाच्या धौलपूर (वगळता) - बीना (वगळता) अनुभागावर पाठीच्या कण्याच्या स्वरूपात टॉवरव ४ बाय ४८ फायबर ओएफसी समवेत कवच (ट्रेन टक्कर बचाव प्रणाली) ची तरतूद.

वरील निविदा क्रमांकाच्या आरएफपीच्या परि. १.३ (बोली प्रक्रियेचे शेड्युल) मध्ये खालील बदल करण्यात आले आहेत.

| SN | Event Description | Existing date | Revised date |
|---|---|---|---|
| 5 | Last date of Request for Bid Document | 30.09.2024 up to 11:00 Hrs | 29.10.2024 up to 11:00 Hrs |
| 6 | Bid Due Date | 30.09.2024 up to 16:00 Hrs | 29.10.2024 up to 16:00 Hrs |
| 7 | Physical Submission all documents listed in clause no 2.11.2 | 07.10.2024 up to 11:00 Hrs | 07.11.2024 up to 11:00 Hrs |
| 8 | Opening of Technical Bids at venue 2.11.4 (i) | 09.10.2024 at 11:00 Hrs | 08.11.2024 at 11:00 Hrs |

1439/24 (ADM)

North central railways www.ncr.indianrailways.gov.in

**NATIONAL AGRICULTURAL COOPERATIVE MARKETING FEDERATION OF INDIA LTD.**

NAFED

Through its NAFED Mumbai Branch at 'A' wing, Unit No. 803, 8th floor, Naman Centre, C- 31, G Block, Bandra Kurla Complex, Mumbai 400051

Proposal for hiring of Mobile Vans for sale of Onion in retail packs through NAFED'S Fair Price Points in the State of Maharashtra

NAFED Mumbai invites proposal for hiring of Mobile Vans for sale of Onion in retail packs through NAFED'S Fair Price Points in Maharashtra. Interested parties can visit the above address for the details of terms and conditions.

State Head NAFED Mumbai

**उत्तर मध्य रेल्वे — ई-टेन्डरिंग निविदा सूचना**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्ये), उ.म.रेल्वे, झाशी हे भारताचे राष्ट्रपती व त्यांच्यावतीने खालील कामांकरिता ऑनलाइन (ई-टेन्डरिंग) द्वारे खुली निविदा आमंत्रित करत आहेत.

ई-निविदा क्र. : JHS-ENGG-GSU-2024-22 | अंदाजित मूल्य : रु. १,८९,१५,३६४.१५

कामाचे विवरण : झाशी विभागातील क्षमता ११०००० लिटरसहित ०५ आरसीसी ओव्हरहेड टॅंकसहित ०५ जुन्या स्टील ओव्हरहेड टॅंकची रिप्लेसमेन्ट कार्य.

इसारा रक्कम : रु. २,४४,६००/- | निविदा बंद होण्याची तारीख : दि. १७.१०.२०२४ रोजी दु. ३.०० वा.

स्वीकृती पत्र जारी होण्याच्या तारखेपासून पूर्णत्व कालावधी : १२ महिने

• ऑनलाइन निविदा दि. १७.१०.२०२४ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत सादर करत आहेत. • संपूर्ण माहिती व बोलीच्या सादरीकरणाकरिता कृपया भारतीय रेल्वेची वेबसाइट www.ireps.gov.in वर पहा. 1718/24 (D)

North central railways @CPRONCR www.ncr.indianrailways.gov.in

**युनियन बँक ऑफ इंडिया Union Bank of India**

अ‍ॅसेट रिकव्हरी मॅनेजमेंट ब्रॅन्च :– मेझानाईन मजला, २१, वीणा चेंबर्स, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई – ४००००१, वेबसाइट : www.unionbankofindia.co.in ई-मेल : ubin0553352@unionbankofindia.bank,

**(नियम – ८(१)) ताबा सूचना**

ज्याअर्थी, अधोहस्ताक्षरीत युनियन बँक ऑफ इंडिया, युनियन बँक ऑफ इंडिया, मुंबई अंतर्गत प्राधिकृत अधिकारी यांनी सीक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट (द्वितीय) अ‍ॅक्ट, २००२ व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या अंतर्गत अनुच्छेद १३(२) सहवाचन नियम ३ अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये कर्जदार/गहाणवटदार/हमीदार मे. सुभलेन फॅब्रिक्स (प्रोप्रा. महेश गुप्ता एचयूएफ), श्री. महेश गुप्ता, श्रीमती मयत एम. गुप्ता, श्री. अनुज एम. गुप्ता यांना सदर सूचनेत निर्देशित थकीत रक्कम रु. ९,०५,८२,२६२.९३/– (रु. नऊ करोड पाच लाख ब्याऐंशी हजार दोनशे बासष्ट व त्र्याण्णव पैसे मात्र) सहित दि. ३१.०७.२०२३ रोजी नुसार व्याज (मूल्य समाविष्ट) दिलेले आदी रकमेचे प्रदान सदर सूचनेच्या स्वीकृती तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्याचे निर्देश देणारी मागणी सूचना दि. ०२.०९.२०२३ रोजी जारी केली होती.

कर्जदार/गहाणवटदारांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना कर्जदार/गहाणवटदारांनी व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांनी सदर कायदा सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या अंतर्गत अनुच्छेद १३(४) सहवाचन सदर नियमाच्या नियम ८ अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा दि. २५.०९.२०२४ रोजी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार/गहाणवटदारांनी व आम जनतेस इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात व्यवहार करू नये व असे कोणतेही व्यवहार हे युनियन बँक ऑफ इंडिया, एआरएमबी, मुंबई शाखेच्या प्रभारांतर्गत थकीत रक्कम रु. ९,०५,८२,२६२.९३/– (रु. नऊ करोड पाच लाख ब्याऐंशी हजार दोनशे बासष्ट व त्र्याण्णव पैसे मात्र) सहित दि. ३१.०७.२०२३ रोजी नुसार व्याज (खर्च व दि. ०१.०८.२०२३ पश्चातचे व्याज समाविष्ट) आदी रकमेच्या अधीन असतील.

**स्थावर मालमत्तेचे विवरण**

फॅक्टरी जमिनीचा सर्व भाग व भूखंड धारक व इमारत स्थित प्लॉट क्र. १८(पार्ट) व जुना सर्व्हे क्र. २५९/१/१पी (नवीन सर्व्हे क्र. १०४०/२ व मोजमापित क्षेत्र २६४९.०० चौ.मीटर आदेश क्र. एस अॅन्ड एसओ/जीएनएल/करेक्ट./दादरा/प्रोमिंग/३२/२०२४/२६४ वरील दि. ०४.०४.२०२४ नुसार, सर्व्हे व सेटलमेन्ट ऑफिसर, सिलवासाद्वारे मंजूर) गाव दादरा, नवनित शहा इंडस्ट्रीअल इस्टेट, गुप्ता सिन्थेटिकजवळ, ऑफ दमाणी रोड, दादरा नगर हवेली, पिन- ३९६२३०. मे. सुभलेन फॅब्रिक्स (प्रोप्रा. महेश गुप्ता एचयूएफ) यांच्या मालकीची.

दिनांक : २५.०९.२०२४ ठिकाण : मुंबई — सही/- किशोर चंद्र कुमार, प्राधिकृत अधिकारी, युनियन बँक ऑफ इंडिया

**पश्चिम रेल्वे – भावनगर विभाग — विविध अभियांत्रिकी कामे**

क्र. : W/118/NIT/E-Tender/2024-25/WA/22, date : 23.09.2024 ई – निविदा क्र. : 107 - 2024-25 to 113-2024-25-R. विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्ये), पश्चिम रेल्वे, भावनगर परा हे खालील कामांकरिता ई - निविदा मागवीत आहेत.

निविदा तपशील खालीलप्रमाणे आहे :

| अ. क्र. | ई – निविदा क्र. | कामाचे वर्णन | निविदा मूल्य (रु.) | इरठे (रु.) |
|---|---|---|---|---|
| १. | 107 /2024-25 | धासा - राजुला अनुभाग : पीआरसीएल लाइनमध्ये किमी २०/३-४ येथे पूल क्र. १७ च्या वॉटर वेजूचा विस्तार तसेच उल्लंघन रोखण्यासाठी ट्रॅक संरक्षण काय४. | रु.७,९१,७६,६२९.४० | रु. ५,४५,९००.०० |
| २. | 108/ 2024-25 | एलएचएस नं. ४४/बी (जुना एलसी नं. ३५) - आयआयटी गांधीनगर यांच्याद्वारे शिफारस केल्यानुसार सुरक्षित वाहतुकीकरिता तसेच पाणी गळती रोखण्याकरिता एलएचएसची दुरुस्ती. | रु. ८,६२,२६०.२८ | रु. १७,३००.०० |
| ३. | 109/ 2024-25 | पीआरसीएल लाइनमध्ये सुरेंद्रनगर - धोला दरम्यान किमी १०/२-३ येथे लेव्हल क्रॉसिंग क्र. १११ च्या ठिकाणी एलएचएसचे बांधकाम. | रु. ६,३०,१२,६५४.३९ | रु. ४,६५,१००.०० |
| ४. | 110/ 2024-25 | मलिया हातिना - स्थानकात लिफ्टच्या तरतुदीसह एफओबीचे बांधकाम. | रु. ३,६६,८७,१४०.८३ | रु. ३,३३,४००.०० |
| ५. | 111/ 2024-25 - R | वेरावल व पोरबंदर येथे ०२ स्थानकांत डॉग केनेलचे बांधकाम. | रु. ८९,९१,१६८.२७ | रु. १,७९,८००.०० |
| ६. | 112/ 2024-25- R | समूह कार्य - १) एडीईएन - जुनागढ उपविभाग : जेतलसर - सोमनाथ अनुभागावर लेव्हल क्रॉसिंग स्लीपर्स व चेक लेल्स बदलणे व त्यांची तरतूद करणे. बी) एडीईएन - जुनागढ उपविभाग : जेतलसर - सोमनाथ अनुभागावर ४ अंशांहून अधिक वक्राकार स्वरूपात स्लॅक गेज स्लीपरची तरतूद. | रु. ७६,५७,२७५.२५ | रु. १,५३,२००.०० |
| ७. | 113/ 2024-25- R | भावनगर विभाग - जुने टाइप २ व टाइप ३ स्टाफ क्वार्टर्सचे एसी शीट रूफिंग बदलण्याचे कार्य. | रु. २,१३,४१,१००.०८ | रु. २,५६,७००.०० |

वरील सर्व निविदांकरिता : बोली प्रारंभ दिनांक – ०१.१०.२०२४, बोली समाप्ती दिनांक – १५.१०.२०२४. एनआयटी रेल्वे वेबसाइट www.ireps.gov.in वर दि. २३.०९.२०२४ रोजी अपलोड करण्यात आली आहे. 103

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly • आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly

## २९ सप्टेंबर: जागतिक हृदय दिन विशेष

# हृदयविकार सर्वात प्राणघातक आजार



जगभरात दरवर्षी २ कोटी ५ लाखांहून अधिक लोकांचा विविध प्रकारच्या हृदयविकारांमुळे मृत्यू होतो. असे असूनही, जगातील बहुतेक देश हृदयविकाराला इतके गंभीर मानत नाहीत. त्यांच्याकडे या आजाराचा सामना करण्यासाठी कोणतीही विशेष योजना नाही किंवा ते इतर रोगांच्या तुलनेत याला सामोरे जाण्यासाठी कोणत्याही प्रकारचे प्राधान्य देत नाही. यावरून आजही लोक विविध प्रकारच्या हृदयविकारांबाबत किती बेफिकीर आहेत याचा अंदाज येतो.

## एबीसीडी म्हणजेच 'एनीबडी कॅन डाय'

जागतिक हृदय दिनाचा उद्देश केवळ लोकांना या आजाराच्या भीषणतेची जाणीव करून देणे हा नाही, तर हृदयविकाराशी संबंधित कोणत्याही एका समस्येवर जागतिक स्तरावर दरवर्षी मोहीम राबवणे, जेणेकरून हा आजार कमी करता येईल. वर्ष २०२४ च्या जागतिक हृदय दिनाची थीम एबीसीडी म्हणजे 'एनबडी कॅन डाय' म्हणजे यामुळे कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू होऊ शकतो. त्यामुळे या आजाराला हलक्यात घेऊ नका. खरे तर हृदयविकाराचे गांभीर्य लोकांना समजावे यासाठी ही थीम ठरविण्यात आली आहे.



## अनेक रोगांचा समूह

वास्तविक हृदयविकार हा एकच आजार नाही. हा अनेक प्रकारच्या रोगांचा समूह आहे. उदाहरणार्थ, कोरोनरी किंवा धमनीसंबंधी रोग, फॅटी पदार्थ रक्तवाहिन्यांमध्ये जमा होणे, ज्यामुळे त्या अरुंद होतात किंवा शेवटी बंद होतात. ज्यामुळे हृदयविकाराचा झटका किंवा इतर अनेक प्रकारचे स्ट्रोक येऊ शकतात. यामध्ये सहसा मृत्यूचा धोका असतो.

### अशी लक्षणे ओळखा

सतत मळमळ होणे, उलट्या होणे, चक्कर येणे, श्वास घेण्यास त्रास होणे, छातीत दुखणे, दाब आणि जडपणा जाणवणे, हृदयाचे ठोके जलद होणे, सतत थकवा जाणवणे, मानेमध्ये जास्त घाम येणे, छातीत वारंवार जळजळ होणे ही हृदयविकाराची मुख्य लक्षणे आहेत किंवा अपचन, पाय आणि घोट्याला सूज येणे, घरघर घेऊन खोकला येणे, व्यायाम करण्यात अडचण येणे, निद्रानाश, झोपण्यास त्रास होणे, अनेकदा बेहोशी होणे. ही सर्व हृदयविकाराची लक्षणे आहेत. हृदयाशी संबंधित आजारांबाबत लोकांना जागरूक करण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेच्या पुढाकाराने दरवर्षी २९ सप्टेंबर रोजी जागतिक हृदय दिन साजरा केला जातो. हा दिवस देखील साजरा केला जातो कारण सर्व वैद्यकीय प्रगती असूनही हृदयविकाराशी संबंधित समस्या आणि हृदयविकाराच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे.

## मायट्रल व्हॉल्व प्रोलॅप्स

आणखी एक सामान्य हृदयरोग म्हणजे मायट्रल व्हॉल्व प्रोलॅप्स. खरं तर ते हृदयाच्या चार झडपांपैकी एक आहे. ही अशी झडप आहे जी चुकीच्या दिशेने रक्त वाहून जाण्यापासून रोखते. मायट्रल व्हॉल्व्हमध्ये कोणत्याही प्रकारची समस्या असल्यास शरीरातील रक्तप्रवाहात अडथळा निर्माण होतो. मायट्रल व्हॉल्व्हमध्ये उद्भवणारी एक मोठी समस्या म्हणजे ती खूप लवचिक बनते, ज्यामुळे रक्त पंप होत नाही. दुसऱ्या प्रकारच्या समस्येस मायट्रल रेगर्गिटेशन म्हणतात. या समस्येत झडप गळते आणि इकडे तिकडे रक्त वाहू लागते. तिसरी समस्या म्हणजे मायट्रल स्टेनोसिस, ज्यामुळे व्हॉल्व्ह पाहिजे तितके उघडत नाही. अशाप्रकारे मायट्रल व्हॉल्व्हशी संबंधित हृदयविकार झाल्यास, चालताना मधूनमधून चक्कर येते. दम लागणे, थकवा जाणवणे. हृदयाचे ठोके अनियमित होतात. ही समस्या सामान्यतः नियमित धुम्रपान, कॅफीनचे जास्त सेवन आणि अल्कोहोलचे व्यसन यामुळे उद्भवते. मायट्रल व्हॉल्व्ह प्रोलॅप्सची समस्या उद्भवते जेव्हा एखाद्याच्या हृदयाला सामान्यपेक्षा कितीतरी पटीने जास्त काम करावे लागते. हे टाळण्यासाठी शरीराची नियमित तपासणी करत राहणे गरजेचे आहे.

## संधिवाताचा हृदयरोग

हृदयाशी संबंधित आणखी एक प्रमुख आजार म्हणजे संधिवाताचा हृदयरोग. जेव्हा आपल्या हृदयविकाराचे निदान होत नाही तेव्हा असे होते. हा खरं तर स्ट्रेप थ्रोट किंवा स्ट्रेप्टोकोकस बॅक्टेरियामुळे होणारा संसर्ग आहे. त्यामुळे घशात तीव्र वेदना, सूज, सतत ताप, डोकेदुखी, उलट्या, मळमळ आणि शरीरात कमालीची कमजोरी जाणवते. स्ट्रेप थ्रोटसाठी प्रतिजैविकांचे हेवी डोस सामान्यतः दिले जातात, ज्याचे अनेक दुष्परिणाम असतात. हृदयविकाराचे कोणतेही निश्चित कारण नाही, त्याची अनेक कारणे असू शकतात - आपली अस्वास्थ्यकर जीवनशैली आणि आहार, उच्च कोलेस्ट्रॉल, वायू प्रदूषण, वारंवार शारीरिक निष्क्रियता, मधुमेह, तणाव, लठ्ठपणा, तंबाखूचा सतत वापर आणि कौटुंबिक पार्श्वभूमी. ज्या लोकांचे पालक हृदयविकाराने ग्रस्त आहेत, त्यांच्या मुलांनाही हृदयविकाराचा धोका असतो.

## फक्त सावधगिरी वाचवू शकते

- भारताचा विचार करता, १९९० मध्ये हृदयविकारामुळे सरासरी २२ लाख ६० हजार लोकांचा मृत्यू होत होता, जो २०२० मध्ये दरवर्षी ४७ लाख ७० हजारांपर्यंत वाढला. यावरून, आपल्या देशात हृदयाशी संबंधित आजार किती वेगाने वाढत आहेत हे आपण चांगले समजू शकतो.
- एक प्रकारे, संपूर्ण जगात हृदयविकारामुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी २२ टक्के मृत्यू एकट्या भारतात होतात. हृदयविकार हा जगातील तसेच भारतातील सर्वांत प्राणघातक आजार आहे. येथेही हृदयरोगाशी संबंधित ८५ टक्क्यांहून अधिक मृत्यू हे कोरोनरी हृदयरोगामुळे होतात.
- दुसरे सर्वांत मोठे कारण म्हणजे सेरेब्रोव्हस्कुलर रोग. जगात हृदयविकारामुळे सर्वाधिक मृत्यू हे कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये होतात.
- हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग टाळण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे धूम्रपान पूर्णपणे टाळणे, केवळ धूम्रपान टाळणेच नव्हे तर वारंवार धूम्रपान करणाऱ्या लोकांच्या आसपास राहणे देखील टाळणे.
- नियमितपणे निरोगी आहार घ्या. दररोज नियमित व्यायाम करा. तुमचे वजन नियंत्रणात ठेवा. दररोज काही शारीरिक हालचाली करा. रोज किमान दोन ते चार किमी पायी चाला.

EDUCATING EMPOWERING & INSPIRING STUDENTS TOWARDS EXCELLENCE

## हमिंग पक्षाचे हृदय १ मिनिटात १२०० वेळा धडकते!

नवराष्ट्र गुरुकुल — विद्यार्थ्यांचे नॉलेज पार्टनर



गुणगुणल्यासारखे आवाज काढणाऱ्या सर्वांत लहान पक्ष्यांपैकी हमिंग बर्ड एक आहे, जो विशेषतः अमेरिकेत आढळतो. त्याला नव्वद टक्के अन्न फुलांच्या परागकणातून मिळते. एक हमिंग बर्ड एका दिवसात दोन हजार फुलांना भेट देतो. त्याची स्मरणशक्ती इतकी तीक्ष्ण आहे की वर्षभरापूर्वी तो आपले अन्न शोधण्यासाठी कुठे गेला होता हे आठवते. पंख पसरून ते कोणत्याही दिशेने उडू शकते. या लांब चोचीच्या पक्ष्याच्या मेंदूचे वजन त्याच्या एकूण शरीराच्या वजनाच्या ४.२ टक्के आहे. सध्या जगात गुंजारव पक्ष्यांच्या ३२५ हून अधिक प्रजाती आढळतात. हुमिंग बर्ड प्रजातींपैकी सर्वात लहान म्हणजे बी हमिंग बर्ड. बी हमिंग बर्डचा आकार फक्त २.२५ इंच असतो. सामान्य वेगाने उडताना हमिंग बर्ड १ सेकंदात ८० वेळा पंख फडफडवतो. वेगाने उडताना ते २०० वेळा पंख फडफडवते. हमिंग बर्डचे पाय खूप कमकुवत असतात. त्याला जास्त हालचाल करता येत नाही. अनेक वर्षे ते कीटकांच्या श्रेणीत ठेवले होते. हमिंग बर्ड सुवास किंवा घाण वास घेऊ शकत नाही कारण त्याच्याकडे स्मेल सेंसर नसतात.

### आयुर्मान १२ वर्षांपर्यंत असते

या पक्ष्याचे हृदय १ मिनिटात अंदाजे १२०० वेळा धडकते, जे या जगातील कोणत्याही प्राण्याच्या हृदयाच्या ठोक्यांपेक्षा जास्त आहे. गुंजारव पक्ष्यांचे दोन प्रकार आहेत. एक मोठा हमिंग बर्ड आहे आणि एक लहान आहे. स्थलांतरादरम्यान, हमिंगबर्ड्स न थांबता आठशे किलोमीटर सतत उडू शकतात. हमिंग बर्ड ताशी शंभर किलोमीटर वेगाने उडू शकतो, परंतु सामान्य परिस्थितीत तो ताशी केवळ तीस ते चाळीस किलोमीटर वेगाने उडतो. हमिंगबर्ड्स फळे, फुले आणि लहान कीटक खातात. त्याचे आयुर्मान ३ वर्षे ते १२ वर्षे असते. वजन २ ग्रॅम ते २० ग्रॅमपर्यंत आहे. दर दहा मिनिटांनी अन्न खाणारा हा पक्षी आहे. तो त्याच्या वजनाच्या पन्नास टक्के अन्न खातो.

**कूपन**

उत्तर येथे लिहा

**आजचा प्रश्न**

प्रश्न : स्थलांतरादरम्यान हमिंग बर्ड न थांबता किती किलोमीटर उडू शकतो?

*आपले उत्तर येथे दिलेल्या कूपनमध्ये लिहा आणि नंतर हे कूपन कापून नवराष्ट्र गुरुकुलच्या फॉर्मॅटमध्ये दिलेल्या कूपनच्या जागी चिकटवा.*

www.navarashtra.com

# पहिल्या नोकरीतील 'स्मार्ट' बचत


तरुणपणी नोकरीला सुरूवात केल्यानंतर पैसे मिळतात. त्याप्रमाणे खर्चाला पण वाढत जातो. वाढणाऱ्या खर्चासोबत गुंतवणुकीचे पर्याय माहित असणेही गरजचे ठरते. जाणून घेऊया बचतीच्या स्मार्ट टिप्स-

### उत्पन्न आणि खर्चाचा समतोल राखा

आपल्याला मिळणारे उत्पन्न आणि त्या प्रमाणात होणारा खर्च यांचा समतोल राखणे निकडीचे आहे. हा समतोल राखताना आपल्या उत्पन्नाचा होणारा खर्च हा ६० टक्के पेक्षा जास्त असू नये. खर्च कसा कमी करता येईल याप्रमाणे आपले नियोजन हवे. म्हणून वायफळ खर्च टाळावा.

उधार मागण्यापासून दूर राहा

कमाई आणि खर्चाच्या बाबतीत, समतोल पातळीपर्यंत पोहचत नाही तोपर्यंत कर्जाचा लाभ घ्या आणि पुढील पगारापर्यंत आपल्या बँक खात्यात आवश्क शिल्लक ठेवा. आपल्या बँक खात्यात अतिरिक्त बॅंकेची अट असल्यास, आपले बॅंक क्रेडिट कार्ड देऊ करते तरीही आपले डेबिट कार्ड वापरा.



### क्रेडिट पत जपा

आपल्याला क्रेडिट पत जपणे महत्वाचे ठरते. जर तुम्ही शैक्षणिक कर्ज घेतले असेल, तर तो प्रथम फेडण्याचा प्रयत्न करा. जर तुम्हाला त्यावर कठोर परिश्रम घ्यायचे असतील तर पालकांकडून किंवा मित्रांकडून मदत मिळवा किंवा तुमच्या बँकरला कर्जाच्या अटी बदलण्यास सांगा. जरी आपण हे गृहीत धरत नाही की आपण शैक्षणिक कर्जावर डीफॉल्ट करू शकता आणि आपल्याला कोणतीही समस्या येणार नाही. प्रत्येक कर्जाचा एक ट्रॅक रेकॉर्ड असतो आणि आपल्या खराब क्रेडिट स्कोअरला अधिक त्वरित कर्ज मिळण्यासाठी अडथळा येऊ शकतो.

## का पुसले जात नाहीत चंद्रावरील ठसे ?



चंद्रावर पहिले पाऊल ठेवणारी व्यक्ती नील आर्मस्ट्राँग होती हे सर्वांनाच माहिती आहे तर शेवटची व्यक्ती यूजीन सेरनन ही होती. त्यांनी १९७२ मध्ये सर्वांत शेवटी चंद्रावर आपल्या पायांचे ठसे सोडले होते. या गोष्टीला आता ४६ वर्षे झाली आहेत. मात्र, त्यांच्या पायाचे ठसे आजही तसेच्या तसे आहेत. यामागे मोठे कारण आहे. चंद्र पृथ्वीचा एकमात्र नैसर्गिक ग्रह आहे. याच्या निर्मिती मागे एक अनोखी कथा आहे. वैज्ञानिकांचे म्हणणे आहे की, आजपासून जवळपास ४५० वर्षांपूर्वी एक उल्का पिंड पृथ्वीला धडकले, ज्यामुळे पृथ्वीचा एक भाग तुटून वेगळा झाला आणि तोच भाग नंतर चंद्र बनला. वैज्ञानिकांनुसार, चंद्राचा केवळ ५९ टक्के भागच पृथ्वीवरून दिसतो. तुम्हा आश्चर्य वाटेल की, जर चंद्र नाहीसा झाला तर पृथ्वीवरील दिवस हा केवळ ६ तासांचा असेल.चंद्राच्या प्रकाशाच्या भागाचे तापमान १८० डिग्री सेल्सियसपर्यंत पोहचते. तर अंधारातील भागाचे तापमान १५३ डिग्री सेल्सियसपर्यंत पोहचते. अॅरिझोना स्टेट युनिवर्सिटीचे प्रोफेसर मार्क रॉबिन्सन सांगतात की, चंद्र मातीच्या डोंगरांनी आणि धुळीने झाकलेला आहे. मातीचे कण देखील या थरात मिश्रीत होतात. यामुळे चंद्राच्या पृष्ठभागावर पायच्या खुणा पुसल्या जात नाहीत. मार्क रॉबिन्सन यांचे म्हणणे आहे की, चंद्रावरील अंतरिक्षांच्या पायांच्या खुणा लाखो वर्ष तशाच राहतील. कारण चंद्रावर वायुमंडल नाही.

## सक्सेस STORY

# २० वेळा अपयशी होऊनही मानली नाही हार

### ५०० कोटी रुपयांची कंपनी उभारली



अनेकदा लोक एक-दोनदा अपयशी ठरल्यानंतर निराश होतात. पण काही लोक इतके उत्कट असतात की ते प्रत्येक अपयशातून शिकतात आणि ध्येय गाठण्यासाठी नवीन मार्ग तयार करतात. अशीच एक व्यक्ती म्हणजे शार्क टँक इंडिया सीझन २ चा नवीन शार्क विकास डी नहार. ते ड्रायफ्रुट्स आणि स्नॅक ब्रँड हॅपिलोचे संस्थापक आहेत. ते शार्क टँक इंडियाच्या नवीन डिजिटल-ओन्ली भाग शार्क टँक इंडिया गेटवे टू शार्क टँक इंडिया-२ चा भाग असणार आहे.

### नोकरी सोडून एमबीए केले

बंगळुरू विद्यापीठातून बीसीए पूर्ण केल्यानंतर विकास जैन ग्रुपमध्ये काम करू लागला. मधल्या काळात त्यांनी नोकरीतून सुटी घेऊन सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीमधून एमबीए केले. त्यानंतर त्यांनी सात्विक स्पेशालिटी फूडसमध्ये व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम सुरू केले. या कंपनीत काम करताना मिळालेल्या अनुभवामुळे हॅपिलो कंपनी स्थापन करण्यात मदत झाली.

### यशाचे रहस्य

विकासने २०१६ मध्ये केवळ १० हजार रुपयांमध्ये हॅपिलो कंपनी सुरू केली. आज या कंपनीची एकूण संपत्ती ५०० कोटी रुपये आहे. विकास सांगतो की ५०० कोटी रुपयांची कंपनी बनवण्यासाठी त्याला २० वेळा अपयशाला सामोरे जावे लागले.

# रंगबिरंगी फुलांसाठी प्रसिद्ध ठिकाणे

जर फुलांबद्दल बोलायचे झाले तर त्यांच्या शेकडो प्रजाती आपल्या देशात आढळतात. जे पर्यावरणाचे सौंदर्य वाढवतात तसेच पर्यटनाला आकर्षित करतात. जर तुम्हाला देखील काही नवीन ठिकाणी भेट देण्याची आवड असेल, तर देशातील अशा रंगीबेरंगी फुलांच्या प्रसिद्ध ठिकाणांना भेट द्यावीच लागेल.

### कास पठार



सातारा जिल्ह्यातील कास पठारावर या दिवसात अनेक फूले पाहायला मिळतात. युनेस्कोने हे जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले आहे. या पठारावर फुलांच्या ८५० पेक्षा जास्त प्रजाती आढळतात. यामध्ये ऑर्किड, टूथब्रश ऑर्कि, इंडियन अॅरोरूट, दीपकाडी फ्लॉवर, ट्रॉपिकल ट्रंक, वाई-तुरा आणि इतर अनेक प्रजातींचा समावेश आहे. फुलांची ही सुंदर ठिकाण पुणे शहरापासून तीन तासांच्या अंतरावर आहे. जर तुम्ही या पठारावर पोहोचलात, तर तुम्ही जवळच्या कास तलाव किंवा वज्राई आणि वोघर धबधब्यांवरही जाऊ शकता.

### गोबिंदघाट

हे भारतातील लोकप्रिय फुलांच्या ठिकांणापैकी एक आहे. येथे जाण्यासाठी उत्तराखंडच्या गोविंदघाट गावापासून १७ किमी लांब ट्रेकने जावे लागते. ट्रेकर्समध्ये खूप लोकप्रिय, फुलांची ही नंदा देवी बायोस्फीअर रिझर्व्हचा भाग आहे. हे युनेस्को वर्ल्ड नेटवर्क ऑफ बायोस्फीअर रिझर्व्सपैकी एक आहे. येथे तुम्हाला हिमालयीन मॅपल, ब्लू हिमालयन पोस्पी, ब्रह्मकमळ, झेंडू, रोडोडेंड्रॉन, डेझी, प्राइम्युलस, ऑर्कि आणि वॉलाच कोब्रा लिली यासह वनस्पतींची एक विस्तृत श्रेणी मिळेल. जर तुम्ही या ठिकाणाजवळ पोहोचलात तर तुम्ही जवळच्या हेमकुंड साहिब गुरुद्वारा आणि नंदा देवी राष्ट्रीय उद्यानालाही भेट देऊ शकता.

### मुन्नार

हे ठिकाण विशेषतः हनीमूनचे नंदनवन म्हणून ओळखले जाते. जर तुम्ही येथे भेट देण्याचा प्लॅन करत असाल, तर तुम्हाला नीलाकुरिंजी नावाच्या भव्य लॅव्हेंडर रंगाच्या फुलांसह हिरवे हिरवे कुरणही दिसतील.

# बिझी पालकांच्या मुलांमधील समस्या

अभ्यासात मन न लागणे, खेळात भाग न घेणे, सतत भांडणे करणे, ओरडणे आणि हट्टीपणा करणे या गोष्टी लहान मुलांच्या बिघडण्याचे संकेत नाही तर त्यांना असलेल्या एका आजाराचा संकेत आहेत. जास्तकरून शहरी भागातील लहान मुलांमध्ये ही समस्या बघायला मिळते. याला सायकोटिक डिप्रेशन असे म्हटले जाते. आई-वडिलांचा पुरेसा वेळ न मिळाल्याने ते या मानसिक समस्येचे शिकार होत आहेत.

### सायकोटिक डिप्रेशन?

सायकोटिक डिप्रेशन एक गंभीर डिप्रेशन स्थिती असून ज्यात तुम्हाला अशी भावना किंवा आवाज ऐकू येतो. जसे की, तुम्ही कोणत्याही कामाचे नाही किंवा अयशस्वी आहात. या डिप्रेशनमध्ये काही लोकांना वाटू शकते की, ते त्यांच्या विचारांना ऐकू शकतात.

### अशी आहेत लक्षणे

मुलांमध्ये सतत उदासी किंवा निराशा दिसत असेल तर वेळीच सावध व्हा. तसेच चिडचिड करणे, विनाकारण दुःखी राहणे, छोट्या छोट्या गोष्टींवर चिडणे, व्यवहारात बदल, खाण्या-पिणे टाळणे, खेळण्यास रस नसणे, नकारात्मक विचार करणे आणि अस्वस्थ राहणे ही प्रमुख लक्षणे सांगता येतील. त्यांच्यावर अपेक्षांचे ओझे टाकणे, काही लहान मुलांमध्ये तणावाचे मुख्य कारण अभ्यास हे बघायला मिळते. होमवर्क पूर्ण न केल्याने, मार्क्स कमी मिळाल्याने मुले राहतात.

## आपले ASTRO

- **तिथी : संवत्सर**
- राष्ट्रीय मिती 7, शके 1946, विक्रम संवत्सर 2081, दक्षिणायन शरद ऋतू, भाद्रपद कृष्ण पक्ष द्वादशी 16:46
- **ता : 29 - 9 - 2024, रविवार**
- **सूर्योदय :** 6:15, **सूर्यास्त :** 6:09
- **सूर्योदयकालीन नक्षत्र** - मघा अहोरात्र, योग - साध्य 24:26 नंतर शुभ, करण - तैतिल 16:46, नंतर गरज 29:54 पश्चात गरज 29:54
- **शुभ दिवस :** आजचा दिवस मध्यम आहे.
- **सण उत्सव :** द्वादशी श्राद्ध, संन्यासांचे महालय श्राद्ध
- **ग्रह गोचर :** सूर्य - कन्या, चंद्र - सिंह, मंगळ - मिथुन, बुध - कन्या, गुरू - वृषभ, शुक्र - तूळ, शनी - कुंभ, राहु - मीन, केतू - कन्या
- **राहुकाळ :** सायं 4:30 ते 6:00
- **दिशा शूल :** पश्चिम व नैऋत्य
- **आराधना :** भगवान सूर्याला प्रातः अर्घ्य पूजा व आराधना
- **उपासना :** ऐश्वर्य प्राप्ति व रोगनाशासाठी उपवास व उपासना
- **खरेदीसाठी शुभ वेळ :** आज प्रातःपासून रात्रीपर्यंत मघा नक्षत्र आहे जे खरेदीसाठी शुभ नाही.

### आजचे पंचांग




- **शुभ अंक :** 1, 2, 6
- **शुभ रत्न :** सूर्यासाठी माणिक
- **शुभ रंग :** सोनेरी व पिवळा
- **ग्रह पीडा हरण मंत्र :** सूर्य ग्रह ग्रहाणां आदि आदित्यो लोक रक्षण कारकः। विषम स्थान संभूतां पीड़ां हरतु मे रविः।।
- **चौघड़िया मुहूर्त**
- **दिन** - प्रातः- 6:00, चंचल- 7:30, लाभ- 9:00, अमृत- 10:30, काळ - दु.12:00, शुभ- 1:30, रोग- 3:00, उद्वेग - 4:30
- **रात्री** - शुभ -सायं 6:00, अमृत - रात्री 7:30, चंचल - 9:00, रोग - 10:30, काळ - 12:00,लाभ - 1:30, उद्वेग - 3:00, शुभ - प्रातः 4:30
- **शुभ मुहूर्त :** शुभ, लाभ, अमृत, चंचल
- **अशुभ मुहूर्त :** रोग, काळ
- **मध्यम मुहूर्त :** उद्वेग

### व्यापार भविष्य

भाद्रपद कृष्ण द्वादशीला मघा नक्षत्राच्या प्रभावाने गूळ, खांड, रूई, सोने-चांदी, तांबे, जिरे, धणे, मिरची व किरणा वस्तूंमध्ये नरमी राहील. सरसों, एरंडेल व तूपाच्या भावात तेजी राहील.

**भाग्यांक 1409**

### आज जन्मलेल्या बालकाचे भविष्य

आज जन्मलेले बालक सडपातळ, उंच असेल. शिक्षण उत्तम राहील. विज्ञान क्षेत्रात यश प्राप्त करेल. लेखन कार्यात आवड राहील. उत्पन्नाची एकापेक्षा अधिक साधने राहतील.

### आज ज्यांचा जन्मदिवस आहे

- वर्षाच्या प्रारंभी शैक्षणिक स्पर्धेच्या क्षेत्रात यश मिळेल. आर्थिक स्थिती सुधारेल. कार्यक्षेत्रात वाढ होईल. आरोग्याबाबत सावध राहा. वर्षाच्या मध्यात सामाजिक कार्यात यश मिळेल. पदाचा लाभ मिळेल. व्यवसायात परिस्थिती सामान्य राहील. धार्मिक कार्यात सहभाग राहील. वर्षाच्या शेवटी शत्रूंकडून त्रास होईल, चिंता असेल पण आरामही मिळेल. अनावश्यक वाद आणि खर्च टाळण्याचा प्रयत्न करा.
- मेष आणि वृश्चिक राशीच्या व्यक्तींना स्थितीचा लाभ मिळेल. सामाजिक कार्यात सहभाग राहील. वृषभ आणि तूळ राशीच्या व्यक्तींना शत्रूंचा त्रास होईल. कर्क राशीच्या व्यक्ती शुभकार्यात पैसा खर्च करतील. सिंह राशीच्या व्यक्तींना प्रगतीची शक्यता असते. मिथुन आणि कन्या राशीच्या व्यक्तींचे आरोग्य चांगले राहील. मकर आणि कुंभ राशीच्या व्यक्तींची कीर्ती आणि सन्मान वाढेल. धनु आणि मीन राशीच्या व्यक्तींसाठी प्रसिद्धी आणि प्रयत्न राहतील.

### SUDOKU 6812

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 9 | | | | 1 | | | |
| 5 | 4 | | | 6 | 8 | | 1 | 3 |
| | | 1 | | 7 | | 9 | 5 | |
| | 8 | 9 | | 5 | 3 | | 4 | 7 |
| | | | | | | | | |
| 6 | 1 | | 4 | 9 | | 2 | 3 | |
| | 3 | 4 | | 1 | | 8 | | |
| 7 | 5 | | 8 | 3 | | | 2 | 4 |
| | | | 6 | | | | 7 | 9 |

- प्रत्येक ओळीत 1 ते 9 अंक भरणे आवश्यक आहे. मात्र हे अंक क्रमवार असणे अनिवार्य नाही. उभ्या आणि आडव्या ओळींमध्ये 333 च्या वर्गात असावेत, अंकांची पुनरावृत्ती नको.
- आधीच्या अंकांच्या जागा बदलू शकत नाही.
- शून्य कोड्याचे एकच उत्तर आहे.

नवराष्ट्र SUDOKU

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 6 | 2 | 3 | 4 | 1 | 7 | 5 | 8 |
| 1 | 4 | 8 | 9 | 7 | 5 | 6 | 2 | 3 |
| 5 | 7 | 3 | 2 | 6 | 8 | 1 | 4 | 9 |
| 3 | 2 | 1 | 6 | 9 | 4 | 8 | 7 | 5 |
| 4 | 8 | 7 | 5 | 1 | 2 | 9 | 3 | 6 |
| 6 | 9 | 5 | 8 | 3 | 7 | 4 | 1 | 2 |
| 8 | 3 | 4 | 7 | 2 | 6 | 5 | 9 | 1 |
| 2 | 1 | 6 | 4 | 5 | 9 | 3 | 8 | 7 |
| 7 | 5 | 9 | 1 | 8 | 3 | 2 | 6 | 4 |

ज्योतिषाचार्य पं.नारायणशंकर नाथुराम व्यास-कोतवाली बाजार, जबलपूर

### आजचे राशीफळ

**मेष :** राजकीय अडचणी येतील. नवीन कपडे आणि दागिने मिळतील. भौतिक सुख-सुविधांमध्ये वाढ होईल. नवीन करारावर चर्चा होईल.

**वृषभ :** आईची चिंता संभवते. डोके आणि डोळ्याचे दुखणे उद्भवेल. कामात अपेक्षित यश मिळेल. नियमितता लक्षात घेऊन काम करा.

**मिथुन :** नियोजित काम पूर्ण झाल्यावर आनंदी व्हाल. नोकरीशी संबंधित चांगली बातमी मिळेल. पाहुणे येण्याची शक्यता आहे. सत्संग मिळण्याची शक्यता आहे.

**कर्क :** कौटुंबिक विरोधाचा सामना करावा लागू शकतो. आत्मविश्वास कमी होईल. धार्मिक कार्यात प्रसिद्धी आणि सन्मान मिळेल. आरोग्य चांगले राहील.

**सिंह :** मित्रांच्या सहकार्यामुळे आर्थिक लाभाच्या संधी मिळतील. कौटुंबिक जबाबदाऱ्या येतील. नियोजित कामात अचानक व्यत्यय येईल.

**कन्या :** जमीन व घराशी संबंधित कामे होतील. मनोबल वाढेल. कौटुंबिक जीवन आनंदमय राहील. नजीकच्या अधिकाऱ्याचे महत्त्वपूर्ण सहकार्य मिळेल.

**तूळ :** भौतिक सुखसोयी प्राप्त होतील. आईच्या बाजूने आनंद मिळेल. अज्ञात भीती आणि चिंता राहील. अनोळखी व्यक्तीशी मैत्री करताना काळजी घ्या.

**वृश्चिक :** प्रवास टाळण्याचा प्रयत्न करा. घरात कोणाशी विनाकारण वाद होईल. शिक्षणाप्रती समर्पण आणि आवड निर्माण होईल. मुलांच्या कामात खर्च होईल.

**धनु :** वाहन सावकाश चालवा. वेदना, दुःख, अपघात होण्याची भीती आहे. जोखमीच्या, जामीन कार्यात अडकू नका. पालकांच्या सहकार्याने आवश्यक जबाबदाऱ्या पूर्ण होतील.

**मकर :** व्यवसायात जोखीम घेण्याची हिंमत असेल तर यश मिळेल. तुम्हाला अनपेक्षित पैसे मिळतील. कौटुंबिक जबाबदाऱ्या पूर्ण होतील.

**कुंभ :** धाकटे भाऊ, बहीण, नातेवाईक यांच्याशी संबंध वाढतील. कौटुंबिक आनंद राहील. मैत्री उपयोगी पडेल. नवीन योजनांचा फायदा होईल.

**मीन :** कौटुंबिक कलहामुळे मानसिक तणावाचा सामना करावा लागू शकतो. शारीरिक वेदना होऊ शकतात. पद आणि प्रतिष्ठा वाढेल. चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे.

### शब्दकोडे क्र. 2531



**आडवी विधाने**–1) दुसऱ्यासाठी सर्वस्व देण्याचा मनाचा कल, शरणागती पत्करणे 3) वस्तु खरेदी करणारा, ग्रहण करणारा 5) बर्फ 6) क्षणभरात चमकून जाणारी वीज, विद्युल्लता 9) दास, नोकर 10) प्रेत ठेवण्याची जागा 11) दोन मल्लांमधे खेळले जाणारे मल्लयुद्ध 12) मजबूत, कणखर 14) श्रीशंकर पत्नी, पार्वती 15) संपूर्ण, सगळे 17) भटकणे, फिरणे 18) अयशस्वी 20) वडिलांचा भाऊ, चुलता 21) नदीचे फोडून आणलेले पाणी 23) रामायणातील एक श्रीरामपुत्र 24) मक्षिका 25) हाताखालचा आज्ञांकित मनुष्य 27) एक श्वास रोग 28) दुर्दशा, वाईट स्थिती

**उभी विधाने**–1) राखून ठेवणे, रिझर्वेशनचे मराठीकरण 2) मनातील भाव, श्रद्धा 3) गावाचा शासकीय सेवा अधिकारी 4) मळका, मळलेले 7) प्रशंसा, स्तुती, कौतुक 8) वजनदार, महत्वाचे 11) अविवाहित मुलगी 13) कवच, फोल, फळाच्या बाहेरची त्वचा 14) आभार, मेहेरबानगी 15) सारखे, तुल्य 16) शरीराच्या पाठीच्या हाडांची गांठ 18) वास्तव नसलेले 19) किंचितही 22) लाट, मनाचा कल 24) मातुल, आईचा भाऊ 26) बाजू, पक्ष

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रा | म | च | रि | त | मा | न | स | | का | स |
| न | ज | र | | | या | | ची | | त | प्त |
| च | ल | | | आ | जा | | न | त | | श्रृं |
| रा | | प | न | वे | ल | | तें | | जं | गी |
| ई | द | | वा | द | | ख | डू | | त | |
| | क्ष | | | न | को | | ल | | र | ग |
| | | उ | टी | | प | | क | | मं | दा |
| उ | न्म | त्त | | य | | ब | र | सा | त | |
| मा | | रा | ज | की | य | | | का | र | क |
| | व | र्ध | मा | न | म | हा | वी | र | | ष्ट |

anumeya -8446302691

### पर्यटन मंत्रालयाने जाहीर केली यावर्षीची जानेवारी ते जून या कालावधीतील आकडेवारी

# ४७.८ लाख विदेशी पर्यटकांची भारतवारी

**दिल्ली, वृत्तसंस्था**. यावर्षी जानेवारी ते जून या कालावधीत सुमारे ४७.८ लाख विदेशी पर्यटक देशात आले. पर्यटन मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, सर्वाधिक पर्यटक बांगलादेश आणि अमेरिकेतून आले आहेत. तथापि, जागतिक पर्यटन दिनानिमित्त जाहीर करण्यात आलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, देशात येणाऱ्या पर्यटकांची संख्या कोविड महामारीपूर्वीच्या पातळीपेक्षा अजूनही मागे आहे. या वर्षी जूनमध्ये ७,०६,०४५ परदेशी पर्यटक आले होते, तर जून २०२३ मध्ये ६,४८,००८ परदेशी पर्यटक आणि जून २०१९ मध्ये ७,२६,४४६ परदेशी पर्यटक आले होते. ही संख्या २०२३ च्या तुलनेत नऊ टक्के अधिक आणि २०१९ च्या तुलनेत २.८ टक्के कमी आहे. मंत्रालयाने म्हटले आहे की, या वर्षाच्या पहिल्या सहामाहीत (जानेवारी-जून) ४७,७८,३७४ परदेशी पर्यटक आले होते, गेल्या वर्षी याच कालावधीत ४३,८०,२३९ आणि कोविड महामारीपूर्वी २०१९ मध्ये याच कालावधीत ५२,९६,०२५ होते. या वर्षीचा आकडा २०२३ च्या तुलनेत ९.१ टक्के अधिक आहे आणि २०१९ च्या तुलनेत ९.८ टक्के कमी आहे. आकडेवारीनुसार, २०२४ च्या पहिल्या सहामाहीत भारतात सर्वाधिक २१.५५ टक्के विदेशी पर्यटक बांगलादेशातून आले होते. यानंतर १७.५६ टक्के पर्यटक अमेरिकेतून, ९.८२ टक्के ब्रिटनमधून, ४.५ टक्के कॅनडातून आणि ४.३२ टक्के पर्यटक कॅनडातून आले आहेत.



**परदेशी पर्यटकांची संख्या**

| वर्ष | पर्यटक |
|---|---|
| जून-२४ | ७,०६,०४५ |
| जून-२३ | ६,४८,००८ |
| जून-१९ | ७,२६,४४६ |

**पहिल्या ६ महिन्यांची परिस्थिती**

| पहिले सहामाह | पर्यटक |
|---|---|
| जानेवारी-जून-२४ | ४७,७८,३७४ |
| जानेवारी-जून-२३ | ४३,८०,२३९ |
| जानेवारी-जून-१९ | ५२,९६,०२५ |

# बीएसई-एनएसईने बदलले शुल्क नियम

## नवीन दर १ ऑक्टोबरपासून

**मुंबई, वृत्तसंस्था.** देशातील प्रमुख स्टॉक एक्स्चेंज बीएसई आणि एनएसईने रोख आणि भविष्यातील पर्याय सौद्यांसाठी त्यांचे व्यवहार शुल्क बदलले आहे. सेबीने स्टॉक एक्स्चेंजसह मार्केट इन्फ्रास्ट्रक्चर घटकांच्या सर्व सदस्यांसाठी एकसमान शुल्क रचना अनिवार्य केल्यानंतर हे पाऊल पुढे आले आहे. स्टॉक एक्स्चेंजने जारी केलेल्या वेगवेगळ्या परिपत्रकात बदललेले दर एक ऑक्टोबरपासून लागू होतील, असे सांगण्यात आले होते.

**सेबीच्या अधिसूचनेनंतर केलेले बदल** :बीएसईने इक्विटी फ्युचर्स आणि ऑप्शन्स श्रेणीतील सेन्सेक्स आणि बँकेक्स ऑप्शन कॉन्ट्रॅक्ट्ससाठीचे व्यवहार शुल्क प्रिमियम टर्नओव्हरच्या प्रति कोटी रुपये ३,२५० केले आहे. तथापि, इक्विटी फ्युचर्स आणि ऑप्शन्स श्रेणीतील इतर करारांसाठी व्यवहार शुल्कामध्ये कोणताही बदल झालेला नाही. सेन्सेक्स ५० पर्याय आणि स्टॉक पर्यायांसाठी, बीएसई प्रति कोटी प्रीमियम टर्नओव्हर ५०० रुपये व्यवहार शुल्क आकारते. निर्देशांक आणि स्टॉक फ्युचर्ससाठी कोणतेही व्यवहार शुल्क लागू नाही.

### रोख बाजार विभागासाठी एकसमान व्यवहार शुल्क




एनएसईने आता रोख बाजार विभागासाठी एकसमान व्यवहार शुल्क लागू केले आहे. आता, प्रत्येक १ लाख रुपयांच्या व्यापारासाठी, दोन्ही बाजूंनी २.९७ रुपये शुल्क आकारले जाईल. यापूर्वी स्टॉक एक्स्चेंज रोख विभागातील एका महिन्यात व्यवहार केलेल्या एकूण मूल्याच्या विविध स्लॅबसाठी प्रति बाजू २.९७-३.२२ रुपये आकारत होते. एनएसईने इक्विटी फ्युचर्स विभागातील शुल्क सुधारित केले आहेत. आता १ लाख रुपयांच्या व्यापार मूल्यावर दोन्ही बाजूंनी १.७३ रुपये आकारले जातील.

## # QUICK NEWS

### सरकारी बँकांमध्ये घटले कर्मचारी

**दिल्ली.** कोरोनानंतर सरकारी बँका कर्मचाऱ्यांची संख्या कमी करत असताना खासगी बँकांनी आक्रमक भरती केली आहे. २०१९-२० या आर्थिक वर्षात सरकारी बँकांमध्ये एकूण ७,७०,४०९ कर्मचारी होते, ते आता ७,६४,६७९ इतके कमी झाले आहेत. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार, २०१९-२० मध्ये खाजगी बँकांमध्ये एकूण ५,५४,९५० कर्मचारी होते. आता ही संख्या ८.४६ लाख झाली आहे. म्हणजेच २,९१,५८० कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली आहे. याच कालावधीत सरकारी बँकांमधील ५,७३० कर्मचाऱ्यांची कपात करण्यात आली आहे. पाच वर्षांत खासगी बँकांच्या कर्मचाऱ्यांची संख्या दीड पटीने वाढली आहे.

### डिसेंबरमध्ये स्वस्त होणार व्याजदर

**दिल्ली.** जगभरातील मध्यवर्ती बँकांकडून पतधोरण नरमल्याने भारतातही डिसेंबरपासून व्याजदर कमी होऊ शकतात. अशा परिस्थितीत जानेवारीच्या तिमाहीपासून स्वस्त व्याजदरात कर्ज मिळणे सुरू होऊ शकते. यूबीएसच्या अहवालानुसार चलनवाढीचा दर सातत्याने कमी होत आहे. चालू आर्थिक वर्षात भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ४.५ टक्के अंदाजापेक्षा ०.३० टक्के कमी असू शकते. ऑगस्टमध्ये ते ३.६५ टक्के होते. अशा परिस्थितीत आरबीआय व्याजदरात ०.७५ टक्क्यांनी कपात करू शकते. अन्नधान्य चलनवाढीचा धोका लक्षात घेऊन आरबीआयने रेपो दर गेल्या ९ वेळा म्हणजेच फेब्रुवारी २०२३ पासून स्थिर ठेवला आहे. दीर्घकालीन चलनवाढ लक्षात घेऊन व्याजदरात बदल केले जातील, असेही आरबीआयचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी म्हटले आहे.

### अभिमानास्पद ● भारतीय कंपनीने परदेशात असे युनिट उभारण्याची पहिलीच वेळ

# टाटा विदेशात उभारणार संरक्षण युनिट

**दिल्ली, वृत्तसंस्था.** संरक्षण क्षेत्र हे अतिशय विशेष क्षेत्र आहे. त्यात मुख्यतः परदेशी कंपन्यांचे वर्चस्व आहे. पण हे पहिल्यांदाच घडत आहे की, एखादी भारतीय कंपनी परदेशात डिफेन्स मॅन्युफॅक्चरिंग लाइन तयार करणार आहे. होय, ही बातमी टाटा समूहाकडून आली आहे. टाटा समूहातील एक कंपनी परदेशात प्रमुख संरक्षण उत्पादन लाइन उभारण्याच्या मार्गावर आहे. टाटा ॲडवॉन्स प्रणाली लि. टीएएसएल कॅसाब्लांका येथे हा प्लांट तयार करण्याची तयारी करत आहे. हा प्लांट सुरुवातीला रॉयल मोरोक्कन सशस्त्र दलांसाठी बख्तरबंद वाहने तयार करेल. कंपनी दीर्घकाळात आफ्रिकन बाजारपेठेतील मोठ्या भागाला सेवा देण्याची योजना आखत आहे.

**पायदळ लढाऊ वाहन बनवले जाईल** : आमच्या सहयोगी इकॉनॉमिक टाईम्सच्या बातमीनुसार, टाटा समूहाच्या या युनिटमध्ये व्हीलड आर्मर्ड प्लॅटफॉर्म तयार केले जाईल. हे व्यासपीठ एक उभयचर पायदळ लढाऊ वाहन आहे. हे सर्व प्रकारच्या भूप्रदेशात नेव्हिगेट करण्यास सक्षम आहे. योजना अशी आहे की तो कारखाना दरवर्षी १०० कॅम्बेट वाहने तयार करू शकेल. प्लांट एका वर्षात कार्यान्वित होईल, पहिला प्लांट १८ महिन्यांत कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे.

**भारतीय लष्कराला या वाहनाचा पुरवठा** : टाटा ॲडवॉन्स्ड सिस्टिम लि. सुद्धा भारतीय सैन्याला अशा लढाऊ वाहनांचा पुरवठा करते. ही वाहने मर्यादित संख्येत भारतीय लष्कराच्या सेवेत आहेत. ही वाहने लडाख सीमेवर तैनात करण्यात आली आहेत. टीएएसएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक सुकरण सिंग म्हणाले, हा करार टीएएसएलसाठी खूप मोठा आणि धोरणात्मक महत्त्वाचा आहे. हे केवळ टीएएसएलला मोरोक्कोच्या संरक्षण परिसंस्थेला किक-स्टार्ट करण्यास मदत करेल असे नाही, तर उर्वरित आफ्रिकेतील संरक्षण प्रणाली निवडण्यासाठी टीएएसएलला लॉन्च पॉइंट म्हणून देखील काम करेल. ऐतिहासिक उत्पादन आणि पुरवठा करारासाठी मोरोक्कोचा पाठिंबा त्यांनी मान्य केला.

#### हे वाहन कोणी विकसित केले

- टीएएसएल आणि डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन(डीआरडीओ) यांनी संयुक्तपणे चाकांचा आर्मर्ड प्लॅटफॉर्म विकसित केला आहे. मोरोक्कोने निवड होण्यापूर्वी आफ्रिकेच्या वाळवंटात अनेक गहन चाचण्या घेतल्या.
- परदेशात भारतीय कंपनीने स्थापन केलेले हे पहिले मोठे हरितक्षेत्र संरक्षण युनिट आहे. भारताने भूतकाळात, प्रमुख संरक्षण प्लॅटफॉर्मची निर्यात केली आहे आणि जागतिक स्तरासह देशांतर्गत उत्पादने तयार करत आहेत.




- पण, आजवर परदेशात एकाही भारतीय कंपनीने असे केलेले नाही. हे मोरोक्कोमधील पहिले संरक्षण संयंत्र देखील असेल जे संपूर्ण प्रमुख व्यासपीठ तयार करण्यास सक्षम असेल. या प्लांटमध्ये सुमारे ३५० लोकांना रोजगार मिळेल आणि कामाचा मोठा भाग भारतातही केला जाईल.



# तांदूळ निर्यातीवरील बंदी सरकारने उठवली

**दिल्ली, वृत्तसंस्था** . केंद्राने गैर-बासमती पांढऱ्या तांदळाच्या म्हणजेच परमल तांदळाच्या निर्यातीवरील बंदी तात्काळ उठवली. एका अधिसूचनेत ही माहिती देण्यात आली आहे. तांदळाचा देशांतर्गत पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी आणि किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारने जुलै २०२३ मध्ये ही बंदी लागू केली होती. सरकारने गैर-बासमती तांदळाच्या निर्यातीवरील बंदी उठवल्याने त्याचा थेट परिणाम परमल धानाच्या दरावर होणार आहे.

हरियाणा आणि पंजाबमध्ये परमल धान पिकून तयार आहे, परंतु सरकारी खरेदी सुरू होत नसल्याने, खाजगी खरेदीदार कमी दराने धान खरेदी करत असल्याने शेतकऱ्यांना परमल धानासाठी योग्य दर मिळत नाही. आता तांदूळ निर्यातीवरील बंदी हटवण्यात आल्याने बाजारात तेजी येण्याची शक्यता आहे. निर्यातदारांनी बंदी उठवण्याच्या निर्णयाचे कौतुक केले आणि ते क्षेत्रासाठी महत्त्वाचे मानले.

राईस व्हिलाचे सीईओ सूरज अग्रवाल म्हणाले की, गैर-बासमती पांढऱ्या तांदळाच्या निर्यातीवरील बंदी उठवण्याचा भारताचा धाडसी निर्णय कृषी क्षेत्रासाठी गेम चेंजर आहे. अधिसूचनेत म्हटले आहे की सरकारने 'परबोल्ड' तांदळावरील निर्यात शुल्क २० टक्क्यांवरून १० टक्के केले आहे.

#### जुलै २०२३ मध्ये लावली होती बंदी

देशांतर्गत बाजारात तांदळाची उपलब्धता आणि किमती नियंत्रित करण्यासाठी केंद्र सरकारने जुलै २०२३ मध्ये निर्यातीवर बंदी घातली होती. भारत हा या तांदळाचा जगातील सर्वात मोठा निर्यातदार आहे. सरकारने २०२३ मध्ये उकडलेल्या तांदळाच्या निर्यातीवर २० टक्के शुल्क लावले होते. यावेळी हरियाणा आणि पंजाबसह देशातील प्रमुख तांदूळ उत्पादक राज्यांमध्ये पीक जवळजवळ पक्व झाले आहे. दोन्ही राज्यातील काही बाजारपेठांमध्ये बिगर बासमती धानाची म्हणजेच परमाळची आवक सुरू झाली आहे. धान उत्पादक भागात चांगला पाऊस झाल्याने यंदा देशात धानाचे बंपर उत्पादन अपेक्षित आहे.

# एनएलसीचे १,२३४ कोटी युनिट ग्रीन विजेचे उत्पादन

**दिल्ली, वृत्तसंस्था**. सार्वजनिक क्षेत्रातील एनएलसी इंडिया लिमिटेडने १,२३४ कोटी युनिट ग्रीन वीज निर्माण केली आहे. कोळसा मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, यामुळे १० दशलक्ष टन कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन रोखले गेले आहे. एनएलसी ही प्रामुख्याने लिग्नाइट-आधारित वीज निर्मिती कंपनीने २०३० पर्यंत १०,००० मेगावॅट अक्षय ऊर्जा क्षमतेचे उद्दिष्ट ठेवले आहे. एनएलसी इंडियाने १,३८० मेगा व्हॅट सौर उर्जा प्रकल्प आणि ५१ मेगा वॅट पवन उर्जा प्रकल्पांसह अक्षय ऊर्जा क्षेत्रात पाऊल ठेवले आहे. १०,००० मेगावॅटचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कंपनीने नवीन उपकंपन्या– एनएलसी इंडिया रिनेएबल्स लि. आणि एनएलसी इंडिया ग्रीन एनर्जी लि. स्थापन केल्या आहेत. यापैकी एनआयआरएल मालमत्तेच्या कमाईवर लक्ष केंद्रित करेल. तर एनआयजीईएल स्वच्छ उर्जेवर नेतृत्व करेल. शिवाय, एनएलसीचे इंटरनॅशनल सोलर अलायन्स (आयएसए) मधील सदस्यत्व कोळसा क्षेत्रातील पर्यावरणपूरक उपाययोजनांबाबतची वचनबद्धता दर्शवते. कंपनीचे नेवेली (तामिळनाडू), बारसिंगसर (राजस्थान), गुजरात आणि आसाम येथे महत्त्वाचे प्रकल्प सुरू आहेत.

# परकीय चलनसाठा नवीन विक्रमी पातळीवर

मुंबई, वृत्तसंस्था. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, २० सप्टेंबर रोजी संपलेल्या आठवड्यात देशाच्या परकीय चलनाच्या साठ्यात २.८३८ अब्ज डॉलरची वाढ होऊन ६९२.२९६ अब्ज डॉलरची नवीन विक्रमी पातळी गाठली आहे. गेल्या आठवड्यात परकीय चलनाचा साठा ६८९.४५८ अब्ज डॉलर होता. या वर्षाच्या जानेवारीपासून परकीय चलनाच्या साठ्यात सुमारे ६९ अब्ज डॉलरची वाढ झाली आहे. परकीय चलनाच्या साठ्याचा हा बफर देशांतर्गत आर्थिक क्रियाकलापांना जागतिक धक्क्यांपासून संरक्षण करण्यास मदत करतो. सर्वोच्च बँकेच्या ताज्या आकडेवारीनुसार, भारताची परकीय चलन मालमत्ता, परकीय चलन साठ्याचा सर्वात मोठा घटक, समीक्षाधीन आठवड्यात ६०५.६८६ अब्ज डॉलर होता. आकडेवारीनुसार, सध्या सोन्याचा साठा ६१.९८८ अब्ज डॉलर्स इतका आहे.



# दुसऱ्या दिवसाच्या खेळाला पावसाचा बसला फटका

**कानपूर, वृत्तसंस्था.** भारत आणि बांगलादेश यांच्यातील दुसऱ्या क्रिकेट कसोटीचा दुसरा दिवस सततच्या पावसामुळे एकही चेंडू न टाकल्याशिवाय रद्द करावा लागला. सकाळी हलक्या रिमझिम पावसानंतर मुसळधार पाऊस सुरू झाल्यामुळे ग्रीन पार्क स्टेडियमवर दुसऱ्या दिवशी एकही खेळ होऊ शकला नाही. मैदानी कर्मचाऱ्यांनी सकाळी ११. १५ वाजताच्या सुमारास पाऊस थांबल्यावर तीन सुपर सॉपर तैनात करण्यात आले. परंतु प्रकाश देखील स्पष्ट नव्हता त्यामुळे खेळ अधिकृतपणे २:१५ वाजता रद्द करावा लागला. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, रविवारीही पावसाची शक्यता आहे, परंतु सोमवारी आणि मंगळवारी आकाश निरभ्र राहण्याची शक्यता आहे. अशा स्थितीत सामना अनिर्णितेकडे वाटचाल होताना दिसत आहे. पहिल्या दिवशी बांगलादेशला पावसामुळे केवळ ३५ षटके टाकता आली असताना तीन गड्यांच्या मोबदल्यात त्यांनी १०७ धावा केल्या होत्या. भारतीय वेगवान गोलंदाज आकाश दीपने बांगलादेशचे सलामीवीर झाकीर हसन आणि शादमान इस्लामला बाद केले होते. तर रविचंद्रन अश्विनने कर्णधार नझमुल हुसेन शांतोची विकेट घेतली होती. दोन सामन्यांच्या मालिकेतील पहिली कसोटी भारताने २८० धावांनी जिंकली आहे.

### मुशीर खान याची प्रकृती स्थिर



**लखनौ, वृत्तसंस्था.** मुंबईचा अष्टपैलू खेळाडू मुशीर खान, भारतीय फलंदाज सर्फराज खानचा धाकटा भाऊ, लखनौच्या बाहेरील रस्ता अपघातानंतर आता स्थिर आहे. परंतु आगामी इराणी चषकापासून सुरू होणाऱ्या मोसमापासून तो जास्त काळ क्रिकेट खेळू शकणार नाही. मुशीर (१९ वर्षे) याच्या मानेला दुखापत झाली असून त्यामुळे तो किमान तीन महिने क्रिकेटपासून दूर राहण्याची शक्यता आहे. यामुळे तो ११ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या रणजी ट्रॉफी २०२४-२५ हंगामाच्या प्रारंभी मुंबईच्या सामन्यांमधून बाहेर पडला आहे.


१ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या इराणी चषकासाठी मुशीर त्याच्या मूळ गावी आझमगडहून लखनऊला जात असताना त्याची कार दुभाजकाला धडकली आणि उलटली. मुशीर यांच्यासोबत त्याचे वडील नौशाद खान होते, ज्यांना पूर्वांचल एक्सप्रेसवेवर झालेल्या अपघातात किरकोळ ओरखडेही आले होते. अधीक्षक डॉ भोला सिंग यांनी एका निवेदनात सांगितले की, मुशीर धोक्याबाहेर आहे.

# दुहेरीत त्रिशा -गायत्रीचे आव्हान संपुष्टात

**मकाऊ, वृत्तसंस्था.** त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद या महिला दुहेरीच्या जोडीला शनिवारी चायना येथे मकाऊ ओपन सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत चायनीज तैपेईच्या हसिह पेई शान आणि हंग एन-जू या जोडीकडून उपांत्य फेरीत पराभवाला सामोरे जावे लागले आणि त्यामुळे भारताचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले आहे. खडतर आव्हान असतानाही, तिसऱ्या मानांकित भारतीय जोडीला जागतिक क्रमवारीत ५४व्या क्रमांकावर असलेल्या चायनीज तैपेईच्या जोडीविरुद्ध तीन गेममध्ये १७-२१, २१-१६, १०-२१ असा पराभव स्वीकारावा लागला. त्रिशा आणि गायत्रीचा जगातील २३व्या क्रमांकाच्या जोडीचा चायनीज तैपेई जोडीविरुद्धचा यंदाचा तिसरा पराभव आहे. हसिह आणि हंग यांनी चांगली सुरुवात करून ८-५ अशी आघाडी घेतली आणि त्यानंतर सलग पाच गुण घेत १३-८ अशी आघाडी घेतली. भारतीय जोडीने पुनरागमन करत स्कोअर १५-१५ असा केला, मात्र यानंतर चायनीज तैपेई जोडीने चांगला खेळ करत पहिला गेम जिंकला. दुसऱ्या गेममध्ये दोन्ही जोडींमध्ये चुरशीची स्पर्धा झाली. त्रिशा आणि गायत्री ब्रेकपर्यंत ११-१० अशी किंचित आघाडी कायम ठेवत होत्या.



### दमदार कामगिरी • शेवटच्या क्षणी गोल गमाविण्याची प्रतिमा बदलली



# भारतीय हॉकी संघ जगातील सर्वोत्कृष्ट

**दिल्ली, वृत्तसंस्था.** सलग दुसऱ्या ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकल्यानंतर भारतीय हॉकी संघ शेवटच्या क्षणी गोल स्वीकारतो अशी भावना बदलली आहे. हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखालील संघ सर्वच बाबतीत जगातील सर्वोत्कृष्ट आहे, असे मत माजी महान खेळाडू जफर इक्बाल यांनी व्यक्त केले.

मॉस्को ऑलिम्पिकमधील सुवर्णपदक विजेत्या भारतीय संघाचा सदस्य आणि १९८२ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक विजेत्या भारतीय संघाचा कर्णधार राहिलेल्या इक्बालला टोकियो आणि पॅरिसमधील कांस्यपदकानंतर देशात या खेळाला प्रोत्साहन देण्याची आशा आहे.

हॉकी इंडियाच्या एका प्रकाशनात इक्बाल म्हणाले, पूर्वी सर्वसाधारण समज असा होता की, भारत हा खेळाच्या शेवटच्या टप्प्यात गोल खाणारा संघ आहे.




पण आता हे बदलले आहे. आम्ही सर्व बाबतीत जगातील सर्वोत्तम संघांपैकी एक आहोत. आमच्या काळात हॉकीचे अनेक चाहते होते. नेहरू गोल्ड कप, आशियाई खेळ आणि इतर आंतरराष्ट्रीय सामन्यांसारख्या स्पर्धांनी भरपूर समर्थक आकर्षित केले आणि आम्ही ज्या मोठ्या स्टेडियममध्ये खेळलो त्यामध्ये नेहमीच उत्साह असायचा. मेजर ध्यानचंद स्टेडियमवर २३ आणि २४ ऑक्टोबर रोजी भारत आणि जर्मनी यांच्यात होणाऱ्या दोन सामन्यांबाबत इक्बाल म्हणाला, जर्मनी एक मोठा संघ आहे. टोकियो ऑलिम्पिकमध्ये आम्ही त्यांना पराभूत करून कांस्यपदक जिंकले आणि अलीकडेच पॅरिसमध्ये उपांत्य फेरीत त्यांच्याकडून पराभूत झालो. त्यामुळे मला खात्री आहे की भारतीय संघ आम्हाला त्यांच्यावर विजय मिळवून देण्यासाठी उत्सुक असेल.


## पश्चिम रेल्वे विविध गंतव्य स्थानकांपर्यंत उत्सव विशेष गाड्या चालविणार आहे.

| गाडी क्र | प्रारंभिक स्थानक व गंतव्य स्थानक | सेवांचे दिवस | आगमन | प्रस्थान |
|---|---|---|---|---|
| ०९०२७ | वांद्रे टर्मिनस - मालदा टाऊन | ०२.१०.२०२४ ते २७.११.२०२४ | ११.०० वा. (बुधवार) | १६.३० वा. (शुक्रवार) |
| ०९०२८ | मालदा टाऊन - वांद्रे टर्मिनस | ०५.१०.२०२४ ते ३०.११.२०२४ | १७.३० वा. (शनिवार) | १८.१५ वा. (सोमवार) |
| **थांबे :** बोरिवली, वापी, सुरत, भरूच, वडोदरा, गोध्रा, रतलाम, कोटा, सवाई माधोपूर, गंगापूर सिटी, बयाना, आग्रा फोर्ट, टुंडला, एटावा, कानपूर सेंट्रल, ऐशबाग, बाराबंकी, गोंडा, बस्ती, गोरखपूर, नरकटियागंज, बापूधाम मोतिहारी, मुझफ्फरपूर, समस्तीपूर, बरौनी, किऊल, अभयपूर, जमालपूर, सुलतानगंज, भागलपूर, कहालगाव, साहीबगंज, बरहरवा व न्यू फरक्का स्टेशन - दोन्ही दिशांना. | | | | |
| **रचना –** एसी ३ टीयर, शयनयान श्रेणी व सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे. | | | | |
| ०९०३१ | वांद्रे टर्मिनस - गोरखपूर | ०३.१०.२०२४ते २८.११.२०२४ | १२.१५ वा. (गुरुवार) | २१.०० वा. (दुसऱ्या दिवशी) |
| ०९०३२ | गोरखपूर - डहाणू रोड | ०५.१०.२०२४ ते ३०.११.२०२४ | ०४.०० वा. (शनिवार) | १२.२५ वा. (दुसऱ्या दिवशी) |
| **थांबे :** वापी, वलसाड, उधना, भरूच, वडोदरा, रतलाम, उज्जैन, संत हिरदाराम नगर, बीना, विरांगना लक्ष्मीबाई झाशी, कानपूर सेंट्रल, लखनौ, बाराबंकी, गोंडा, मनकापूर, बस्ती व खलीलाबाद स्थानक - दोन्ही दिशांना. गाडी क्र. ०९०३१ या गाडीला बोरिवली, पालघर, डहाणू रोड व गोध्रा स्थानकात अतिरिक्त थांबे असतील. | | | | |
| **रचना :** एसी ३ टीयर, शयनयान श्रेणी व सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे. | | | | |
| ०९०१३ | उधना - छपरा | ०५.१०.२०२४ ते ३०.११.२०२४ | ०७.०० वा. (शनिवार) | १९.३० वा. (दुसऱ्या दिवशी) |
| ०९०१४ | छपरा - उधना | ०६.१०.२०२४ ते ०१.१२.२०२४ | २२.३० वा. (रविवार) | ०८.१५ वा. (मंगळवार) |
| **थांबे :** भरूच, वडोदरा, गोध्रा, रतलाम, उज्जैन, संत हिरदाराम नगर, बीना, सौगोर, दमोह, कटनी, मुरवाडा, सतना, माणिकपूर, प्रयागराज छीवकी, मिर्झापूर, वाराणसी, औनीहार, गाझीपूर सिटी व बलिया स्टेशन - दोन्ही दिशांना. | | | | |
| **रचना :** एसी २ टीयर, एसी ३ टीयर, शयनयान श्रेणी व सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे. | | | | |

**गाडी क्र. १४७०८/१४७०७ दादर – बीकानेर राणकपूर एक्सप्रेसचा लालगढ स्थानकांपर्यंतचा तात्पुरता विस्तार दि. ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंत जारी राहील.**

वेळा, थांबे व रचनेसंदर्भातील विस्तृत माहितीकरिता प्रवाशांनी कृपया www.enquiry.indianrail.gov.in येथे भेट द्यावी.

**पश्चिम रेल्वे**
wr.indianrailways.gov.in
आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly
आम्हाला फॉलो करा : x.com/WesternRly

गाडी क्र. ०९०२७, ०९०३१ व ०९०१३ करिताची बुकिंग दि. २९.०९.२०२४ पासून सर्व पीआरएस काऊंटर्स व आयआरसीटीसी वेबसाइटवर खुली होत आहे. वरील गाड्या विशेष शुल्कावर विशेष गाड्या म्हणून चालविण्यात येतील.

सर्व आरक्षित तिकिटांकरिता कृपया मूळ ओळखीचा पुरावा सोबत बाळगा.



## परभणी शहर महानगरपालिका, परभणी

टेलीफोन क्र. (02452) 223232 ई-मेल : pcmcparbhani@gmail.com

जा.क्र.कावि/३५७९/ ई-निविदा/श.अ/बांध/जि.वा.यो I/२०२४-२५ दिनांक: २७/०९/२०२४

### ई-निविदा सुचना

कार्यालयीन ई-निविदा सुचना जा.क्र.कावि/३५७४/२०२४/बांध/ई-निविदा/दलित्तोतर.व.सू.यो. २०२३-२४, २०२४-२५ दि. २७/०९/२०२४, जा.क्र.कावि/३५७५/२०२४/बांध/ई-निविदा/दलित्तोतर.व.सू.यो. २०२३-२४, २०२४-२५ दि. २७/०९/२०२४, जा.क्र.कावि/३५७६/२०२४/बांध/ई-निविदा/दलित्तोतर.व.सू.यो. २०२३-२४, २०२४-२५ दि. २७/०९/२०२४, जा.क्र.कावि/३५७७/२०२४/बांध/ई-निविदा/दलित्तोतर.व.सू.यो. २०२३-२४, २०२४-२५ दि. २७/०९/२०२४ अन्वये परभणी शहर महानगरपालिका परभणी हद्दीत विविध प्रभागांमद्धे एकूण १२० कामांची ई-निविदा पध्दतीने निविदा मागविण्यात येत असुन सदर निविदा बाबतचा तपशील, अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाचे http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. २८/०९/२०२४ पासून पहावयास उपलब्ध आहेत.

सही/-
शहर अभियंता
परभणी शहर महानगरपालिका, परभणी.





कर्नाटक हायकोर्टाने पाच जणांविरुद्ध दाखल केलेला एफआयआर केला रद्द

# 'भारत माता की जय' द्वेषयुक्त घोषणा नाही

**बंगळुरू**, वृत्तसंस्था. कर्नाटक उच्च न्यायालयाने विविध धार्मिक गटांमधील शत्रुत्व रोखण्यासाठी दंडात्मक तरतुदींचा गैरवापर केल्याचा निषेध करत 'भारत माता की जय'च्या नारा दिल्याबद्दल पाच जणांविरुद्ध दाखल करण्यात आलेला एफआयआर रद्द केला आहे. 'भारत माता की जय'च्या घोषणा दिल्याबद्दल कर्नाटकातील उल्लाल तालुक्यातील रहिवाशांवर भारतीय दंड संहितेच्या कलम १५३ए अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. द्वेषयुक्त भाषण किंवा धार्मिक विसंगतीला प्रोत्साहन देण्यासाठी न्यायालयाने ही घोषणा योग्य मानली नाही. धार्मिक भावना दुखावणाऱ्या भाषणाची व्याख्या स्पष्ट करण्यासाठी हा निकाल महत्त्वाचा आहे.




**हे प्रकरण म्हणजे कलम १५३ए चा दुरुपयोग**

न्यायमूर्ती एम नागप्रसन्ना यांनी त्यांच्या निकालात म्हटले आहे की, हे प्रकरण भारतीय दंड संहितेच्या कलम १५३ए चा अभूतपूर्व गैरवापर आहे. कलम १५३ए अंतर्गत आरोप सिद्ध करण्यासाठी आवश्यक असलेले कोणतेही घटक या प्रकरणात उपस्थित नव्हते, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. हे प्रकरण कलम १५३ए चा उत्कृष्ट गैरवापर आहे आणि तो केवळ प्रतिकार म्हणून नोंदवला गेला.

**राष्ट्रीय एकात्मतेला चालना मिळते :** न्यायमूर्ती म्हणाले, 'भारत माता की जयच्या घोषणेच्या चौकशीला परवानगी देणे म्हणजे अशा घोषणांमुळे धार्मिक गटांमध्ये तेढ निर्माण होते, असा गैरसमज पसरवण्यासारखे होईल.' हे विधान एका महत्त्वाच्या प्रकरणात आले आहे, जिथे ५ जणांवर भारत माता की जयचा नारा दिल्याचा आरोप आहे. द्वेषयुक्त भाषण किंवा धार्मिक विसंगतीला प्रोत्साहन देणे न्यायालयाने योग्य मानले नाही. याचिकाकर्त्यांतर्फे वरिष्ठ अधिवक्ता एम अरुणा श्याम आणि अधिवक्ता ई सुयोग हेरळे यांनी बाजू मांडली तर राज्यातर्फे अतिरिक्त सरकारी वकील बीएन जगदीश यांनी हजेरी लावली.

# ब्रह्मोस एअरोस्पेसमध्ये अग्निवीरांना प्राधान्य

**दिल्ली**, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. अग्निवीरांना आता भारत आणि रशियाच्या संयुक्त भागिदारीच्या ब्रह्मोस एअरोस्पेस प्रायवेट लिमिटेड कंपनीमध्ये नोकरीत आरक्षण असणार आहे. कंपनीनेच यासंदर्भातील माहिती दिली आहे. ब्रह्मोस एअरोस्पेसमध्ये टेक्निकल विभागात १५ टक्के, प्रशासकीय आणि सुरक्षा विभागामध्ये अग्निवीरांचा ५० टक्के आरक्षण असणार आहे. विशेष म्हणजे हे पाऊल उचलून अग्निवीरांना आरक्षण देणारी ब्रह्मोस एअरोस्पेस पहिली प्रायवेट कंपनी ठरली आहे. कंपनीने यासंदर्भात पत्रक जारी केले आहे. यामध्ये म्हणण्यात आले की, कंपनी अग्निपथ योजनेमधील अग्निवीरांना नोकरीमध्ये आरक्षण देईल. चार वर्षांची सेवा देणाऱ्या अग्निवीरांना हा लाभ घेता येईल. टेक्निकल विभागात १५ टक्के अग्निवीरांना संधी असेल. ब्रह्मोस कंपनीचे देशभरात अनेक ठिकाणी सेंटर आहेत. अशा ठिकाणी सुरक्षा आणि प्रशासकीय कामासाठी



अग्निवीरांना ५० टक्के संधी असेल. याशिवाय ब्रह्मोस एअरोस्पेस थर्ड पार्टी कॉन्ट्रॅक्ट स्टाफिंगच्या माध्यमातून कमीतकमी १५ टक्के जागा अग्निवीरांना दिले जाईल. कंपनीमध्ये अग्निवीरांना प्राधान्य दिले जाईल. ब्रह्मोस एअरोस्पेस राष्ट्रीय सुरक्षेसाठी कटिबद्ध असून नव्या पिढीला सशक्त करण्यासाठी प्रयत्नशील आहे, असे कंपनीने म्हटले.

**आरक्षण देणारी पहिली कंपनी**

अग्निवीरांना आरक्षण जाहीर करणारी ब्रह्मोस पहिली कंपनी ठरली आहे. याशिवाय कंपनी आपल्या व्यापारसंबंधी २०० पेक्षा अधिक सहयोगी उद्योगांमध्ये अग्निवीरांना प्रोत्साहन मिळण्यासाठी प्रयत्न करेल. ब्रह्मोस एअरोस्पेस ही भारत आणि रशियाची संयुक्त कंपनी आहे.

## 'महिषासूर मर्दिनी'ची तयारी...



**नादिया :** आता वेध लागले आहेत ते नवरात्री व दुर्गापूजेचे. याच पार्श्वभूमीवर कलाकार 'महिषासूर मर्दिनी' या नृत्य नाटिकेतील प्रसंगाची रंगीत तालिम करण्यात व्यस्त दिसले.

मेक इन इंडियाचा उपक्रम • तीन देश खरेदीसाठी उत्सुक

# जगभरात 'वंदे भारत'चा डंका

**दिल्ली**, वृत्तसंस्था. मोदी सरकारच्या महत्त्वाकांक्षी मेक इन इंडिया उपक्रमातून साकारलेल्या वंदे भारत ट्रेन आता जगभरासाठी लक्षवेधी ठरली आहे. देशभरात या ट्रेनची लोकप्रियेता वाढत असतानाच कॅनडासह चिली, मलेशिया या देशांनी वंदे भारत ट्रेन खरेदीसाठी स्वारस्य दाखवले आहे. जगभराला वंदे भारत ट्रेनची भुरळ पडण्याचे कारण म्हणजे याची कमी किंमत हे आहे. अन्य देशांमध्ये अशाच प्रकाराची ट्रेन तयार करण्यासाठी सुमारे १६० ते १८० कोटी रुपये खर्च येतो तर वंदे भारत ट्रेनची किंमत सुमारे १२० ते १३० कोटी रुपये आहे.

**भारतात ४० हजार किमी विस्तारण्याचे लक्ष्य**



गेल्या १० वर्षांमध्ये ३१ हजार किलोमीटरहून अधिक ट्रॅक जोडण्यात आले आहेत. आता ४० हजार किलोमीटरपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य आहे. दहा हजार लोको आणि ९,६०० किलोमीटर ट्रॅकसाठी निविदा जारी करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली होती.

**- अश्विनी वैष्णव**, रेल्वेमंत्री



**जपानच्या बुलेट ट्रेनपेक्षाही वेगवान**

वंदे भारत लक्षवेधी ठरण्यामागील आणखी एक कारण म्हणजे ही ट्रेन ० ते १०० किमी प्रति तासाचा वेग गाठण्यासाठी फक्त ५२ सेकंद लागतात. हा वेग जपानच्या बुलेट ट्रेनपेक्षा जास्त आहे. जपानच्या बुलेट ट्रेनला ताशी ०-१०० किमीचा वेग गाठण्यासाठी ५४ सेकंद लागतात. तसेच ही ट्रेन विमानापेक्षा शंभरपट कमी आवाज करते. त्याचबरोबर ऊर्जेचा वापर खूपच कमी असतो.

# इमारतीच्या काचा साफ करताना ट्रॉलीची तुटली दोरी

**नोएडा.** येथे इमारतीची साफसफाई करताना दोन कामगार हवेत लटकले. सुदैवाने यावेळी कोणतीही मोठी दुर्घटना घडली नाही. ही घटना नोएडा सेक्टर-६२ मधील सांगितली जात आहे, जिथे एका बिल्डरच्या बांधकामाधीन प्रकल्पातील इमारतीची काच साफ करताना अचानक ट्रॉलीची दोरी तुटल्याने दोन मजुरांचा जीव धोक्यात आला. सुदैवाने ट्रॉलीला दोरी बांधल्याने कामगार खाली पडण्यापासून बचावले. या घटनेचा एक व्हिडीओ देखील सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये दोन मजूर ट्रॉलीवर बसून इमारतीची काच साफ करताना दिसत आहेत. काच साफ करताना दोरी तुटली. अचानक दोर तुटून दोन्ही कामगार हवेत लटकले. ट्रॉली झुकताच कामगारांनी मदतीसाठी आरडाओरडा सुरू केला. इमारतीच्या गच्चीवर उपस्थित असलेल्या इतर कामगारांनी अडकलेल्या दोन्ही कामगारांना सुखरूप वर खेचले आणि त्यामुळे दोघांचेही प्राण वाचले.



## # QUICK NEWS

### अस्वलाच्या हल्ल्यात मुलीसह २ ठार

**मारवाही.** छत्तीसगडमधील गौरेला-पेंड्रा-मारवाही जिल्ह्यात अस्वलाच्या हल्ल्यात एका मुलीसह दोघांचा मृत्यू झाला. या घटनेत आणखी चार जण जखमी झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी शनिवारी दिली. या हल्ल्यात १३ वर्षीय विद्या केवट आणि ३२ वर्षीय सुकुल प्रसाद यांचा मृत्यू झाला असून चरणसिंग खेरवार आणि रामकुमार जखमी झाले आहेत. अधिकाऱ्यांनी सांगितले की, शुक्रवारी संध्याकाळी बिहान लाल केवट यांची मुलगी विद्या तिच्या घरातून शेळ्या चरण्यासाठी शेतात गेली होती, त्यावेळी तिला अस्वलाचा सामना करावा लागला. या घटनेत मुलीचा जागीच मृत्यू झाला.

### जगात बुरशीजन्य संसर्गाचा वाढला धोका

**लंडन.** जगभरात सध्या बुरशीजन्य संसर्गाचा धोका वाढत असल्याचे दिसून आले आहे. एवढेच नव्हे तर याच्या उपचाराकरिता वापरली जाणारी औषधे प्रभावहिन होत असल्याचे संशोधनात आढळले आहे. या चोरपावलांनी पसरत असलेल्या धोक्याची वेळीच दखल घेणे गरजेचे असल्याचेही तज्ज्ञांचे म्हणणे आहे. ब्रिटनच्या मँचेस्टर विद्यापीठातील आण्विक जीवशास्त्रज्ञ नॉर्मन व्हॅन रिजन यांच्या मते, जागतिक आरोग्य चर्चांमध्ये बुरशीजन्य रोगजनक आणि अँटिफंगल प्रतिरोधकतेच्या धोक्याकडे दुर्लक्ष केले जात आहे.

# मूल होत नसल्याने तिहेरी तलाक

**कन्नौज.** येथे मुले होत नसल्यामुळे आणि कमी हुंडा दिल्याने तिहेरी तलाकचे प्रकरण समोर आले आहे. पीडितेने शनिवारी समाधान दिवस पोलिस ठाणे गाठून घटस्फोट देणाऱ्या पतीसह अन्य सासरच्या मंडळींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यासाठी तक्रार दाखल केली. मूल होत नसल्यामुळे तिहेरी तलाक देण्याचे हे प्रकरण कन्नौज सदर कोतवाली भागातील कुसुमखोरचे आहे. येथे राहणाऱ्या सोनीचा विवाह दोन वर्षांपूर्वी जवळच्या फुलपूर गावात राहणाऱ्या मुस्तकीम याच्याशी झाला होता. काही दिवस सर्व काही सुरळीत चालले, मात्र वर्षभरात सोनीला मूल न झाल्याने पती व इतर सासरच्यांनी सून सोनीला त्रास देण्यास सुरुवात केली.



# पतीला म्हटले मुर्ख-आळशी; फ्लिपकार्टचा माफीनामा

**दिल्ली**, वृत्तसंस्था. सध्या ई-कॉमर्स कंपनी फ्लिपकार्टवर 'बिग-बिलियन डेज सेल'ची ऑफर सुरू आहे. कंपनीने या विक्रीचा जोरदार प्रचार केला आणि अनेक जाहिरातींचे व्हिडीओ ऑनलाइन शेअर केले. दरम्यान, फ्लिपकार्टच्या एका जाहिरातीवरून वाद सुरू झाला जेव्हा व्हिडीओमध्ये महिलांना खरेदीसाठी प्रोत्साहन देताना त्यांच्या पतींना मूर्ख आणि आळशी म्हटले गेले. फ्लिपकार्टच्या या जाहिरातीच्या व्हिडीओने केवळ पतींच्या भावना दुखावल्या नाहीत तर अनेक महिलांनी सोशल मीडियावर कंपनीवर टीकाही केली. या वादानंतर फ्लिपकार्टने माफी मागितली आणि व्हिडीओ चुकून ऑनलाइन पोस्ट झाल्याचे सांगितले. जाहिरात व्हिडीओमध्ये एक जोडपे दाखवले आहे. हे सल्ला देते की महिला त्यांच्या पतींच्या नकळत ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवरून हँडबॅग कशा ऑर्डर करू शकतात आणि साठवू शकतात. या जाहिरातीला सोशल मीडियावर टीकेचा सामना करावा लागला. एनएमसीइंडिया कौन्सिल फॉर मेन अफेयर्सने हा व्हिडीओ फेसबुकवर पोस्ट केला असून ही जाहिरात टॉक्सिक आणि दिशाभूल करणारी असल्याचे म्हटले आहे. चुकीने पोस्ट करण्यात आलेल्या आक्षेपार्ह व्हिडीओबद्दल आम्ही दिलगीर आहोत आणि आमची चूक लक्षात येताच आम्ही तो काढून टाकल्याचे कंपनीने म्हटले आहे.




# सुआलकुला मिळाला 'बेस्ट टुरिझम व्हिलेज' पुरस्कार

**दिल्ली**, वृत्तसंस्था. आसाममधील सुआलकुची गावाला यंदाच्या हस्तकला प्रकारात 'बेस्ट टुरिझम व्हिलेज' पुरस्कार मिळाला आहे. रेशीम विणकाम उद्योगाचे केंद्र असल्याने आसामच्या सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण स्थान मिळविल्याबद्दल हा सन्मान देण्यात आला आहे. जागतिक पर्यटन दिनानिमित्त पर्यटन मंत्रालयाने हा पुरस्कार जाहीर केल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. मुगा, इरी, पाट आणि तुसार या रेशमी कापडांचा वारसा जपण्यासाठी सुआलकुची गाव प्रसिद्ध आहे. मुगा रेशीमला त्याच्या विशिष्ट गुण आणि वैशिष्ट्यांमुळे आंतरराष्ट्रीय मान्यतादेखील मिळाली आहे. सुआलकुचीच्या रेशीम विणकाम उद्योगाच्या संवर्धनासाठी आणि कल्याणासाठी काम करणाऱ्या मार्व्हेला या स्थानिक एनजीओचा गौरव करण्यात आला आहे. मार्वेलाचे सह-संस्थापक जुगल भराली म्हणाले की, पिढ्यानपिढ्या जुनी कला जिवंत ठेवण्यासाठी सर्व ग्रामस्थांच्या एकत्रित प्रयत्नांचे हे फळ आहे.

# धर्मांतरावरील टिप्पणी अनावश्यक

हायकोर्टाला फटकारले

**दिल्ली**, वृत्तसंस्था. अलाहाबाद हायकोर्टाने धर्मांतरावर केलेली टिप्पणी अनावश्यक असल्याचे सांगत ती काढून टाकण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, या टिप्पण्या उच्च न्यायालय किंवा इतर कोणत्याही न्यायालयाकडून इतर कोणत्याही प्रकरणात किंवा कार्यवाहीमध्ये उद्धृत केल्या जाणार नाहीत. काही दिवसांपूर्वी अलाहाबाद हायकोर्टाने धर्मांतराच्या विरोधात अतिशय कडक टिप्पणी केली होती आणि असे म्हटले होते की, जर हे असेच चालू राहिले तर लवकरच या देशातील बहुसंख्य लोकसंख्या अल्पसंख्याक होईल. सरन्यायाधीश चंद्रचूड आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खं ड पी ठा ने कैलास नावाच्या व्यक्तीला जामीन मंजूर करताना हा आदेश दिला, ज्यांच्याविरुद्ध उत्तर प्रदेश बेकायदेशीर धर्मपरिवर्तन प्रतिबंध कायदा आणि भारतीय दंड संहितेच्या कलम ३६५ प्रकरण आहे. भारतीय दंड संहितेअंतर्गत (ओलिस ठेवण्याच्या उद्देशाने अपहरण) नोंदवले गेले. सर्वोच्च न्यायालयाने आरोपीला दिलासा दिला की तो २१ मे २०२३ पासून कोठडीत आहे. खंडपीठाने म्हटले की, आम्ही स्पष्ट करतो की हायकोर्टाने केलेल्या सर्वसाधारण निरीक्षणांचा सध्याच्या खटल्यातील तथ्यांशी काहीही संबंध नाही आणि त्यामुळे खटल्याच्या निकालासाठी त्यांची आवश्यकता नाही. त्यामुळे, ही निरीक्षणे इतर कोणत्याही प्रकरणात किंवा उच्च न्यायालय किंवा अन्य कोणत्याही न्यायालयात सुरू असताना उद्धृत केली जाणार नाहीत. यापूर्वी २ जुलै रोजी आरोपींना जामीन देण्यास नकार देताना, उच्च न्यायालयाने असे धर्मांतर संविधानाच्या विरोधात आहे, जे केवळ 'विवेक स्वातंत्र्य आणि अखंड व्यवसाय, धर्माचा आचरण आणि प्रचार' करण्यास परवानगी देत असल्याचे म्हटले होते.



# ९० मिनिटांत ३ दरोडे, चित्रपटाचा फॉर्म्युला

दरोड्यात वापरलेली एसयूव्ही कंटेनरमध्ये लपवली

**तिरुवनंपूरम**, वृत्तसंस्था. केरळमधील त्रिशूरमध्ये एका टोळीने अवघ्या ९० मिनिटांत तीन एटीएममधून सुमारे ७० लाख रुपये लुटले. दरोडा टाकल्यानंतर हे लोक दोन गटात पळून गेले.

मात्र अवघ्या २४ तासांत केरळ आणि तामिळनाडू पोलिसांनी या टोळीला दरोड्याच्या पैशांसह फिल्मी शैलीत पकडले. हरयाणातील या टोळीने प्रथम त्रिशूर येथील मप्रनामच्या एटीएममधून ३५ लाख रुपये लुटले. त्यानंतर ते शोरनूर रोडवरील एसबीआय एटीएममध्ये पोहोचले, तेथून त्यांनी ९.५ लाख रुपये लुटले. एसबीआयच्या कोलाझी शाखेच्या एटीएममध्ये तिसरा दरोडा पडला. जिथून २५ लाख रुपये लुटले. मात्र, या वेळी लुटलेले पैसे घेऊन पळून गेलेल्या एका आरोपीचा मृत्यू झाला तर एकाच्या पायात गोळी लागली. उर्वरित ५ जण पोलिसांच्या ताब्यात आहेत. आरोपींच्या गोळ्यांनी दोन पोलीस कर्मचारीही जखमी झाले. या संपूर्ण घटनेतील सर्वात आश्चर्यकारक बाब म्हणजे कंटेनरमध्ये लपवलेली कार. ज्यामध्ये दोन आरोपीही लपून बसले होते. कंटेनर ठाण्यात घेऊन जाताना पोलिसांना हा प्रकार समजला.पलवल, हरयाणातून टोळीचे सदस्य पकडले तामिळनाडू-केरळ पोलिसांच्या संयुक्त कारवाईत पकडलेले सर्व आरोपी हरयाणाचे रहिवासी आहेत. जप्त केलेला कंटेनर ट्रक राजस्थानचा आहे. ते बंगळुरूहून भाड्याने घेतले होते. जमालुद्दीन हमीद, अझर अली, बी मुबारिक, एल साबीर खान, एस शौकीन, इरफान, मोहम्मद इकराम अशी आरोपींची नावे आहेत. जमालुद्दीन ठार झाला आहे.



तिरुपती लाडू वादाचा वणवा अयोध्येपर्यंत

# राम मंदिराच्या प्रसादाच्या नमुन्यांची होणार चाचणी

**अयोध्या**, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. तिरुपती बालाजी मंदिरातील लाडूंमध्ये प्राण्यांची चरबी मिसळल्याची घटना समोर आल्यानंतर देशभरात संतापाची लाट आहे. या घटनेवरून देशभरातील मोठ्या मंदिरांमध्ये केल्या जाणाऱ्या प्रसादाच्या शुद्धतेवर आणि पावित्र्यावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, या घटनेचा धडा घेत देशभरातील अनेक मंदिरे अलर्ट झाली आहेत. यामुळेच आता देशभरातील मंदिरांमधून प्रसादाचे नमुने तपासणीसाठी पाठवले जात आहेत. यामध्ये अयोध्येतील राम मंदिराचाही समावेश आहे. राम मंदिरातील प्रसादाचे नमुनेही प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. तसेच, अयोध्येतील संतांनी बैठक घेऊन बाजारातून खरेदी केलेला प्रसाद मंदिरांमध्ये देवाला अर्पण करू नये, असे आवाहन केले. अयोध्येच्या राम मंदिरात रामाला रबडी आणि पेढा अर्पण केला जातो आणि प्रसाद म्हणून वेलचीचे दाणे वाटले जातात. या सर्व गोष्टींचे नमुने घेण्यात आले आहेत. तपास अहवाल आल्यानंतर मंदिराच्या प्रसादात भेसळ आहे की नाही, हे निश्चित होईल.

**वेळोवेळी तपास केला जातो**



राम मंदिर ट्रस्टचे कार्यालय प्रभारी प्रकाश गुप्ता सांगतात की, बाहेरून रामललाला प्रसाद दिला जात नाही. भाविक दर्शनासाठी रिकाम्या हाताने मंदिरात जातात. राम मंदिर ट्रस्टतर्फे भाविकांना प्रसाद म्हणून वेलची बियांचे वाटप केले जाते. लहान वेलची आणि साखर मिसळून हा प्रसाद तयार केला जातो. हा प्रसाद स्वच्छ आणि आरोग्यदायी पद्धतीने बनवला जातो. प्रसादाची वेळोवेळी तपासणी केली जाते.

# शॉपिंगसाठी कायदा शिकणारा विद्यार्थी चोर

**लखनौ, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** आपल्या गर्लफ्रेंडचा शॉपिंगचा हट्ट पूर्ण करण्यासाठी आणि तिला महागडा आयफोन घेऊन देण्यासाठी लॉचे शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थ्याला चोरी करावी लागल्याची घटना उत्तर प्रदेशात उघडकीस आली आहे. गर्लफ्रेंडचा हट्ट पूर्ण करण्यासाठी अनेक घरांमध्ये त्याने चोरी केल्याचे कबूल केले आहे. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी त्या विद्यार्थ्याला अटक केली आहे. उत्तर प्रदेशातील लखनौमध्ये हा विद्यार्थी कायद्याचे (लॉ)चे शिक्षण घेत होता. अब्दुल हलीम असे आरोपीचे नाव असून तो उत्तर प्रदेशातील जौनपूरचा रहिवासी आहे. गर्लफ्रेंला खूश करण्यासाठी आणि तिचा हट्ट पूर्ण करण्यासाठी चोरी केल्याची कबुली अब्दुलने पोलिसांना दिली. एका आठवड्याच्या कालावधीत त्याने परिसरातील तीन घरांमध्ये चोरी केल्याची माहितीही सांगितली. मैत्रिणीला मॉलमध्ये शॉपिंग करायला आवडते. तसेच आयफोन खरेदी करणे, महागड्या क्लबमध्ये जाणे, मित्रमैत्रिणींसोबत चित्रपट पाहायला जाणे यासाठी तो आपल्या मैत्रिणीच्या या गोष्टी पूर्ण करण्यासाठी घरात जाऊन चोरी करायचा.



मुख्यमंत्री आतिशी यांची घोषणा

# कोविड मृतांच्या कुटुंबीयांना १ कोटी

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** दिल्ली सरकार कोरोना महामारीत प्राण गमावलेल्या पाच जणांना प्रत्येकी एक कोटी रुपये देणार आहे. मुख्यमंत्री अतिशी यांनी या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. यापूर्वी दिल्ली सरकारने कोरोना महामारीत प्राण गमावलेल्या ९२ जणांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १ कोटी रुपये मानधन दिले होते. यावेळी मुख्यमंत्री आतिशी म्हणाले की, दिल्लीतील जनतेने जीवाची पर्वा न करता मानवता आणि समाजाचे रक्षण करण्याचे काम केले आणि कोरोना महामारीच्या काळात आपल्या प्राणांची आहुती दिली. दिल्ली सरकार त्यांच्या आत्म्याला सलाम करते, असे त्या म्हणाल्या. अर्थात या रकमेतून मृतांच्या कुटुंबीयांचे झालेले नुकसान भरून निघू शकत नसले तरी त्यांच्या कुटुंबीयांना सन्मानाचे जीवन जगण्याचे साधन नक्कीच मिळेल.

दसऱ्याची तयारी• विशेष पुतळा तयार करण्यासाठी कारागिरांची रात्रंदिवस मेहनत

# रावण फिरवणार मान; तलवारही चालविणार

**कोटा**, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. देशभरातील प्रसिद्ध कोचिंग शहर असलेल्या कोटा येथील दसरा मेळ्यात खास रावणाचे दर्शन होणार आहे. हा रावण मान फिरवून तलवारीचा वापरही करणार आहे. रावणाचा हा विशेष पुतळा तयार करण्यासाठी कारागीर रात्रंदिवस मेहनत घेत आहेत. रावणाचा हा पुतळा तयार करण्यासाठी ५०० बांबू वापरण्यात येत आहेत. रावणाचा हा पुतळा ८० फूट उंच असेल. १२ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय दसरा मेळाव्यात रावण दहन करण्यात येणार आहे. जत्रेची तयारी जोरात सुरू आहे. कोटा येथे आयोजित राष्ट्रीय दसरा मेळा प्रत्येक वेळी वेगवेगळ्या वैशिष्ट्यांनी भरलेला असतो. यावेळी रावणाच्या पुतळ्याबाबत नाविन्यपूर्ण काम करण्यात येत आहे. येथे रावणासह मेघनाथ आणि कुंभकरणाचे पुतळेही दहनाची तयारी केली जात आहे. यावेळी कोटा नगरपालिकेने पुतळे बनवण्याचे टेंडर दिल्लीतील कारागिरांना दिले आहे.

| ८० | ५०० | ३०० | ७.३० |
|---|---|---|---|
| फूट उंच | बांबूंचा उपयोग | किलो कागद्याच्या कचऱ्याचा वापर | लाख रुपये खर्च |



**उभारण्यासाठी अधिक खर्च**

रावणाचा पुतळा ८० फूट उंच असेल, तर मेघनाथ आणि कुंभकरणाचा पुतळा ६०-६० फूट उंच असेल. तिन्ही पुतळ्यांचे धड, डोके आणि पाय बनवण्याचे काम वेगाने सुरू आहे. १० ऑक्टोबरपूर्वी सर्व पुतळे तयार होतील. त्यानंतर ते विजय श्री थिएटरमध्ये रंगणार आहेत. विशेष म्हणजे त्यांना बांधण्यापेक्षा त्यांना उभारण्यासाठी जास्त खर्च येतो. रावणाच्या कुळाचे पुतळे बनवण्यासाठी सुमारे ५०० बांबू, सुमारे ३०० किलो कागदाचा कचरा, १५० किलोपेक्षा जास्त मैदा आणि दोरीचा वापर केला जात आहे.







CMYK

मुंबई नवराष्ट्र प्लस
मुंबई, रविवार, २९ सप्टेंबर २०२४ | www.navarashtra.com | /navarashtra



स्मारकाची माहिती दिली जात नाही

पान ३..

# मुंबईत दर तासाला २ जणांना डेंग्यू

## गोकुळ नगरमध्ये आजाराचा कहर

**महाराष्ट्रात पावसानंतर हंगामी आजारांचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत आहे. राजधानी मुंबईत डेंग्यू, मलेरिया आणि टायफॉइडचे रुग्ण सातत्याने दिसू लागले आहेत. अनेक भाग डेंग्यूचे हॉटस्पॉट बनले आहेत.**

**मुंबई,** (वा.) कांदिवली पूर्वतील गोकुळ नगर भागातील बहुतांश रुग्णांमध्ये डेंग्यू, मलेरिया, टायफॉइड, चिकनगुनियाची लक्षणे दिसून येत आहेत. परिणामी नागरिकांसाठी चिंतेचा विषय आहे. मुंबईकर डासांमुळे होणाऱ्या आजारांना बळी पडत आहेत. मुंबईत सप्टेंबर महिन्यात सरासरी तासाला २ जणांमध्ये डेंग्यूची लक्षणे दिसून येत आहेत. पहिल्या २० दिवसांत ९६० लोक डेंग्यू तर ७५२ लोक मलेरियाने ग्रस्त आढळले. त्यापैकी ५० ते ६० टक्के रुग्ण रुग्णालयात दाखल झाले आहेत. गोकुळ नगर हा झोपडपट्टीबहुल परिसर आहे. येथील लोकसंख्या ११ ते १२ हजारांच्या आसपास आहे. सप्टेंबर महिन्यात गोकुळ नगरमध्ये डेंग्यूचे १९ रुग्ण, मलेरियाचे ९ रुग्ण, टायफॉईडचे ७ रुग्ण आणि ९ चिकुनगुनियाचे रुग्ण आढळून आले. ज्यांच्यावर परिसरातील खासगी डॉक्टर आणि सरकारी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### झोपडपट्ट्यांमध्ये औषधांची फवारणी नाही




महापालिकेने झोपडपट्टीत वेळोवेळी औषध फवारणी करावी, असे स्थानिकांचे मत आहे. जे गोकुळ नगरमध्ये केले जात नसल्याने गोकुळ नगरमध्ये डासजन्य आजारांचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र, महापालिकेच्या पी उत्तर विभागाच्या आरोग्य विभागाचे अधिकारी या विषयावर काहीही बोलण्यास स्पष्टपणे टाळत आहेत. गंभीर डेंग्यूच्या लक्षणांमध्ये पोटदुखी, हिरड्या किंवा नाकातून रक्त येणे ही आजाराची लक्षणे आहेत.

मी आनंद चाळ येथील रहिवासी आहे. आधी शरीर दुखू लागले आणि नंतर रात्री ताप आल्यावर डॉक्टरांचा सल्ला घेतला. त्यानंतर डॉक्टरांनी मला रक्त तपासणी करण्याचा सल्ला दिला, तेव्हा मला डेंग्यूची लक्षणे आढळून आली आणि माझ्या प्लेटलेट्सही कमी झाल्या. खासगी डॉक्टरांकडे माझे उपचार सुरू आहेत. आमच्या भागात कीटकनाशकांची फवारणी करावी, अशी माझी महापालिकेकडे मागणी आहे.

–धीरज तिवारी, डेंग्यू ग्रस्त रुग्ण

## रमाबाई आंबेडकर नगर, कामराज नगर पुनर्वसनासाठी एमएमआरडीएचे पाऊल

# ८ हजार ४९८ कोटींचा निधी

**मुंबई,** (वा.) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) घाटकोपर (पूर्व) येथील माता रमाबाई आंबेडकर नगर आणि कामराज नगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी ८ हजार ४९८ कोटींचा निधी मंजूर केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या प्राधिकरणाच्या १५८ व्या बैठकीत ही मंजुरी देण्यात आली. हजारो झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करणे आणि शाश्वत शहरी विकासाला चालना देणे, हे या महत्वाकांक्षी प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्र शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला (एसआरए) स्थानिक स्वराज्य संस्था आणि एमएमआरडीए, म्हाडा, सिडको यांसारख्या इतर संस्थांसोबत प्रकल्पांच्या संयुक्त अंमलबजावणीचे अधिकार दिले होते. रमाबाई आंबेडकर नगर आणि कामराज नगर येथील योजना एमएमआरडीए आणि एसआरए यांच्या संयुक्त भागीदारी तत्त्वावर राबविण्यात येणार आहे.




### ४८ महिन्यात प्रकल्प पूर्ण

हा प्रकल्प ४८ महिन्यांत पूर्ण होईल. या प्रकल्पांतर्गत, पात्र झोपडपट्टीधारकांना मोफत सदनिका उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे बगीचे, आरोग्य केंद्रे आणि शैक्षणिक सुविधा यांसारख्या मूलभूत पायाभूत सुविधा देखील विकसित करण्यात येणार आहेत. या योजनेमध्ये पूर्व मुक्त मार्गाचे विस्तारीकरणही समाविष्ट आहे. हा या भागातील एक महत्त्वाचा पायाभूत प्रकल्प आहे.

मुंबईतील झोपडपट्टीधारकांचे जीवनमान उंचावणे आणि पायाभूत सुविधांचा विकास करणे हे आमच्या सरकारचे उद्दिष्ट आहे. माता रमाबाई आंबेडकर नगर प्रकल्प शाश्वत शहरी विकासाच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाऊल आहे.

– एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री.

ही झोपडपट्टी पुनर्वसन योजना हजारो झोपडपट्टीधारकांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी एक महत्वपूर्ण पाऊल आहेच, त्याचप्रमाणे आधुनिक, सर्वसमावेशक मुंबई आमच्या उद्दिष्टाचा एक महत्वाचा भाग आहे. अशा प्रगतीशील उपक्रमांचे नेतृत्व आम्ही करत आहोत, याचा आम्हाला अभिमान आहे.

–डॉ. संजय मुखर्जी, महानगर आयुक्त–एमएमआरडीए



## कामा रुग्णालयात युरोलॉजी विभाग




**मुंबई,** (वा.) महिलांमध्ये गर्भाशय, मूत्राशयाचा त्रास आणि अचानक लघवी होणे यासारख्या समस्यांवर उपचार करण्यासाठी कामा रुग्णालयात अत्याधुनिक विशेष युरोलॉजी विभाग सुरू करण्यात येणार आहे. ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर, रायगड येथून येणाऱ्या महिलांना कामा रुग्णालयात चांगले उपचार मिळण्यास मदत होणार आहे. येत्या काही दिवसांत या विभागाचे उद्घाटन होणार आहे. या विभागासाठी आवश्यक असलेल्या सर्व अद्ययावत सुविधा टाटा ट्रस्टच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सरकारी रुग्णालयातील हा पहिलाच विभाग आहे, जो संपूर्णपणे सुसज्ज आणि आधुनिक आहे.

### उद्घाटन लवकरच

या अत्याधुनिक विभागाचे उद्घाटन मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि आरोग्यमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते होणार आहे. अपर्णा हेगडे यांची यूरोलॉजी विभागाच्या प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ.हेगडे यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णांवर उपचार केले जाणार असल्याचे कामा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ.तुषार पालवे यांनी सांगितले.

# उच्च न्यायालयाच्या प्रतिष्ठेला धक्का नाही

## कोल्हापूर खंडपीठाच्या पार्श्वभूमीवर न्या. भूषण गवई यांची स्पष्टोक्ती

**मुंबई,** (वा.) कोल्हापूर येथे उच्च न्यायालयाच्या चौथ्या खंडपीठाची निर्मिती झाल्यास मुंबई उच्च न्यायालयाच्या प्रतिष्ठेला धक्का लागणार नाही, असे परखड मत सर्वोच्च न्यायालयाचे न्या. भूषण गवई यांनी शनिवारी व्यक्त केले. तसेच कोल्हापूर खंडपीठाच्या स्थापनेला आपला पाठिंबा दर्शवला.

नवी मुंबईतील तळोजा येथे अभिवक्ता अकादमी आणि संशोधन केंद्राच्या पायाभरणीप्रसंगी न्या. भूषण गवई यांनी उपरोक्त मत व्यक्त केले. या खंडपीठामुळे दुर्गम भागातील नागरिकांना जलद गतीने न्याय मिळवून देण्याच्या प्रक्रियेत सुलभता येईल, असेही गवई स्पष्ट केले. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री आणि कायदामंत्री देवेंद्र फडणवीस, सर्वोच्च न्यायालयाचे न्या. प्रसन्न बी वराळे, उच्च न्यायालयाचे न्या. अजय गडकरी, न्या. सारंग कोतवाल आणि न्या. मनीष पितळे यांच्यासह आणि महाधिवक्ता बीरेंद्र सराफ उपस्थित होते.



### आर्थिक आणि सामाजिक समानतेचे काय?

एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य हे तत्त्व अंगीकारून आम्ही राजकीय न्याय, समानता मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु आर्थिक आणि सामाजिक समानतेचे काय? सामाजिक आणि आर्थिक न्यायाचे काय? आर्थिक योजनांचे काय? असा सवाल गवई यांनी केला.

### दरी कमी करण्यासाठी वकीलांची भूमिका महत्वाची

- आपल्या देशाची संपूर्ण संपत्ती काही हातात केंद्रित आहे. तर दुसरीकडे, बहुसंख्य लोकांना न्याय मिळवणेही कठीण झाले आहे.
- सामाजिक स्तरावर, आपला समाज विविध वर्गामध्ये विभागलेला आहे. त्या विभागवारीमुळे एका वर्गातून दुसऱ्या वर्गात जाणे अशक्य असल्याचेही न्या. गवई यांनी नमूद केले.
- त्यामुळे कायदा आणि घटनेच्या आधारे एक वकील ही सामाजिक आणि आर्थिक दरी कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतो, असेही न्या. गवई यांनी अधोरेखित केले.

प्रस्तावित अकादमी तरुण वकिलांसाठी सर्वसमावेशक प्रशिक्षण देणारी आणि सामान्य जनतेमध्ये कायदा आणि व्यावसायिक जागरूकता निर्माण करणारी देशातील पहिलीच अकादमी असेल, असेही न्या. गवई यांनी अधोरेखीत केले.

भिजत घोंगडे • रेल्वे व राज्य सरकारकडे पुनर्वसनाची मागणी;अन्यथा मतदानावर बहिष्कार

# रेल्वे लगतच्या झोपडीधारकांना न्याय कधी?

**मुंबई,** (वा.) पश्चिम रेल्वे रुळाच्या लगत असलेली झोपडपट्टीधारकांना न्याय कधी मिळणार असा सवाल करत रेल्वे प्रशासन व राज्य सरकारने आमचे पुनर्वसन करावे अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान याची दखल न घेतल्यास आगामी विधानसभा निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकू, असा इशारा झोपडपट्टीधारकांनी दिला आहे. प्रभादेवी, दादर, माटुंगा, माहीम, गोरेगाव येथील ५९८ झोपडी धारकांचे पुनर्वसन करण्यासाठी पश्चिम रेल्वे, मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन व राज्य सरकारमध्ये संयुक्त बैठक झाली होती. त्यानंतर रेल्वे झोपडपट्टी पुनर्वसन करण्यासाठी ५० टक्के राज्य सरकार व ५० टक्के पश्चिम रेल्वे मिळून संबंधित झोपडी धारकांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय एमयुटीपी २ व अंतर्गत २००८ मध्ये घेण्यात आला. मात्र तो आजही धूळ खात पडला आहे.



### ५०३ झोपडीधारकांमधून फक्त ८ जणांचे पुनर्वसन

- दरम्यान, सर्वेक्षण करण्याअगोदर, पश्चिम रेल्वेच्या संबंधित विभागाने वारंवार निष्कासित करण्याच्या कारवाईमुळे संपूर्ण सर्वेक्षण झाले नाही.
- स्पार्क संस्थेद्वारे दादर चेतन हनुमान नगर १४५, कमाला रमण नगर २ मधील १७५, न्यु गणेश नगर माटुंगा रोड - ४८, एकूण ३६८ व उर्वरित न्यु गणेश नगर -४०, साईनाथ नगर प्रभादेवी रोड ९५ तसेच गोरेगाव पूर्व रेल्वे स्टेशन येथील जय आंबे वेल्फेअर सोसायटी, आंबेडकर नगर, सोनावला कंपाउंड,गोरेगाव पूर्व ९८ असे एकूण - ५०३ झोपडी धारकांमधून फक्त ८ झोपडी धारकांचे पुनर्वसन झालेले आहे.

### पुनर्वसनाचे निर्देश देऊनही चालढकल

एमयुटीपी धोरणामध्ये पादचारी पूल व रोड बनविण्यासाठी पुनर्वसन करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार पश्चिम रेल्वेचे उपमुख्य अभियंत्यांनी मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनला निर्देश दिले, त्या निर्देशानुसार झोपडपट्टी पुनर्वसन करण्यासाठी सर्वेक्षणाचे आदेश स्पार्क संस्थेला २४ ऑक्टोबर २०१६ देण्यात आले.

दरम्यान, संबंधित विभागाला वारंवार पत्रव्यवहार करून सुद्धा रेल्वे प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. उर्वरित झोपडी धारकांना अजूनही न्याय मिळालेला नाही. ते घरांच्या प्रतीक्षेत आहेत.

रेल्वे प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्यांना न्याय द्यावा अशी मागणी दादर,प्रभादेवी, माटुंगा,माहीम, गोरेगाव पूर्व रेल्वे लगत मधील झोपडीधारक करत आहेत.

### ११ वर्षे उलटूनही न्याय नाही

स्थानिक झोपडीधारक कमिटीने वारंवार पत्र व्यवहार करून सुद्धा रेल्वे दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे स्थानिक झोपडीधारक अजून पर्यंत आम्हाला न्याय मिळणार का नाही ? असा प्रश्न उपस्थित करत आहेत. लवकरच तुमचे पुनर्वसन करू असे सांगितले होते, मात्र ११ वर्षे उलटून गेले तरीही आमचे पुनर्वसन झालेले नाही, असे प्रभादेवी येथील झोपडीधारकांनी सांगितले.

# QUICK NEWS

### स्वच्छता कर्मचाऱ्यांचा मोलाचा वाटा: गगराणी



**मुंबई :** स्वच्छता कर्मचाऱ्यांचे आरोग्य सुस्थितीत राहिले, तरच मुंबईकरांचे आरोग्य चांगले राहील. यासाठी मुंबई महापालिकेतर्फे स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी वेळोवेळी आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येते. त्याद्वारे स्वच्छता कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्याबाबत जागृती निर्माण होण्यास मदत मिळते. मुंबई स्वच्छ व सुंदर राखून, मुंबईकरांचे आरोग्य निरोगी व सुदृढ ठेवण्याकामी स्वच्छता कर्मचाऱ्यांचा मोलाचा वाटा आहे, असे प्रतिपादन महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी केले.

केंद्र आणि राज्य शासनाच्या आदेशानुसार, महानगरपालिकेतर्फे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा राबवण्यात येत आहे.

## सेलीब्रेशन सिनेट विजयाचे..!



मुंबई विद्यापीठावर युवासेनेचा विजय झाल्यानंतर मातोश्री येथे विजयी जल्लोष साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे, तेजस ठाकरे, वरुण सरदेसाई व अन्य.

# व्यावसायिकाला ६ कोटींना फसवले

## दोन नातेवाईकांविरोधात पोलीसात गुन्हा दाखल

**मुंबई,** (वा.) व्यावसायिकाला ६ कोटींना फसवल्याप्रकरणी दोन नातेवाईकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. टर्नर रोड येथील रहिवासी ५२ वर्षीय गुरुदत्त कामत यांच्या तक्रारीवरून वांद्रे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तक्रारीत त्याच्या दोन नातेवाईकांवर सहा कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. १९९९ मध्ये कामत यांनी त्यांच्या दोन बहिणींसोबत महामाया फ्रॅग्रन्स कंपनीच्या नावाखाली आवश्यक तेले बनविण्याचा व्यवसाय सुरू केला, ज्यामध्ये आरोपींनी कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली. एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, आम्ही गुन्हा नोंदवला असून तक्रारीची पडताळणी करत आहोत आणि प्रकरणाचा तपास करत आहोत. गुरुदत्त कामत यांनी दावा केला की, २००० मध्ये त्यांचे नातेवाईक श्यामसुंदर नायक, वसंत नायक यांनी या व्यवसायात सामील होण्यास स्वारस्य दाखवले होते.

त्यांनी नायक सोबत शिरशा फ्रेग्रन्स नावाची दुसरी कंपनी स्थापन केली होती, कामत पुढे म्हणाले की, त्यांची शिरशा बायोटेकमध्ये भागीदारी ५० टक्के होती. आणि नायक यांची २५ - २५ टक्के हिस्सेदारी होती. २००७ मध्ये त्यांनी नायक आणि वडील मंजुनाथ नायक यांच्यासह चार भागीदारांसह कर्नाटकातील कुंदापूर येथे कारखाना सुरू केला. कामत यांच्या म्हणण्यानुसार, २०१३ मध्ये भागीदारीत बदल झाला, त्यानंतर फक्त दोन भागीदार राहिले, एक ते आणि दुसरे श्यामसुंदर नायक. कामत म्हणाले की भूमिका देखील स्पष्टपणे विभागल्या गेल्या होत्या, जिथे श्यामसुंदर नायक कंपनीचे उत्पादन आणि वित्त विषय हाताळत होते, तर मार्केटिंग आणि विक्री ऑपरेशन्स हाताळायचे. तथापि, २०१९ मध्ये, त्याला त्याच्या कंपनीचे बँक खाते हस्तांतरित करायचे होते आणि आर्थिक कागदपत्रांची पडताळणी करताना नवीन बँकेने आर्थिक कागदपत्रे मागितली होती.

### लेखापरीक्षणात रक्कम काढल्याचे आढळले


- कामतने असा दावा केला की तो कथित घोटाळा झाला.
- आर्थिक जबाबदारीचा आरोप असलेल्या चार्टर्ड अकाउंटंटने दावा केला की, श्यामसुंदर नायक यांनी दिलेल्या माहितीनुसार आपण हिशेब तयार केले होते आणि आपल्याला कोणत्याही अनियमिततेची माहिती नाही.
- त्यानंतर, कंपनीने स्वतंत्र लेखापरीक्षकाची नियुक्ती केली.
- त्या लेखापरीक्षणात २००७ ते २०२३ दरम्यान ६ कोटी रुपयांची रक्कम काढण्यात आल्याचे आढळले, त्यानंतर तक्रार दाखल करण्यात आली.

चित्ररंग • मंत्री सुधीर मुनगंटीवार यांची अपेक्षा; चित्रपट निर्मात्यांना २९ कोटीच्या धनादेश वितरणाचा कार्यक्रम

# मराठी चित्रपटसृष्टीने जागतिक झेप घ्यावी

**मुंबई,** (वा.) शासन नेहमीच मराठी चित्रपटसृष्टीच्या पाठीशी ठामपणे उभे असून मराठी चित्रपटसृष्टीने आता जागतिक झेप घ्यावी, असे प्रतिपादन सुधीर मुनगंटीवार यांनी केले. दर्जेदार मराठी चित्रपटांना अनुदान वाटपाच्या कार्यक्रमात सह्याद्री अतिथीगृहात ते आज बोलत होते.

यावेळी बोलतांना ते पुढे म्हणाले की, मुंबई कोल्हापूर प्रमाणे लवकरच नागपूर मध्ये सुद्धा १५० एकर जागेमध्ये फिल्म सिटी तयार करणार असून मराठी चित्रपट निर्मात्यांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या विविध परवानग्यासाठी एक खिडकी योजनेची अंमलबजावणी करणार आहे तसेच राज्यात ७५ नवीन चित्रनाट्य गृहे बनविण्यात येणार आहेत. तसेच नरिमन पॉईंट येथे मराठी चित्रपट गृह उभारण्यात येणार असल्याचेही सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी सांगितले.



### भारतीय चित्रपट सृष्टीची मुहुर्तमेढ महाराष्ट्रातच

दर्जेदार चित्रपट निर्मात्यांना शासनामार्फत आर्थिक पाठबळ मिळावं यासाठी हा प्रयत्न आहे. हा फक्त धनादेश नाही तर महाराष्ट्राच्या साडे तेरा कोटी जनतेच्या या शुभेच्छा आहेत. माझी अशी अपेक्षा आहे की मराठी चित्रपटसृष्टीने अजून प्रगती करावी. जसे दक्षिणात्य भाषेचे चित्रपट हा मराठी मध्ये डबिंग करून दाखवले जातात तसे भविष्यात मराठी चित्रपट दक्षिणात्य व अन्य भाषेमध्ये डबिंग करून दाखवला गेले पाहिजेत. इतकेच नव्हे तर मराठी चित्रपटसृष्टीने सातासमुद्रापार जात जागतिक झेप घ्यावी अशी सर्व मराठी जनतेची अपेक्षा आहे. कारण भारतीय चित्रपटसृष्टीचा संस्थापकच मराठी होता आणि भारतीय चित्रपट सृष्टीची मुहुर्तमेढ या महाराष्ट्रातच रोवली गेली होती. म्हणूनच मराठी चित्रपट सृष्टीच्या प्रगतीसाठी शासन कटिबद्ध आहे असेही मंत्री मुनगंटीवार म्हणाले.

### दर्जेदार चित्रपटांना देण्यात आले अर्थहाय्य

दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या ४७ वर्धापन दिनाचा मुहूर्त साधून या चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास मंडळाने आजच्या दिवशी या कार्यक्रमाचे आयोजन केले. अ, ब आणि क या तीन श्रेणीत मोडणाऱ्या दर्जेदार चित्रपटाना हे अर्थसहाय्य देण्यात आले. या कार्यक्रमात अपर मुख्य सचिव विकास खारगे, महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास मंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील, सह व्यवस्थापकीय संचालक धनंजय सावळकर यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमात ७७ अ व ब वर्ग दर्जाच्या व तसेच प्रथमच समावेश केलेल्या क वर्गाच्या २१ चित्रपट निर्मात्यांना २९ कोटी २२ लाख रुपयांचे धनादेश वितरण करण्यात आले.

### चित्रपट निर्मात्यांसाठी निशुल्क चित्रीकरण

मंत्री मुनगंटीवार पुढे म्हणाले की, निर्मात्यांना जिथे चित्रीकरण करायचे तिथे त्यांना निशुल्क चित्रीकरण करता येणार आहे. उत्तम चित्रपट तयार करण्यासाठी निर्मात्यांनी खूप मेहनत घेतलेली असते पण कधी यश मिळते तर कधी अपयशाला सामोरे जावे लागते, मात्र त्यामुळे खचून जायचे नसते.

# 'बुक माय शो'चे अधिकारी पोलिसांसमोर हजर होणार

## कोल्डप्ले कॉन्सर्टच्या तिकीटांचा काळाबाजार

**मुंबई,** (वा.) कोल्डप्ले कॉन्सर्टच्या तिकीटांचा काळाबाजार प्रकरणी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने बुक माय शो चे मालक असलेल्या बिग ट्री एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे सीईओ आशिष हेमराजानी आणि कंपनीचे तांत्रिक प्रमुख यांना चौकशीसाठी समन्स बजावले आहे. एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, त्यांना दोन ते तीन दिवसांत चौकशीसाठी येण्यास सांगितले आहे, आशा आहे की ते पुढील आठवड्यात येतील, सध्या आम्ही या प्रकरणाचा गांभीर्याने तपास करत आहोत. मुंबईस्थित लॉ फर्म व्हर्टिसेस पार्टनर्सचे संस्थापक आणि वकील अमित व्यास, २२ सप्टेंबर रोजी नवी मुंबईतील कोल्डप्ले कॉन्सर्टसाठी तिकीट बुक करण्यासाठी बुक माय शो च्या वेबसाइटवर लॉग इन करणाऱ्या लाखो चाहत्यांपैकी एक होते.

### पोलिसात तक्रार दाखल

पण व्यास अचानक लॉग आउट झाले आणि जेव्हा त्यांना तिकीट मिळू शकले नाही, तेव्हा व्यास यांनी थोडे संशोधन केले आणि त्यांना असे आढळले की त्यांच्या अनेक मित्रांना असाच अनुभव होता, यामुळे व्यास यांनी जानेवारी २०२५ मध्ये नियोजित प्रसिद्ध ब्रिटिश रॉक बँडच्या मैफिलीची तिकिटे शोधली. बुक माय शो, लाइव्ह नेशन आणि कार्यक्रमाच्या इतर प्रवर्तकांविरुद्ध कथित काळाबाजाराबद्दल पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे. व्यास यांचा जबाब इओडब्ल्यूने आधीच नोंदवले आहे, ज्यामध्ये त्यांनी असा आरोप केला आहे की बुक माय शोने त्यांची, सामान्य जनता आणि कोल्डप्लेच्या चाहत्यांची फसवणूक केली आहे.

## सायन रुग्णालयात १० हजारांहून अधिक नवजात बालकांना आधार

# पहिली मदर मिल्क बँक




मुंबई, (वा.) महानगरातील मातांच्या अनोख्या मिल्क बँकेने गेल्या ५ वर्षांत १० हजारांहून अधिक बालकांना जीवनदान दिले आहे. महानगरपालिका संचलित सायन हॉस्पिटलमध्ये आशियातील पहिली 'मदर मिल्क' बँक सुरू करण्यात आली आहे. या मिल्क बँकेत ४३ हजार ४१२ महिलांनी दूध दान केले, त्यामुळे १० हजार ५१३ मुलांना मदत झाली. बीएमसीने दिलेल्या माहितीनुसार, ४३ हजार ४१२ स्तनदा मातांच्या देणग्यांमुळे १० हजार ५१३ नवजात बालकांना मदत झाली आहे. दान केलेले आईचे दूध अकाली, कमी वजनाच्या आणि जोखीम असलेल्या अर्भकांमध्ये मृत्यूचे प्रमाण कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. ही मिल्क बँक दरवर्षी सुमारे २ हजार २ हजार ५०० नवजात बालकांना मदत करते. आईचे दूध हे विशेष आहे.

### हिमोग्लोबिन बाळासाठी आवश्यक

कारण त्यात हिमोग्लोबिन आणि नवजात बाळाच्या विकासासाठी आवश्यक जीवनसत्त्वे असतात. बँकांना दान केलेल्या दुधामुळे जन्मतः कमी वजन असलेल्या आणि वाढ खुंटलेल्या बाळांना आणि प्रसूतीनंतरच्या गुंतागुंतीमुळे स्तनपान करू न शकणाऱ्या स्त्रियांच्या पोटी जन्मलेल्या बाळांना मदत झाली आहे. सायन हॉस्पिटल आता पश्चिम भारतातील वैद्यकीय आस्थापनांना अशाच प्रकारच्या दुध बँका उभारण्यात मदत करत आहे.

ही 'ब्रेस्ट मिल्क' बँक १९८९ मध्ये आर्मिडा फर्नांडिस यांनी सुरू केली होती आणि तिला टाटा समूहाच्या इंडियन हॉटेल्स कंपनी लिमिटेडकडून एक लाख रुपयांची देणगी मिळाली होती. त्यावेळी अजित केरकर या कंपनीचे अध्यक्ष होते. ही आशियातील पहिली मातेची दूध बँक आहे.

–डॉ. मोहन जोशी
डीन– सायन हॉस्पिटल

आईच्या दुधाअभावी एकाही मुलाला आपला जीव गमवावा लागू नये, हा या मिल्क बँकेचा उद्देश आहे. रक्तदात्यांकडून दूध गोळा करताना आम्ही सुरक्षिततेची सर्व खबरदारी घेतो. आम्ही स्तनपान देणाऱ्या मातांशी संपर्क साधतो, ज्या आपल्या बाळाला पाजल्यानंतर त्यांचे दूध हॉस्पिटलमध्ये दान करू शकतात. संकलित केलेले दूध डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच दिले जाते.

–डॉ. स्वाती मणेरकर
निओनॅटोलॉजी विभागाचे प्रमुख (सायन हॉस्पिटल)



## इनरव्हील क्लबचे वार्षिक स्नेहसंमेलन

मुंबई, (वा.) 'मैत्रीयी' प्रत्येक कथेसाठी एक शैली' या बॅनरखाली बॉम्बे एअरपोर्ट संस्थेच्या ' इन व्हील क्लब' सदस्यांचे वार्षिक स्नेहसंमेलन संस्थेच्या अध्यक्षा बीना जरीवाला नेतृत्त्वात पार पडले. जूहू येथील हॉटेल नोवटेलमध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य एग्जिबिशन आयोजित केले होते. यावेळी संस्थेच्या सेक्रेटरी प्रीति तसेच चेअरमन दीना पारिख आणि दिशा यांच्या नेतृत्वात ' मैत्रीयी – प्रत्येक कहाणीसाठी एक शैली ' चे १४ वे संमेलन होते. दरवर्षी आगळ्या वेगळ्या प्रकारे हा सोहळा आयोजित केला जातो. त्यात विशेषतः परोपकारी भावना आणि फॅशन यांचा संगम असतो असे यावेळी सांगण्यात आले. यावेळी मान्यवरांनी कौतुक करताना सांगितले की, मैत्रीयीच्या अध्यक्षा बीना यांच्यासह समुदायामध्ये सकारात्मक वाढीसाठी क्लबची क्षमता योग्य आहे. प्रत्येक संमेलनात वेगवेगळ्या विषयांवरील महत्त्व वाढवण्यात येत आहे. यावेळी लालित्य आणि हार्दिक दान यांचे संयोजन झाले होते असेही सांगण्यात आले. दरम्यान संस्थेचे कार्य गेल्या काही वर्षांत यशाची कमान गाठत असून, विविध स्तरांतील मान्यवरांवर एक छाप उमटत आहे अशी मते यावेळी व्यक्त केली.

## भाजपच्या सेवा पंधरवड्यानिमित्त चांदिवलीत रक्तदान शिबिर




मुंबई, (वा.) देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विशेष आवाहनानुसार भाजपने ' सेवा पंधरवडा' अंतर्गत भारतीय अल्पसंख्याक प्रतिष्ठान आणि अहिमसा विश्व भारती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच चांदिवली भाजप मंडळ आणि मुंबई अल्पसंख्यांक मोर्चाच्या विशेष सहकार्याने साकीनाका येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी तब्बल २२५ युनिट रक्त संकलन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने रक्तदान शिबिरात अनेक मान्यवर सहभागी झाले. या रक्तदान शिबिराचा अनेकांनी लाभ घेतला.

### प्रमाणपत्र वितरण

यात सहभागी झालेल्या विश्वभारती अहिमसेचे संस्थापक रक्तदान, एकता आणि बंधुत्वाचा संदेश देण्यात समर्पित असलेले आचार्य डॉ. लोकेश मुनीजी महाराज, चंडीगढ विद्यापीठाचे कुलपती आणि भारतीय अल्पसंख्याक प्रतिष्ठानचे अध्यक्ष सतनाम सिंह संधू, मुंबई भाजपचे महासचिव आणि राज्याचे माजी मंत्री संजय उपाध्याय, चांदिवलीचे आमदार दिलीप लांडे, सामाजिक कार्यकर्ते अनिल गलगली, मुंबई भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे अध्यक्ष वसीम आर खान, चांदिवली मंडळाचे अध्यक्ष प्रकाश देवजी मोरे, उत्तर मध्य मुंबई जिल्हाचे उपाध्यक्ष शुभ्रांशू दीक्षित, माजी नगरसेवक सीताराम तिवारी, प्रभाग अध्यक्ष प्रशांत मौर्य, महेश चौगुले उपस्थित होते.

## रमेशकुमार सिंग आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित




मुंबई, (वा.) शिक्षणाशिवाय आपले जीवन अपूर्ण आहे. त्यासाठी आपल्या सर्वांना ज्ञानाच्या माळा घालणाऱ्या शिक्षकाचे आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. शिक्षक समाजासाठी आदर्श आधारस्तंभ ठरतात. त्यापैकी एक व्यक्तिमत्त्व रमेशकुमार सिंग हे आहेत. त्यांना आतापर्यंत सात वेळा आणि आता आठव्यांदा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांचे शिक्षण क्षेत्रातून अभिनंदन होत आहे. रमेश कुमार सिंग हे आदर्श नाईट हिंदी हायस्कूल मुलुंड तसेच संट उलई हिंदी हायस्कूल स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय ठाणे येथे हिंदी, मराठी आणि समाजशास्त्र विषय शिकवतात. आदर्श नाईट हिंदी हायस्कूलचा (मुलुंड ) गेल्या तीन वर्षांपासून उत्कृष्ट निकाल लागत आहे. त्यामुळे आदर्श नाईट स्कूल आणि रमेश सिंग यांच्यासाठी गेल्या तीन वर्षांपासून सलग या पुरस्कारांची हॅट्रीक होत आहे.

### ८ वेळा सन्मान

त्यांना गेल्या २७ वर्षांत ८ वेळा सर्वोत्कृष्ट आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. लायन्स क्लबच्या वतीने आयोजित केलेल्या समारंभात त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या या विशेष कामगिरीबद्दल मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांसह सर्व स्तरातील मान्यवरांकडून अभिनंदन होत आहे.

## मनपाच्या चौकीवर फलक बसवा

मुंबई, (वा.) शासकीय कार्यालयावर, मोकळ्या व राखीव भूखंडावर नियमानुसार नामफलक लावणे बंधनकारक आहे. परंतु भांडुप (प.) येथील संत शिरोमणी नामदेव महाराज मार्गावरील स्टेशन परिसरातील मनपाच्या चौकीवर नामफलक नाही. यामुळे ही चौकी नेमकी कसली व कोणाची असा संभ्रम नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे. त्यामुळे भांडुप पश्चिमेकडील स्टेशन परिसरात असलेल्या मनपाच्या चौकीवर लवकरात लवकर नामफलक बसवण्यात यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते गणेश वराडे यांनी पालिका एस कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त भास्कर कसगीकर यांच्याकडे केली आहे.

दरम्यान, या मागणीची तातडीने दखल घेण्याची मागणी करण्यात आली आहे. नामफलक नसल्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. कारण ती चौकी नेमकी कुठल्या आस्थापनाची आहे, हे समजून येत नाही.

दिलासा • पोर्ट प्रशासन आणि कामगार संघटनांत वाटाघाटी

## बंदर, गोदी कामगारांची पगारवाढ

मुंबई, (वा.) भारतातील प्रमुख बंदरामधील बंदर व गोदी कामगारांना भरघोस पगारवाढ करार झाला आहे. पोर्ट ट्रस्ट प्रशासन आणि कामगार संघटना प्रतिनीधी यांच्यात हा करार करण्यात आला आहे. त्यामुळे अखेर १ जानेवारी २०२२ पासून लागू होणारा भरघोस पगारवाढीचा हा वेतन करार कामगारांसाठी दिलासादायक ठरणार आहे. इंडियन पोर्ट असोसिएशन आणि ६ मान्यताप्राप्त कामगार महासंघ यांच्यात गेल्या २७ ऑगस्ट २०२४ रोजी दिल्लीमध्ये समझोता वेतन करार संपन्न झाला होता. इंडियन पोर्ट असोसिएशनचे व्यवस्थापकीय संचालक विकास नरवाल यांनी २७ सप्टेंबर २०२४ रोजी द्विपक्षीय वेतन समितीची मिटिंग आयोजित केली होती. यावेळी सर्व बंदरांचे चेअरमन व ६ फेडरेशनचे कामगार नेत्यांना अंतिम वेतन करारासाठी मुंबईत निमंत्रित केले होते.



### ५ वर्षांचा वेतन करार

दिल्लीत झालेल्या समझोता वेतन करारानुसार मुंबईत द्विपक्षीय वेतन समितीचे अध्यक्ष राजीव जलोटा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत प्रदीर्घ चर्चा झाली होती. त्यानंतर बंदर व गोदी कामगारांना १ जानेवारी २०२२ ते ३१ डिसेंबर २०२६ असा ५ वर्षांचा पगारवाढीचा वेतन करार केला आहे.

### यांच्या आहेत स्वाक्षऱ्या

या अंतिम वेतन करारावर व्यवस्थापनाच्या वतीने इंडियन पोर्ट असोसिएशनचे चेअरमन राजीव जलोटा, व्यवस्थापकीय सचिव विकास नरवाल, प्रादेशिक श्रम आयुक्त (केंद्रीय) सुनील माळी तर कामगारांच्या वतीने ॲड.एस. के. शेट्ये, सुधाकर अपराज, विद्याधर राणे, मोहम्मद हनीफ, केरसी पारेख, डी. के. शर्मा, जी.एम.कृष्णमूर्ती, एल. सत्य नारायणन, नरेंद्र राव, सी.डी. नंदकुमार, प्रभात सामंतराय, बी.सी. मासेन, सुरेश पाटील यांनी सह्या केल्या आहेत.

## ॲक्युप्रेशर व अक्युपंक्चर आरोग्य शिबिर

मुंबई, (वा.) विक्रोळीत ॲक्युप्रेशर व अक्युपंक्चर मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. प्रतीक अहिरे यांच्या सौजन्याने समाजसेवक राधेश्याम शर्मा यांच्या प्रयत्नाने आयोजित शिबिरात रुग्णांची मोफत तपासणी व उपचार केले गेले. यात मान, कंबर, डोके, गुडघा, लकवा, मायग्रेन, सायटिका, संधिवात, फ्रोजन शोल्डर, टाच दुखणे इत्यादी अनेक आजारावर मोफत उपचार केले गेले.

या कार्यक्रमात प्रसिद्ध डॉ. राजेश विजन आणि डॉ. खुशी जैन यांनी प्रत्येक रुग्णांची तपासणी करून त्यांच्या आजारावर मोफत उपचार केले. दर महिन्याला होणाऱ्या या मोफत आरोग्य शिबिरात विक्रोळी तसेच आजूबाजूच्या विभागातील रुग्ण मोठ्या प्रमाणात मोफत शिबिराचा लाभ घेतात असे आयोजक राधेश्याम शर्मा यांनी सांगितले. त्यामुळे अनेक रूग्णांना या शिबीराचा फायदा झाला आहे.

# QUICK NEWS

### आशिष शेलारांकडून पवन त्रिपाठींचा सत्कार

मुंबई. मुंबई भाजपचे उपाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी यांची श्री सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टच्या कोषाध्यक्षपदासाठी निवड करण्यात आली आहे. ही नवी जबाबदारी मिळाल्याबद्दल आशिष शेलार यांनी शनिवारी मुंबई भाजप कार्यालयात आयोजित विशेष कार्यक्रमात आचार्य पवन त्रिपाठी यांचा सत्कार केला. सत्कार समारंभात आमदार राजहंस सिंह, मुंबई भाजपचे सरचिटणीस संजय उपाध्याय, उत्तर भारतीय मोर्चाचे अध्यक्ष जयप्रकाश सिंह, प्रतीक कर्पे, आर. डी.यादव, रमाकांत गुप्ता, वीरेंद्र दुबे, प्रदीप त्रिपाठी, बलवंत वर्मा आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### आज विद्यार्थ्यांची भव्य बाईक रॅली

मुंबईः भारतीय संविधानाचे निर्माते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या पुनर्विकासासाठी राज्य सरकारच्या समाज कल्याण खात्याकडून मंजूर करण्यात आलेला कोट्यावधी रुपयांचा निधी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अडकून ठेवल्याचा आरोप करीत गेल्या एक महिन्यापासून रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदेने राज्यभर आंदोलने केली होती. या आंदोलनाची सांगता माता रमाबाई आंबेडकर नगर ते दादर चैत्यभूमी येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून करण्यात येणार असल्याची माहिती बहुजन रिपब्लिकन विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष चंद्रशेखर कांबळे यांनी दिली आहे. यानिमित्त आज विद्यार्थ्यांची भव्य बाईक रॅली काढण्यात येणार आहे

## 'रीइमेजिनिंग मॉडर्न कल्चर'चे उद्घाटन

मुंबई, (वा.) 'पॉप मीट्स फ्यूजनः रीइमेजिनिंग मॉडर्न कल्चर' या प्रदर्शनाचे उद्घाटन डिझाईनरा पॉप आर्ट गॅलरी, वन लोढा प्लेस, लोअर परेल येथे करण्यात आले. भारतीय लोककलांचे जतन करण्यासाठी पॉप आर्ट गॅलरी, डिझायनारा यांनी संयुक्तपणे हे प्रदर्शन आयोजित केले आहे. २९ सप्टेंबरपर्यंत हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. उद्घाटनावेळी, सातव्या शतकातील प्राचीन भारतीय कलेचे जतन करण्यात मोलाची भूमिका बजावणाऱ्या प्रतिकृती कलेक्टिव्हच्या संस्थापिका प्रतिमा देसाई म्हणाल्या की, कलाप्रेमींचा एवढा मोठा आणि वैविध्यपूर्ण समूह एकत्र येणे ही अभिमानाची गोष्ट आहे. भारतीय वारसा आणि आधुनिक सर्जनशीलता आहे.



### २५ कलाकारांच्या जीवंत कलाकृती

हा कार्यक्रम सिद्ध करतो की कला भूतकाळ आणि वर्तमान जोडते आणि या विषयावर नवीन संभाषणांना प्रोत्साहन देते. क्युरेटर्सनी फ्युजन थीमवर २५ कलाकारांच्या जीवंत कलाकृती सादर केल्या. या प्रदर्शनात भारतीय कलाकार सानूज बिर्ला, अदिती निकम आणि हितेश तसेच फ्रेंड ॲलार्ड आणि ब्रेनवॉश सारख्या आंतरराष्ट्रीय कलाकारांच्या कलाकृतींचे प्रदर्शन भरवण्यात आले. डिझाइनराच्या संस्थापक अमृता देवरा म्हणाल्या की, देशातील पहिली आणि एकमेव पॉप आर्ट गॅलरी म्हणून भारतातील चळवळीचे नेतृत्व करणे खरोखरच अद्भुत आहे. आगामी पॉप आर्ट फ्यूजन प्रदर्शनाबद्दल आम्ही खूप उत्सुक आहोत.

## खाजगी प्राथमिक शाळांची कथाकथन स्पर्धा

मुंबई, (वा.) अस्मिता संचालित रामगोपाल केडिया प्राथमिक विद्यालयामध्ये एच पूर्व, एच पश्चिम, के पूर्व, के पश्चिम विभाग अंतर्गत खाजगी प्राथमिक शाळा यांची कथाकथन स्पर्धा शुक्रवारी पार पडली. या स्पर्धेत विभागातील १८ शाळांनी सहभाग नोंदविला होता. इयत्ता तिसरीसाठी रामायणातील गोष्टी तर इयत्ता चौथीसाठी महाभारतातील गोष्टी या विषयावर विद्यार्थ्यांनी कथाकथन केले. स्पर्धा पार पडल्यावर बक्षीस समारंभ झाला. बक्षीस समारंभाचे अध्यक्षस्थान अस्मिता संस्थेचे सरचिटणीस राजन चाचड यांनी भूषविले. चाचड यांच्या हस्ते सर्व विजेत्या स्पर्धकांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी विभागातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.

## शहीद भगतसिंग यांची जयंती साजरी




मुंबई, (वा.) गुरू नानक पदवी महाविद्यालय, गुरु तेग बहादूर नगर येथे कॉन्स्टिट्यूशन क्लब आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी शहीद भगतसिंग यांची ११७ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांना भगतसिंगांच्या विचारांची जाणीव व्हावी व त्यांच्यामध्ये देशभक्तीची भावना रुजावी यासाठी वक्तृत्व स्पर्धा व काव्यवाचनाचे आयोजन करण्यात आले होते. राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्राध्यापक सुमित खरात यांचे भगतसिंग यांच्यावर व्याख्यान झाले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पुष्पिंदर कौर भाटिया यांनी भगतसिंग आणि युवा पिढी या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.




### 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'बाबत जनजागृती

मुंबईः राज्यातील महिलांना स्वावलंबी आणि स्वावलंबी बनवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसबाहेर पथनाट्याद्वारे 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'चा प्रचार करणारे कलाकार. सरकारी योजनांबाबत लोकांमध्ये जनजागृती करण्याचे काम कलाकारांकडून केले जात आहे.

## मुलींच्या सुरक्षेसाठी 'निर्भय वॉक'

मुंबई, (वा.) गेल्या काही महिन्यांपासून मुंबईसह राज्यात बालिका, तरुणी आणि महिलांवरील अत्याचारात वाढ झाली आहे. त्या तुलनेत पोलीस कारवाई कडक होण्यासाठी आता मुंबईतील विविध संघटना आणि चळवळीतील कार्यकर्त्यांनी घाटकोपर येथे ' समाजभान जागवण्यासाठी निर्भय वॉक ' हा उपक्रम सुरू केला आहे. यातून मुली, महिलांना सुरक्षेचा संदेश देण्यात येणार आहे. येत्या मंगळवारी (१ ऑक्टोबर) सायंकाळी साडेसहा वाजता घाटकोपर पश्चिम येथील भटवाडी गणेश मंदिर पासून ते पूर्वेकडील रायगड चौकापर्यंत हा निर्भय वॉक शेकडोंच्या संख्येने जाणार आहे.

### विविध संघटनांना सहभागी होण्याचे आवाहन

त्यासाठी समाजातील सर्व संघटनांना आणि घटकांना यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. आपली मुलगी, मुलगा शाळा - कॉलेज, नोकरीच्या निमित्ताने घराबाहेर असतात. ती सुखरूप घरी येतील की नाही या काळजीने आपण अस्वस्थ असतो. घराच्या वाटेवर येताना नाक्यावर कुणी तिची छेड काढणार नाही ना? शाळा, कॉलेज तसेच शाळेच्या बसमधून, रिक्षा मधून, ट्रेन, बस प्रवासात ती सुरक्षित असेल का? असे अनेक प्रश्न पालकांच्या मनात घोंगावत असतात. त्यामुळे पाल्यांच्या सुरक्षेबाबत जगृतीसाठी हा उपक्रम सुरू केल्याची माहिती ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शरद कदम यांनी दिली.

### महिलांकडे निकोप दृष्टीकोनातून पाहणे गरजेचे

स्त्रियांकडे निकोप जनतेने बघण्याचा, समानतेचा, चांगले मित्र मैत्रिणी जोडण्याचा, चांगली पुस्तके वाचण्याचा आणि जबाबदार नागरिक बनण्यासाठी यातून संदेश दिला जाणार असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, गांधी जयंतीच्या पूर्व संध्येला या ' निर्भय वॉक' चे आयोजन केले असून, हा वॉक घाटकोपर पश्चिम येथील मधील भटवाडी, काजूपाडा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून निघणार आहे. भटवाडी मार्केट, जवाहरभाई प्लॉट, जीवदया लेन, महात्मा गांधी मार्गावरून, ईस्ट वेस्ट ब्रीज वरून, एन वॉर्ड मार्गे घाटकोपर पूर्वेकडील रायगड चौकापर्यंत जाणार आहे.

### मान्यवरांचा घाटकोपरमध्ये सहभाग असणार

महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी, शिवसेनेचे डॉ. संजय लाखे पाटील, नितीन वैद्य, अभिनेत्री चिन्मयी सुमीत, ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे, लोकशाहीर संभाजी भगत, शिवसेनेचे विभाग प्रमुख सुरेश पाटील, राष्ट्रवादीच्या मुंबई अध्यक्षा राखी जाधव, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अब्राहम रॉय मणी, काँग्रेस गुजराथी सेलचे मुंबई अध्यक्ष केतन शहा,शिवसेना महिला विभाग प्रमुख प्रज्ञा सकपाळ, राष्ट्र सेवा दलाचे शरद कदम, मराठी भाषा केंद्राचे प्रा.दीपक पवार, राष्ट्रवादीचे ॲड. अमोल मातेले, सूर्यकांत कळंबकर आदी मान्यवर यावेळी सहभागी होणार आहेत.

## आज शहरात

- **श्री महावर वैश्य सेवा संघ** : ५२ वी वार्षिक सभा, स्थळ- भुरा भाई हॉल, इराणीवाडी, शांतीलाल रोड, कांदिवली पश्चिम, वेळ- सकाळी १० वा.
- **शिवसेनाः** उत्तर भारतीय संवाद सभा, स्थळ- गल्ली क्रमांक ३, गणपती पाटील नगर, न्यू लिंक रोड बोरिवली, पश्चिम, वेळ- संध्याकाळी ६ वा.
- **वाइल्ड वर्ल्ड एक्झिबिशन** : स्थळ- आर्मी आणि नेव्ही बिल्डिंगमधील कला प्रवेश गॅलरी, काळा घोडा, ३० सप्टेंबरपर्यंत.
- **सौदी अरेबियामध्ये स्वागत** : स्थळ - आर-२ ग्राउंड, बीकेसी, -२ ऑक्टोबरपर्यंत
- **उद्योग आढावा** : स्थळ- बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, मुंबई, वेळ- संध्याकाळी ६.
- **'इंटरमॅट इंडिया' कार्यक्रम** : स्थळ- नेस्को प्रायव्हेट लिमिटेड, वेस्टर्न एक्सप्रेस हायवेच्या पुढे, गोरेगाव पूर्व, वेळ- दुपारी
- **मुंबई ऑफलाइन कार्यशाळा** : स्थळ- ड्रीम सिटी टूर्स अँड ट्रॅव्हल्स, एमएल कॅम्प, माटुंगा लेबर कॅम्प, धारावी, २९ सप्टेंबर पर्यंत, वेळ- दुपारी १२ ते ६.
- **क्रेडाई-एमसीएचआयः** स्थळ- जिओ कन्व्हेन्शन सेंटर, बीकेसी, वांद्रे पूर्व, वेळ- सकाळी ११.३० ते संध्याकाळी ७.३०.

भक्तीसंगम • ठिकठिकाणी मिरवणुकीसह अनेक कार्यक्रम; आग्रोहा डेव्हलपमेंट ट्रस्टची तयारी

## अग्रसेन जयंतीची जय्यत तयारी सुरु

मुंबई, (वा.) यावर्षी ३ ऑक्टोबर रोजी मुंबईत महाराजा अग्रसेन जयंती साजरी होणार असून, त्याची तयारी जोरात सुरू झाली आहे. मुंबई येथील अग्रोहा डेव्हलपमेंट ट्रस्टचे केंद्रीय मंत्री अल्केश अग्रवाल म्हणाले की, महाराजा अग्रसेन यांची जयंती ट्रस्टतर्फे गेल्या ३७ वर्षांपासून मोठ्या थाटामाटात साजरी केली जात आहे. आग्रोहा डेव्हलपमेंट ट्रस्टतर्फे दरवर्षी मीरा रोड, भाईंदर, घाटकोपर, चेंबूर, ठाणे, वाशी, खारघर इत्यादी ठिकाणी मुंबई आणि आजूबाजूच्या ठिकाणी जयंती मोठ्या उत्सवाचे आयोजन केले जाते. आग्रोहा डेव्हलपमेंट ट्रस्टच्या ६२ समित्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. ज्यामध्ये ३० महिला, २५ पुरुष आणि ७ युवक समित्यांचा समावेश आहे. जयंतीच्या दिवशी ट्रस्टतर्फे रथयात्रा, महाराजांच्या तबकडीची मिरवणूक, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, पूजा, आरती व महाप्रसाद आदींचे आयोजन केले जाते.



### चर्नी रोड ते काळबादेवी मिरवणूक

चर्नी रोड येथे अग्रवाल सेवा समाज आणि अखिल भारतीय अग्रवाल परिषदेतर्फे महाराजा अग्रसेन जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दोन्ही संघटनांचे अध्यक्ष सुरेशचंद्र अग्रवाल व डॉ.राजेंद्र अग्रवाल यांच्या सहकार्याने ३ ऑक्टोबर रोजी चर्नी रोड ते कालवडदेवी भाटिया महाजनवाडी अशी मिरवणूक काढण्यात येणार आहे. नेहरू सभागृहात ८ ऑक्टोबर रोजी सांस्कृतिक व संगीतमय कार्यक्म होतील. या कार्यक्रमाला उद्योगपती राजेश झुनझुनवाला, महेश बंशीधर अग्रवाल, रमेश अग्रवाल, पुरुषोत्तम अग्रवाल, रामसिंग अग्रवाल, मोहनलाल अग्रवाल, नीता सिंघल आणि अनिल मुरारका यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. अग्रवाल समाज पोलीस ठाण्याचे अध्यक्ष (पं.) श्याम अग्रवाल, मंत्री अशोक बन्सल आणि समन्वयक विशाल अग्रवाल यांनी ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता ठाणे पश्चिम महाराजा अग्रसेन चौक, काशिनाथ घाणेकर हाऊस येथे कार्यक्रम होईल.

### गोरेगावमध्ये परंपरा, संस्कृती, वारसा यांचा अनोखा संगम पहायला मिळणार

५ ऑक्टोबर रोजी गोरेगाव पश्चिम कामथ क्लब लेन उद्योग नगर येथे ५१४९ व्या महाराजा अग्रसेन जन्मोत्सवाचे आयोजन अग्रबंधू सेवा समिती (रजि.) मुंबईचे अध्यक्ष अमरिश्चंद्र अग्रवाल यांनी केले आहे. परंपरा, संस्कृती आणि वारसा यांचा अनोखा संगम या कार्यक्रमात पाहायला मिळणार आहे. नाट्यकलाकार रचना पांडे यांच्या दिग्दर्शनाखाली संस्थेच्या सदस्यांतर्फे नऊ दुर्गा आणि कुलदेवी माता महालक्ष्मी यांच्यावर आधारित संगीतमय नृत्यनाटिका सादर करण्यात येणार आहे. ७५ वर्षांवरील सामाजिक नेत्यांसाठी अग्रवाल रत्न पुरस्कार सोहळ्याचेही आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात कन्हैयालाल सराफ, श्यामसुंदर रुईया, ब्रिजमोहन अग्रवाल, जगदीश खेमचंद गुप्ता, नटवरलाल अग्रवाल, जुगल बी. अग्रवाल, सुरेश उदयचंद गुप्ता, रमेश सिंघानिया आणि ओम प्रकाश गोएंका यांना अग्रवाल रत्न प्रदान करण्यात येणार आहे. संस्थेचे मानद मंत्री उदेश अग्रवाल, खजिनदार गोपालदास गोयल, महिला अध्यक्षा सुधा लक्ष्मीनारायण अग्रवाल, मंत्री मधु राजेंद्र अग्रवाल, कोषाध्यक्ष अनिता अनिल अग्रवाल व इतर अधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

## १० हजार लाडक्या बहिणींना साड्यांचे वाटप करणार

### भाजप अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश उपाध्यक्षांची माहिती

मुंबई, (वा.) जोगेशवरी भागातील १० हजार लाडक्या बहिणींना साड्या आणि सुटचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष एस.एम.खान यांनी दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढ दिवसानिमित्त सध्या 'सेवा पंधरवाडा' सुरू आहे. या पार्श्वभूमीवर भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष एस.एम.खान यांनी येत्या शनिवारी ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ओशिवरा येथील म्हाडा मैदानावर एका कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. त्यात तब्बल १० हजार महिलांना मोफत साड्या व सूट वाटप केले जाणार आहे.



### फडणवीस राहणार उपस्थित

हा कार्यक्रम ओशिवरा मेट्रो स्टेशन जवळ होणार असून, या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अमृता फडणवीस तसेच ॲड.आशिष शेलार उपस्थित राहणार आहेत. संजय केणेकर, संजय उपाध्याय, आमदार भारती लवेकर, अल्पसंख्याक मोर्चाचे महाराष्ट्र अध्यक्ष इद्रेश मुलतानी, भाजपच्या महिला प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ, महाराष्ट्राचे माजी गृहराज्यमंत्री कृपाशंकर सिंह, राज्य उपाध्यक्ष एजाज देशमुख, अल्पसंख्याक मोर्चाचे मुंबई अध्यक्ष वसीम खान आदी मान्यवर उपस्थित राहतील.

## डॉ. आंबेडकर स्मारकासंदर्भात संघटनांचे मंत्रालयासमोर आंदोलन

# स्मारकाची माहिती दिली जात नाही

**मुंबई, (वा.)** दादर येथील इंदू मिलच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक निर्माण करण्याचे काम सुरू आहे. तर दुसरीकडे मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाच्या कामाबाबतची माहिती आंबेडकरी चळवळीतील संघटनांनी संबंधितांकडे मागवली आहे. मात्र ती उपलब्ध करून देण्यात येत नसल्याच्या आरोपावरून मंत्रालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. त्यासाठी मुंबई पोलीस आयुक्त, मुख्यमंत्री कार्यालय, एमएमआरडीए यांच्याकडे ' डॉ. बाबासाहेब आंबेडकर ऐतिहासिक वास्तू स्मारक संघर्ष समिति' च्या वतीने काही संघटनांनी निवेदनाद्वारे परवानगी मागितली आहे या समितीशी मुंबईसह राज्यभरातील जवळपास १०० संघटना संलग्न असून, त्यांचे पदाधिकारी माहितीच्या अधिकारात इंदू मिलवरील डॉ. बाबासाहेबांच्या स्मारकाच्या कामाच्या दर्जाबाबत माहिती मागवत आहेत.



### शापूरजी पालनजी कंपनीला ठेका

सध्या इंदू मिल येथे शापूरजी पालनजी कंपनीकडून काम केले जात आहे. मात्र कामाचा दर्जा कसा आहे? त्यासाठी वापरण्यात येणारे बांधकाम साहित्य कसे आहे ? याचे परीक्षण करण्यात येत आहे का? ते काम कोणती संस्था करीत आहे? स्मारक निर्माण कामाच्या निधीत होणारी सातत्याने वाढ याबाबत सरकारी पातळीवरून माहिती लपवली जाते असाही आरोप या संघटनांनी केला आहे. आता यामुळे आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते तसेच विविध संघटना यांच्यात तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे असे पदाधिकारी सांगत आहेत. दरम्यान, काही दिवसांपूर्वी मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळला.

### खासदार अनिल देसाईंसमवेत अनेक बैठका

मात्र त्यांना ती दिली जात नाही. त्यामुळे मंत्रालयावरील आंदोलनाचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती संघर्ष समितीचे पदाधिकारी आणि शिवसेना (उबाठा) संघटक विलास रूपवते, कामगार नेते रमेश जाधव, बाबासाहेबांचे पणतू अक्षय आंबेडकर यांनी दिली आहे. त्यांच्यासोबत अशोक हिरे, तुषार कदम, रमेश सकट, शेखर सकट, विष्णु घोडके, विजय घाडगे आदींनी सबंधित यंत्रणांकडे लेखी निवेदने दिली आहेत. एक तर कामाच्या दर्जाबाबत माहिती द्यावी किंवा आंदोलनाला परवानगी द्यावी अशी त्यांची मागणी आहे. या आंदोलनाचे विषय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिलवरील ऐतिहासिक स्मारकासोबतच चैत्यभूमी परिसरातील विविध प्रश्नांवर हे आंदोलन केले जाणार असल्याचे या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. यापूर्वी अनेकदा संघर्ष समिती आणि संलग्न अनेक संघटना एकत्र येऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या कामाबाबत तसेच निधीबाबत खासदार अनिल देसाई आणि सबंधित वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत अनेक बैठकी घेतल्या आहेत.

### सरकारकडे विविध संघटनांच्या मागण्या

दरवषी ६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणदिनी आणि १४ एप्रिल जयंतीदिनी चैत्यभूमी परिसरात लाखो अनुयायी अभिवादनासाठी येत असतात. त्यासाठी सुविधा उपलब्ध करताना आंबेडकरी चळवळीतील सर्व संघटनांना विश्वासात घ्यावे. मुख्यमंत्री, मुंबई महापालिका आयुक्त, यांच्यासोबत बैठक घ्यावी, एम.एम.आर.डी. ए. यांच्यासोबत मंत्रालयात झालेल्या बैठकीत बाबासाहेबांचा पुतळा सदोष न होता राम सुतार यांच्या कला दालनात जाऊन सुरू असलेल्या कामाची पाहणी करून पुतळ्याचा दर्जा चांगला व्हावा,

## उघड्या चेंबरमध्ये पडल्याने एकजण गंभीर

**भिवंडी, (वा.)** महापालिका हद्दीतील नाल्यांवरील उघड्या चेंबरमध्ये पडल्याने एक इसम गंभीर जखमी झाल्याची घटना शुक्रवारी भारत कंपाऊंड मध्ये घडली आहे. कायम अली उर्फ जॉन असे उघड्या चेंबर मध्ये पडलेल्या व्यक्तीचे नाव असून ते शुक्रवारी दुपारी कल्याण रोड गैबी नगर रस्त्या वरील भारत कंपाऊंड येथे असलेल्या नाल्या वरून दुचाकीने जात होते.यावेळी नाल्यावर अनेक चेंबर उघडे असल्याचा अंदाज न आल्याने त्यांची दुचाकीसह उघड्या चेंबर मधून गटारात पडली.

परिसरातील नागरिकांनी त्यांना गटारातून बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले. त्यांच्या डोक्याला मोठी जखम झाली असून सुदैवाने माझा जीव वाचला मात्र मनपा प्रशासनाने शहरासह भारत कंपाऊंड येथील नाल्यांवरील चेंबर त्वरित टाकून दुरुस्ती करावी अशी मागणी जखमी जॉन यांनी केली आहे.

दरम्यान, अशाप्रकारे उघड्या चेंबरची दुरूस्ती करण्याची मागणी होत आहे. कारण अशाप्रकारे गटारात पडल्याने अनेकजण गंभीर जखमी होत आहेत. त्यामुळे महानगरपालिकेने त्वरीत याची दखल घ्यावी, अशी मागणी होत आहे.

## रिक्षा चालकावर हल्ला करणाऱ्यांना अटक

**मुंबई, (वा.)** वर्सोवा येथे रिक्षाचालकावर चाकूने हल्ला करून त्याला लुटणाऱ्या टोळीला १२ तासांमध्ये अटक करणाऱ्या पोलिसांना यश प्राप्त झाले आहे. आरोपींनी अशा प्रकारचे आणखीन गुन्हे केल्याचा पोलिसांना संशय असून त्याबाबत पोलीस अधिक चौकशी करीत आहेत. आरोपींविरोधात चोरी व हल्ला केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सुनील तिवारी (२०), विकास खारवा (२३) राहुल राणा (२३) यांना अटक केली आहे. रिक्षाचालकाची चोरलेली रोख रक्कम व मोबाइल हस्तगत करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. तक्रारदार हा रिक्षाचालक असून मंगळवारी रात्री १ च्या सुमारास वर्सोवा जे. पी. रोड येथील चहा कॉफी बस थांब्याजवळ मोबाइलवर बोलत असताना अचानक त्यावेळी चार तरूण दुचाकीवरून तेथे आले आणि त्यांनी चाकूचा धाक दाखवून तक्रारदारांच्या खिशातील रोख १५ हजार रोख व मोबाइल हिसकावून घेतला. रिक्षाचालकाने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता त्यातील एकाने त्यांच्यावर चाकूने हल्ला केला. यात रिक्षाचालक जखमी झाले.



### तीन दिवसांची देण्यात आली पोलीस कोठडी

त्यांतर आरोपी दुचाकीवरून पसार झाले. याप्रकरणी रिक्षा चालकाने वर्सोवा पोलिसांकडे तक्रार केली असून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून याप्रकरणी सीसी टीव्ही कॅमेऱ्याच्या मदतीने तपास केल्यावर पोलिसांना गुन्ह्यांत वापरलेल्या मोटरसायकलचा क्रमांक मिळाला. त्यावर आरोपी मेघवाडी परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तिवारी, खारवा, राणा यांना ताब्यात घेतले. आरोपींना न्यायालयापुढे हजर केले असता न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. आरोपींनी गुन्ह्यात वापरलेले हत्यार, दुचाकी पोलिसांनी हस्तगत केली.

## वरूण कपूर, साद धर्माधिकारींना अव्वल मानांकन

### नंदू नाटेकर स्मृती बॅडमिंटन स्पर्धा

**मुंबई, (वा.)** नंदू नाटेकर स्मृती राज्य वरीष्ठांच्या आंतर जिल्हा आणि राज्य बॅडमिंटन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. पुरूषांच्या गटात वरूण कपूर आणि महिलांच्या गटात साद धर्माधिकारीना अव्वल मानांकन देण्यात आले आहे. महाराष्ट्र बॅडमिंटन आणि मुंबई उपनगर संघटनेनेच्या मान्यतेने या स्पर्धेचे यजमानपद गोरेगाव स्पोर्टस संघाला दिले आहे. रविवारपासून स्पर्धेला सुरूवात होईल.

याबरोबरच यश शहा आणि श्रुती मुंदडा याना पुरूष आणि महिला गटात दुसरे मानांकन देण्यात आले आहे. पुरूषांच्या दुहेरीत विप्लव आणि विराज या कुवळे बंधूना अव्वल मानांकन मिळाले आहे.



### उद्घाटनाला मान्यवर उपस्थित

मृण्मयी देशपांडे आणि प्रेरणा अलवेकर महिलांच्या दुहेरीत अव्वल मानांकीत आहेत. मिश्र दुहेरीत ठाण्याचे अमन फरूक्ष संजय आणि अनघ करंदीकर याना अव्वल मानांकन देण्यात आले आहे. पुरूषांच्या गटात एकूण सतरा संघ तर महिलांच्या गटात तेरा संघ सहभागी होणार आहेत. भारताची दुहेरीतील अव्वल खेळाडू चिराग शेट्टी आणि सात्विकराज रांकीरेड्डी हे स्पर्धेच्या उदघाटन सोहळ्याप्रसंगी उपस्थित रहाणार आहेत.

## समस्यांचा पाढा • टिळकनगरमध्ये हक्काच्या घरांसाठी नवीन सदनिकाधारकांनी फोडली वाचा

# बिल्डर आणि सोसायटीविरोधात आंदोलन

**मुंबई, (वा.)** चेंबूर येथील टिळक नगर सहयोग सहकारी गृहनिर्माण सोसायटीतील नवीन सदनिका खरेदी केलेल्या सदस्यांनी शुक्रवारी संध्याकाळी निषेध आंदोलन पुकारून बिल्डर आणि सोसायटीकडून होणाऱ्या अन्यायाविरोधात वाचा फोडली आहे. पुर्नविकासात इमारत बांधून पूर्ण करण्यासाठी विकासक नव्या सदनिका धारकांना अतिरिक्त घर विक्री करून पैसा उभारत असतो. अशात ज्या लोकांनी कर्जाने घर घेतली आहेत, त्यांना रीडेव्हलपमेंटमध्ये घर मिळत नाहीत. अशीच परिस्थिती टिळक नगरच्या इमारत क्रमांक १८ मधील नवीन सदनिका धारकांवर आली आहे. त्यामुळे त्यांच्यावर रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची वेळ आली. त्यामुळे या आंदोलनाची दखल घ्यावी, अशी मागणी आहे.



### प्रकरणाला स्टे मिळाल्याने सदनिकाधारक बेहाल

टिळक नगर सहयोग सहकारी सोसायटीमध्ये येथील मूळ विकासक महालक्ष्मी बिंदू डेव्हल्पर्सने या २४ सदस्यांना घर विकली होती. विकासकाच्या मृत्यूनंतर सोसायटीने वरद वास्तू विकासकाची निवड केली आणि नव्या पुर्नविकासात या २४ सदनिका धारकांचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे प्रकरण कोर्टात गेले. याला स्टे मिळत असल्याने सदनिकाधारक बेहाल झाले अहेत.

### नवीन सदनिका धारकांना घरे नाकारली

टिळक नगर सहयोग सहकारी गृहनिर्माण सोसायटीतील सदस्य विजय मोरे यांच्यासह २३ नवीन सदनिका खरेदी केलेल्या सदस्यांना म्हाडाचे डेप्युटी रजिस्टर, डीव्हीजनल जॉईंट रजिस्टर (मुंबई विभाग) सहकार मंत्री तसेच तहसीलदार आणि कार्यकारी दंडाधिकारी कुर्ला आदी सर्व आस्थापनांकडून मेंबरशिप विषयी आदेश दिले आहेत. तरीसुद्धा सोसायटी आणि वरद वास्तू विकासकाने नवीन सदनिका धारकांना घरे नाकारली आहेत.

### भाजपा अनुसूचित जाती मोर्चा सदनिकाधारकांच्या पाठीशी

यावेळी विजय मोरे यांच्यासह २३ नवीन सदनिका धारकांच्या पाठीशी उभे राहण्यासाठी भाजपा अनुसूचित जाती मोर्चा मुंबई उपाध्यक्षा स्नेहा भालेराव, आरपीआय राजेश कटारनवरे, काँग्रेस यतीन साळवी, विशाल बिले, मधुकर साळवी, टिळकनगर फेडरेशन, ज्येष्ठ नागरिक समूह सुनील कनोजिया, शशिकांत मोरे आदीसह अन्य सामाजिक कार्यकर्ते या निषेध आंदोलनात उपस्थित होते.

## बनावट कॅनन पॅक टोनर जप्त

**मुंबई, (वा.)** बनावट संगणक भाग ब्रँडेड कंपनीच्या नावाने बाजारात खपवणाऱ्या एकाला माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी त्याच्याकडून बनावट कॅनन पॅक केलेले टोनर जप्त केले आहेत. इआयआरपी इंडिया या संस्थेने दिलेल्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी फोर्ट, मुंबई येथे छापा टाकला आहे. आर्थिक गुन्हे विभागाचे सह पोलीस आयुक्त, यांच्या आदेशानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत माने आणि आर्थिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांच्या पथकाने तसेच संस्थेच्या टीमने या ठिकाणी छापा टाकून बनावट कॅनन पॅक केलेले टोनर जप्त केले आहेत. कान्हा हरिभाई चावडा असे आरोपीचे नाव असून, तो स्मार्ट कॉम्प्युटरच्या नावाने हा बेकादेशीर व्यवसाय चालवत होता. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, त्याला अटक केली आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## # QUICK NEWS

### होप युनायटेडचा मिल्लत संघावर विजय

**मुंबई,** मुंबई फुटबॉल संघटनेने आयोजित केलेल्या हारवूड चॅम्पियन्स लीग फूटबॉल स्पर्धेतील सामन्यात होप युनायटेड संघाने मिल्लत संघावर ३-१ असा विजय मिळवला. चर्चगेट येथील कूपरेज मैदानावर दिव्यांच्या प्रकाशझोतात खेळल्या गेलेल्या सामन्यात सनी ठाकूरने गोल करून होप युनायटेड संघाचे खाते उघडले. उर्वरित दोन गोल शिवम जाधव आणि अरफत अन्सारीने केले. पराभूत मिल्लत फूटबॉल संघासाठी एकमेव गोल अलोक सिंगने केला. संपूर्ण सामन्यात होप युनायटेड संघाच्या खेळाडूनी सांघिक वृत्ती दाखवत प्रभावी आणि आक्रमक खेळ करून प्रतिस्पर्धी संघावर दडपण आणले.

## ६८ लाख रुपये घेऊन कामगार नॉट रिचेबल

**मुंबई, (वा.)** झवेरी बाजारातील व्यापाऱ्याकडून मालकाचे ६८ लाख रुपये घेऊन निघालेला कामगार नॉट रिचेबल झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी गुजरातच्या सोने व्यापाऱ्याने मुंबईत धाव घेत पोलिसात तक्रार दिली. याप्रकरणी एलटी मार्ग पोलिसांनी कामगार रमेश गंगाराम वेद याच्याविरुद्ध गुरुवारी गुन्हा नोंदवत तपास सुरू केला आहे. गुजरातचे रहिवासी असलेले राजेश चंद्रकांत चोकसी (४९) यांच्या तक्रारीनुसार, १२ ऑगस्टला त्यांनी विश्वासू कामगार वेद याला झवेरी बाजारातील व्यापाऱ्याकडे व्यवहाराचे पैसे घेण्यासाठी पाठवले.

### आरोपीचा शोध सुरू

झवेरी बाजारातील व्यापाऱ्याने राजेश यांच्याशी बोलणे झाल्यानंतर वेद याला ६८ लाख रुपये दिले. मात्र, त्यानंतर काही वेळाने वेद हा नॉट रिचेबल झाल्याने त्यांना धक्का बसला. बराच वेळ वाट बघूनही हाती काहीच न लागल्याने त्यांना संशय आला. अखेर, फसवणूक झाल्याची खात्री पटताच त्यांनी गुरुवारी पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली. त्यानुसार, पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. परिसरातील सीसीटीव्ही तसेच अन्य तांत्रिक पुराव्यांच्या मदतीने पोलिस आरोपीचा शोध घेत आहेत. वेद हा मूळचा राजस्थानचा रहिवासी आहे.

## भिवंडीत रोजगार मेळावा उत्साहात

**भिवंडी, (वा.)** शहरातील भादवड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे नुकताच रोजगार मेळावा संपन्न झाला असून तालुक्यातील बारावी, आयटीआय पदवी पदविका आणि पदव्युत्तर शिक्षण झालेले विविध उमेदवारांनी या योजना रोजगार मेळाव्याचा लाभ घेतला आहे. आयटीआय भिवंडी यांच्या पुढाकाराने व जिल्हा कौशल्य रोजगार व उद्योजकता कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा मेळावा घेण्यात आला.या मेळाव्यात गाला इंडस्ट्रीयस वाडा,योक टेक्स्टईल्स,ब्लाझो टेक्स्टईल्स,एस आई इलेक्ट्रिकल व इतरही कंपन्यानी नोकरीस उत्सुक असलेल्या उमेदवारां करीता जागा उपलब्ध करून देऊन सहभाग घेतला.

## आज हार्बर मार्गावर मध्यरात्री ब्लॉक

**मुंबई, (वा.)** पश्चिम रेल्वेकडून, २९-३० सप्टेंबर रोजी नॉन-इंटरलॉकिंगची मुख्य कामे करण्यासाठी अंधेरी ते गोरेगाव दरम्यान अप आणि डाऊन हार्बर मार्गांवर ब्लॉक घेण्यात येणार आहे. रविवार - सोमवार मध्यरात्री अप आणि डाऊन हार्बर मार्गावरील अंधेरी ते गोरेगाव मार्गावर ००.३० पासून ते १०.३० पर्यंत (१० तास ब्लॉक) असेल. ब्लॉक दरम्यान हार्बर मार्गावरील उपनगरीय गाड्यांवर परिणाम होईल. ब्लॉक कालावधीत अंधेरी ते गोरेगाव दरम्यान हार्बर मार्गावरील उपनगरीय सेवा उपलब्ध राहणार नाहीत.ब्लॉकपूर्वी डाऊन हार्बर मार्गावर गोरेगावसाठी शेवटची लोकल छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून २२.५४ वाजता सुटेल आणि गोरेगावला २३.४९ वाजता पोहोचेल.



### मध्य रेल्वे प्रशासनाला सहकार्य करा

हे दुरुस्तीसाठीचे मेगा ब्लॉक्स पायाभूत सुविधांच्या देखभालीसाठी आणि सुरक्षिततेसाठी आवश्यक आहेत. प्रवाशांना विनंती करण्यात येत आहे की, यामुळे होणाऱ्या गैरसोयीबद्दल रेल्वे प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मध्य रेल्वे प्रशासनाने केले आहे.

### प्रवाशांनी दुसऱ्या साधनांचा वापर करण्याचे आवाहन

ब्लॉकपूर्वी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस करीता अप हार्बर मार्गावर शेवटची लोकल गोरेगावहून ००.०७ वाजता (मध्यरात्री) सुटेल आणि ०१.०२ वाजता (मध्यरात्री) छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे पोहोचेल. ब्लॉकनंतर डाऊन हार्बर मार्गावर गोरेगावसाठी सकाळी पहिली लोकल (म्हणजे दि. ३०.०९.२०२४ रोजी) छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १०.२२ वाजता सुटेल आणि ११.१६ वाजता गोरेगाव येथे पोहोचेल. ब्लॉकनंतर पहिली लोकल (म्हणजे दि. ३०.०९.२०२४ रोजी) अप हार्बर मार्गावर गोरेगावहून सकाळी ११.२३ वाजता सुटेल आणि १२.२१ वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे पोहोचेल.

## विद्यार्थ्यांचा आयटीआय अभ्यासक्रमांकडे ओढा

**मुंबई, (वा.)** मुंबईतील शासकीय व खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील आयटीआय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी यंदा विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. मुंबईत आतापर्यंत ५,०६३ विद्यार्थ्यांनी आयटीआय अभ्यासक्रमाच्या विविध शाखांना प्रवेश घेतला आहे. त्यामध्ये सर्वाधिक इलेक्ट्रिशियन अभ्यासक्रमासाठी ५५८ प्रवेश निश्चित झाले आहेत. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातर्फे आयटीआय अभ्यासक्रम चालविला जातो. दहावी उत्तीर्ण अथवा अनुत्तीर्ण विद्यार्थी या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊ शकतात.



### राज्यात ४१८ शासकीय आयटीआय

दहावीनंतर विद्यार्थ्यांना रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने आवश्यक प्रशिक्षण देण्यात आयटीआयचे मोठे योगदान आहे. दरवर्षी राज्यभरातून हजारो विद्यार्थ्यांना रोजगारक्षम कौशल्य होते. प्राप्त तसेच, उद्योग-व्यवसायांसाठी कुशल मनुष्यबळ उपलब्ध होते. राज्यात ४१८ शासकीय आयटीआय आहेत.

## नागरिकांनी काळजी घेण्याचे करण्यात आले आवाहन

# रेकॉर्डवरील गुन्हेगार रेल्वे पोलिसांच्या ताब्यात

**मुंबई, (वा.)** रेल्वे पोलीस दलाच्या महिला सुरक्षा पथक ( गुन्हे शाखा) पोलिसांनी एका रेकॉर्डवरील आरोपीला ताब्यात घेऊन त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे येथे ताब्यात दिले आहे. या आरोपींची सखोल चौकशी करून त्याच्यावर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. ग्रुप सी, मध्य परिमंडळ, महिला सुरक्षा पथकातिल महिला पोलीस सुर्वे, गावीत, साने यालहान मुले - मुली तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी तैनात होत्या.

### संशयास्पद हालचालींमुळे पोलीसांनी रचला सापळा

त्यावेळी बांद्रा रेल्वे स्टेशन फलाट क्रमांक १ वर बुकिंग हॉल प्रवाशांच्या गर्दीत गस्त घालताना त्यांना एक व्यक्ती रेल्वे प्रवाशांच्या गर्दीमध्ये संशयास्पद हालचाली करीत असताना आढळला. त्यामुळे महिला या पोलिसांनी त्याचा पाठलाग करून अटकाव केला. लागलीच त्याला ताब्यात घेऊन बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे येथे आणले. तेथे प्रभारी अधिकारी गुन्हे अधिकारी तोरणे यांनी त्याची चौकशी केली असता त्याने असमाधानकारक व उडवाउडवीची उत्तरे दिली. यावेळी त्याने त्याचे नाव विनोद कैलास सोनी (मालाड) असे सांगितले.

### अनेक रेल्वे पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे

अटकेनंतर पुढील कारवाईसाठी त्याला बांद्रा रेल्वे पोलीस ठाण्यात हजर केले आहे. पोलिसांनी त्याचा गुन्हे अभिलेख तपासून पाहिला असता त्याच्यावर बोरीवली रेल्वे पोलीस ठाणे, सीएसएमटी रेल्वे पोलीस ठाणे, कुर्ला रेल्वे पोलीस ठाणे येथे अनेक गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्यात तो शिक्षा भोगून मुक्त आहे. मात्र त्याच्याकडून रेल्वे प्रवाशांच्या मालमत्तेला धोका असल्याने त्याच्याकडून चांगल्या वर्तनुकीचे बंधपत्र लिहून घेण्यासाठी त्याच्यावर प्रतिबंधक कारवाई केली जाणार आहे.

## स्टेडियममध्ये माकडांचा वावर ही लाजीरवाणी बाब

भारत आणि बांगला देश संघांमधील दुसरा आणि मालिकेतील अखेरचा कसोटी सामना कानपूर मधील ग्रीन पार्क स्टेडियमवर सुरू आहे. भारताने पहिला कसोटी सामना २८० धावानी जिंकून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. आयसीसी विश्व कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळवण्यासाठी भारताला हा सामना जिंकणे आवश्यक आहे. पण पहिल्या दिवशी अपुरा प्रकाश आणि पावसामुळे केवळ ३५ षटकांचाच खेळ झाला. दुसऱ्या दिवशीही पावसाच्या हजेरीमुळे दोनही संघातील खेळाडूनी हॉटलेमध्ये पतरणे पसंत केले. मात्र पहिल्या दिवसातील काही घटनांमुळे उत्तर प्रदेश क्रिकेट संघटनेच्या ढिसाळ कारभाराबद्दल क्रिकेट वर्तुळातून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. प्रसिद्धी माध्यमांनी वृत्त दिले आहे की, ग्रीन स्टेडियमवर माकाडांचा त्रास स्टेडियममधील प्रेक्षक आणि विशेषकरून या सामन्याचे थेट प्रक्षेपण करणाऱ्या क्रीडा वाहिनीच्या छायाचित्रकाराना होत आहे. ही माकडे स्टेडियममध्ये शिरून समोर दिसणरे प्रेक्षक आणि मैदानावर उघड्या जागेत असणाऱ्या छायाचित्रकारांच्या हातातील अन्न किवा खाद्यपदार्थ हिसकावून घेत आहेत. याबरोबच पिण्याच्या पाण्याच्या बाटल्याही ही माकडे पळवून नेत आहेत. या माकडांना पिटाळण्यासाठी संयोजकानी शक्कल लढवली असून त्यासाठी मोठ्या आकाराची, करड्या रंगाची आणि लांब शेपटीच्या माकडांना आणि ती हाताळणाऱ्यांना स्टेडियममध्ये बोलावले आहे. लहान माकडे या मोठ्या माकडाना घाबरतात आणि तेथून पळ काढतात असा दावा क्रिकेट संघटनेच्या अधिकाऱ्यांनी केला आहे. मला वाटते आंतरराष्ट्रीय स्तरावरील कसोटी क्रिकेट सामन्या दरम्यान माकडांचा उपद्रव होणे आणि या माकडांना पिटाळून लावण्यासाठी मोठ्या आकाराच्या आक्रमक असणाऱ्या माकडांचा वापर करणे असे लाजीरवाणे प्रकार केवळ भारतातातच होऊ शकतात. १९४५ साली बांधण्यात आलेल्या ग्रीन पार्क स्टेडियमवर आतापर्यंत २३ कसोटी आणि १५ एक दिवसीय तसचे चार आयपीएल सामने खेळले गेले. १९८७ साली विश्वचषकाचा एक सामनाही याच मैदानावर खेळला गेला. याआधी माकडांचा उप्रदव प्रेक्षक आणि छायाचित्रकाराना झाल्याचे ऐकीवात नाही. मग यावेळीच तो कसा झाला असा प्रश्न उपस्थित होतो, असे सांगण्यात आले की ज्यावेळेस या मैदानाचा वापर होत नसतो त्यावेळेस २५०-३०० माकडे या स्टेडियमध्येच रहात असतात आणि म्हणून त्याना या स्टेडियमचा लळा लागला असावा. हे स्टेडियम उत्तर प्रदेश सरकारच्या क्रीडा विभागाच्या ताब्यात आहे. माकडांचा उपद्रव यंदा जाणवला कारण उत्तर प्रदेश क्रिकेट संघटना आणि सरकारच्या क्रीडा विभागाने तो मुद्दा विचारात घेतला नसावा. कदाचित सरकारी खात्यामध्ये बदल झाले असतील आणि संबंधित या प्रकरणी गाफील राहिले असावेत असा संशय निर्माण होतो. दुसरा मुद्दा असा आहे की, वन्य जीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत मोठ्या आकाराच्या माकडांचा व्यापार करता येणार नाही आणि त्यांचा भाडे तत्वावरही वापर करता येणार नाही. हे निर्बंध असताना संयोजकानी या विशिष्ट प्रकारच्या माकडांचा वापर केल्याबद्दल चर्चा सुरू आहे. माझ्या मते संयोजक आणि उत्तर प्रदेश सरकार प्रशासन याबाबतीत गाफील राहिले असतील आणि त्यामुळेच माकडांना स्टेडियममध्ये घुसण्यास वाव मिळाला असावा.



सुभाष हरचेकर

## अ‍ॅलर्ट प्रशासन • 'मायबीएमसी सचेत' ॲप्लिकेशन निर्मिती; लाभ घेण्याचे आवाहन

# पालिकेच्या कामात येणार सुलभता

**मुंबई, (वा.)** मुंबईतील विविध प्रशासकीय विभाग (वॉर्ड) स्तरावरील परिरक्षण (मेंटेनन्स), घनकचरा व्यवस्थापन, इमारती आणि कारखाना विभागाच्या संबंधित कामकाजाचे संनियंत्रण आणि त्यात सुलभता आणण्याच्या उद्देशाने क्षेत्रीय कामकाजांची (फिल्ड वर्क) वास्तविक स्थिती जाणून घेण्यासाठी मुंबई महापालिकेच्यावतीने मायबीएमएसी सचेत ॲप्लिकेशन तयार करण्यात आले आहे. सध्या हे मोबाईल ॲप्लिकेशन प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात आले आहे. १ ऑक्टोबर २०२४ पासून ते संबंधित कर्मचाऱ्यांसाठी पूर्णवेळ उपलब्ध असेल. मुंबई महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांच्या मार्गदर्शनानुसार, तसेच अतिरिक्त महापालिका आयुक्त (शहर) डॉ.अश्विनी जोशी यांच्या संकल्पनेनुसार माहिती तंत्रज्ञान विभागाने भौगोलिक माहिती तंत्रज्ञानावर (जीआयएस) आधारित मायबीएमसी सचेत ॲप्लिकेशनची निर्मिती केली आहे.



### पारदर्शकता येणार

मुंबई महापालिकेच्या विविध विभागांतील कर्मचारी, अधिकारी नियमितपणे क्षेत्रीय कामकाज (फिल्ड वर्क) करत असतात. त्यांच्याकडून केल्या जाणाऱ्या कामकाजामधील पारदर्शकता, विश्वसनीयता आणि क्षेत्रीय कामकाजाच्या व्यवस्थापनात सुधारणा व्हावी, या उद्देशाने मायबीएमएसी सचेत ॲप्लिकेशन तयार करण्यात आले आहे. महापालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने या ॲप्लिकेशनची निर्मिती केली आहे.

### १ ऑक्टोबरपासून उपलब्ध होणार

या अंतर्गत विविध प्रशासकीय विभाग (वॉर्ड) स्तरावरील परिरक्षण (मेंटेनन्स), घनकचरा व्यवस्थापन, इमारती आणि कारखाना विभागाच्या कामकाजांशी संबंधित कर्मचारी आणि अधिकारी त्यांच्या दैनंदिन कामकाजांचा तपशील छायाचित्रांसह नोंदवू शकतील. सदर कामकाज पूर्ण झाल्यानंतर त्यासंबंधित माहिती आणि छायाचित्रे अपलोड करून कामकाज पूर्ण झाल्याची नोंद देखील करू शकतील. त्यामुळे, त्यांच्याकडे सुरू असलेले काम, त्यांनी पूर्ण केलेले काम आणि कामाची सद्यस्थिती आदींची माहिती क्षणार्धात उपलब्ध होऊ शकेल. संबंधित विभागाचे सहायक आयुक्त, परिमंडळांचे उप आयुक्त, अतिरिक्त महापालिका आयुक्त तसेच महापालिका आयुक्त हे वेब ॲप्लिकेशन आणि डॅशबोर्डच्या माध्यमातून या संपूर्ण माहितीचा आणि कामकाजाचा आढावा घेऊ शकतील.

### ॲप्लिकेशन आयओएस प्लॅटफॉर्मवरही लवकरच

सध्या हे मोबाईल ॲप्लिकेशन अँड्रॉईड प्लॅटफॉर्मवर आणि प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात आले आहे. लवकरच हे ॲप्लिकेशन आयओएस प्लॅटफॉर्मवरही उपलब्ध केले जाणार आहे.त्यामुळे कामकाजामधील पारदर्शकता, विश्वसनीयता आणि क्षेत्रीय कामकाजाच्या व्यवस्थापनात सुधारणा व्हावी, असा उद्देश आहे.

## भाईंदरमध्ये रेबीज प्रतिबंध लसीकरण मोहीम सुरू

**भाईदर, (वा.)** जागतिक रेबीज दिनाचे औचित्य साधून मिरा-भाईंदर महानगरपालिका आणि प्रतापराव राणे एज्युकेशन आणि चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने मनपा परिक्षेत्रातील मिरा रोड येथील पशु पक्षी उपचार केंद्र या ठिकाणी रेबीज प्रतिबंध लसीकरण मोहीम राबविण्यात आली आहे. संसर्गजन्य रोगाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध संस्थांमधील सहकार्याला प्रोत्साहन देणे हे उद्दिष्ट समोर ठेवून मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरा रोड येथील पशु पक्षी उपचार केंद्र या ठिकाणी रेबीज प्रतिबंध लसीकरण मोहीम राबविण्यात आली आहे. दरम्यान भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे. या भटक्या कुत्र्यांनीच अनेकांना चावा घेतल्याने समस्या निर्माण होत आहेत. त्यासाठी महापालिकेने रेबीज प्रतिबंधक मोहीम आखाली आहे.



यावेळी पालिकेचे पशैाुद्यकीय अधिकारी डॉ.विक्रम निराटले,डॉ.शितल भोये, तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मनोज राणे,कृष्णा दरेकर,बिपिन मोरे उपस्थित होते.

### 'क' वर्ग महापालिकांमध्ये नवी मुंबई राज्यात सर्वप्रथम, तर अमृत गटात द्वितीय

# नवी मुंबई महापालिका एक नंबर

**नवी मुंबई, (वा.)** महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने आयोजित करण्यात येत असलेल्या 'माझी वसुंधरा अभियान ४.०' मध्ये नवी मुंबई महानगरपालिका १० लक्षपेक्षा अधिक लोकसंख्येच्या मोठ्या शहरांच्या अमृत गटात राज्यस्तरावर 'द्वितीय क्रमांकाची मानकरी' ठरलेली आहे. राज्यातील 'क' वर्ग महानगरपालिकांमध्ये नवी मुंबई महानगरपालिकेची कामगिरी 'सर्वप्रथम क्रमांकाची' आहे. याशिवाय 'भूमी थीमॅटीक' कॅटेगरीमध्ये नवी मुंबई महानगरपालिकेस राज्यस्तरीय उच्चतम कामगिरीचे विशेष पारितोषिकही जाहीर झाले आहे. त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिका राज्यात 'एक नंबर' ठरल्याचे चित्र आहे.

नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी हा पुरस्कार पर्यावरणप्रेमी नवी मुंबईकर नागरिकांच्या सक्रिय सहभागाला समर्पित केला असून पर्यावरणविषयक नानाविध उपक्रमांमध्ये सहभागी होणारे नागरिक, लोकप्रतिनिधी, विविध स्वयंसेवी संस्था त्याचप्रमाणे स्वच्छता, उद्यान व विविध विभागांतील कर्मचारी आणि प्रसारमाध्यमे यांच्या एकत्रित सहभागामुळे हा पुरस्कार प्राप्त झाल्याचे म्हटले आहे.

## बक्षीस रक्कम पर्यावरणपूरक बाबींसाठी खर्चणार

- भूमी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या निसर्गाच्या ५ घटकांवर आधारित 'माझी वसुंधरा अभियान ४.०' हे १ एप्रिल २०२३ ते ३१ मे २०२४ या कालावधीत राबविण्यात आले. यामध्ये राज्यातील ४१४ शहरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि २२२१८ ग्रामपंचायत अशा एकूण २२६३२ स्थानिक स्वराज्य संस्थांनी सहभाग घेतला.
- माझी वसुंधरा अभियान ४.० चे मूल्यमापन कागदपत्र तपासणी आणि प्रत्यक्ष भेटी देऊन क्षेत्रीय मूल्यमापन याद्वारे करण्यात आले. त्यामध्ये दहा लक्षपेक्षा अधिक लोकसंख्येच्या मोठ्या शहरांच्या गटात नवी मुंबई राज्यात द्वितीय क्रमांकाची मानकरी ठरली.
- पुरस्कारापोटी नवी मुंबई महानगरपालिकेस अमृत गटातील द्वितीय पारितोषिकाकरिता रुपये ७ कोटी व भूमी थीमॅटीकमधील उच्चतम कामगिरीबद्दल रुपये ३ कोटी अशी एकूण ९ कोटी बक्षीस रक्कम प्राप्त होणार आहे. यामधून शासनाने दिलेल्या निकषांनुसार शहरात पर्यावरणपूरक बाबींसाठी खर्च केला जाणार आहे.

## ऊर्जा बचतीकडे विशेष लक्ष



ऊर्जा बचतीकडे विशेष लक्ष देताना नवी मुंबई महानगरपालिकेने सर्व सोडियम पथदिव्यांचे एलईडी दिव्यांमध्ये रूपांतर केले. नागरिकांना शक्य असेल तेथे सौरऊर्जेचा वापर करण्यास प्रोत्साहित केले त्याचप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिकेच्या इमारतींवरही सौरऊर्जेस प्राधान्य देण्यात आले.

## हवेचा दर्जा सुधारण्यासाठी विशेष लक्ष देणार

या उज्ज्वल यशाबद्दल समस्त नवी मुंबईकर नागरिकांचे अभिनंदन करताना आयुक्तांनी यापुढील काळात हवा गुणवत्तेचा दर्जा सुधारण्याकडे तसेच नागरी क्षेत्राप्रमाणेच औद्योगिक क्षेत्रातही प्रदूषण नियंत्रण कार्यवाहीवर भर दिला जाईल, असे पालिकेच्या वतीने सांगितले आहे. नागरिकांनीही पर्यावरणाच्या दृष्टीने रेन वॉटर हार्वेस्टिंगवर भर द्यावा तसेच पिण्याच्या पाण्याचे महत्व जाणून प्रक्रियाकृत पाणी वापरावे तसेच पर्यावरणपूरक विविध गोष्टींचा अंगिकार करीत शाश्वत पर्यावरणासाठी अधिक सक्रिय योगदान द्यावे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

## पर्यावरणाशी संबंधित विविध कार्यक्रम

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिकेने शहरात पर्यावरणाशी संबंधित विविध बाबींवर बारकाईने काम केले. यामध्ये देशी प्रजातींची १ लाखांहून अधिक नवीन झाडे लावण्यात आली. शहरव्यापी वृक्षगणना करण्यात आली आणि अस्तित्वात असलेल्या सर्व झाडांचे मॅपिंग करण्यात आले. हेरिटेज झाडांची स्वतंत्र नोंद घेण्यात आली तसेच वृक्ष संरक्षण आराखडाही तयार करण्यात आला. पावसाळी कालावधीत वादळ वाऱ्यामुळे पडणाऱ्या झाडांचा अभ्यास करून विदेशी प्रजातींची झाडे पडतात हे लक्षात घेत देशी प्रजातींचीच झाडे लावण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला व त्याची अंमलबजावणीही सुरू झाली. त्यानुसार ६० हजारांहून अधिक बांबू वृक्ष रोपांची लागवड करण्यात आली.

## गणेशोत्सवात राबवले इकोफ्रेंडली अभियान

गणेशोत्सवाच्या काळात पर्यावरण विघातक पीओपीचा वापर टाळून शाडूच्या मातीच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करावी, असे आवाहन करण्यात आले. त्याला नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला. अशा पर्यावरणप्रेमी नागरिकांचे पर्यावरणमित्र प्रशस्तीपत्र देऊन कौतुक करण्यात आले. त्याचप्रमाणे नैसर्गिक जलस्त्रोतांचे प्रदूषण टाळण्यासाठी नवी मुंबई शहरात १३७ इतक्या मोठ्या संख्येने बनविण्यात आलेल्या कृत्रिम विसर्जन तलावांनाही नागरिकांनी चांगला प्रतिसाद देत पर्यावरणपूरक दृष्टिकोन दाखवला.

# सिडको प्रदर्शनी केंद्रातील प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद




**नवी मुंबई, (वा.)** महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाअंतर्गत असलेल्या बाष्पके संचालनालयातर्फे आयोजित जागतिक स्तरावरील बॉयरल इंडिया २०२४ प्रदर्शन, चर्चासत्र व कार्यशाळेला नागरिक, विद्यार्थी, उद्योजकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. या प्रदर्शनात इटली, युके, जर्मनी, चीन, स्वीडन, बेल्जीयम, नेदरलँड या देशासह सुमारे २६० उद्योजकांनी सहभाग नोंदविला आहे.

## महत्त्वाचे व्यासपीठ

या चर्चासत्रात प्रदर्शन कामगार सुरक्षेला प्रोत्साहन देणारे आहे व बाष्पकांच्या सुरक्षित व कार्यक्षम वापर कसा करावा हे सुनिश्चित करण्यासाठी महत्वाचे व्यासपीठ उपलब्ध करण्यात आले. या तीनदिवसीय चर्चासत्रात तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले. वाशीतील सिडको प्रदर्शन केंद्राच्या ठिकाणी तीन दिवस बॉयलर इंडिया २०२४ प्रदर्शन, चर्चासत्र भरविण्यात आले होते. बाष्पके (बॉयलर) संबंधीत विविध यंत्रे, साहित्य यांची मांडणी येथे केली होती.

## प्रदर्शनात विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित

तीनदिवसीय प्रदर्शनात सेमीनारमध्ये जवळपास ५०० अभ्यागंतानी भेटी दिल्या. त्यामध्ये विविध कॉलेजचे विद्यार्थी व लेक्चरल तसेच विविध कंपन्यामधील मॅनेजर, इंजिनिअर, बाष्पके परिचर इत्यादी उपस्थित होते. तसेच दीपक फर्टिलायझर्स ॲन्ड पेट्रोकेमिकल लि. तळोजा, थायसनबग्रूप, इंडास्ट्रिज प्रा. लि. पुणे, राष्ट्रीय केमिकल्स ॲन्ड फर्टिलायझर्स लि. चेंबूर, भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि, माहूल, फोबर्स मार्शल प्रा. लि. पुणे, टीकेआयएल इंडिस्ट्रियल प्रा. लि. आदींचा सहभाग होता. तसेच एमएच साबो सिध्दिविनायक कॉलेज मुंबई, गर्व्हनमेंट पॉलिटेक्निकल ठाणे, पॉलिटेक्निकल कोल्हापूर, राजाराम बापू कॉलेज इस्लामपूर, एम सरोदे इंजिनिअरींग कॉलेज बीड यांनी या चर्चासत्रात सहभाग नोंदविला.

**# QUICK NEWS**

## महानगरपालिकेमध्ये कार्यशाळेचे आयोजन

**नवी मुंबई,** जागतिक माहिती अधिकार दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्यावतीने आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये शनिवारी माहितीचा अधिकारबाबत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते प्रा. बापुराव बनसोडे यांनी माहिती अधिकाराबाबत अभ्यासपूर्ण माहिती उपस्थितांना दिली. यावेळी उपायुक्त रविकिरण घोडके, सहायक आयुक्त स्वरूप खारगे, अधीक्षक दशरथ भंडारी, मनोज चव्हाण, राजेश डोंगरे, महापालिका अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. २८ सप्टेंबर हा जागतिक माहिती अधिकार दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो.

# डॉन बॉस्कोच्या स्केटिंग टीमची उत्तम कामगिरी

**नवी मुंबई, (वा.)** कर्नाटक येथे झालेल्या साऊथ झोन स्केटिंग स्पर्धेत सिवुडस् येथील डॉन बॉस्को शाळेच्या स्केटिंग टीमने महाराष्ट्र नवी मुंबईचे प्रतिनिधीत्व करत उत्तम कामगिरी केली. केरळ, गोवा, महाराष्ट्र कर्नाटकच्या तब्बल १५०० स्पर्धकांनी यात सहभाग नोंदवला होता. यात कॅटलिन जॅक्सनने रोड रेसमध्ये सेमी फायनलपर्यंत मजल मारली. तर रींक रेस ५०० मीटरमध्ये देखील सेमी फायनल गाठली. एझकील डायस व शिवन्या तांडेलने रिंक रेस ५०० मी. व १००० मीटर स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. डॉन बॉस्को शाळेचे प्रतिनिधीत्व करीत उत्तम कागिरी बजावल्याने या तिन्ही खेळाडूंचे कौतुक होत आहे.



### इशारा... • पाकिस्तानी अभिनेत्याच्या चित्रपटाबाबत 'सिनेपोलिस'ला मनसेचे निवेदन

# ...तर खळ्ळखट्याक पद्धतीने उत्तर

**नवी मुंबई, (वा.)** फवाद खान नावाच्या पाकिस्तानी अभिनेत्याचा, 'लिजेंड ऑफ मौला जट' नावाचा सिनेमा लवकरच भारतात प्रदर्शित होणार आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आदेश दिल्याप्रमाणे मनसे हा सिनेमा कुठल्याही परिस्थितीत महाराष्ट्रात प्रदर्शित होऊ देणार नाही. या संदर्भात मनसे प्रवक्ते व नवी मुंबई शहर अध्यक्ष गजानन काळे यांनी परिवर्तन यात्रेदरम्यान सीवूडसमधील ग्रँड सेंट्रल मॉल येथील सिनेपोलिस सिनेमागृह प्रशासनाला निवेदन दिले व सिनेमा प्रदर्शित केल्यास मनसे खळ्ळखट्याक पद्धतीने उत्तर देईल, असा इशारा गजानन काळे यांनी दिला.



## निवेदन देताना अनेक महाराष्ट्र सैनिक उपस्थित

मनसेच्या या शिष्टमंडळात सविनय म्हात्रे, सचिन कदम, डॉ. आरती धुमाळ, यशोदा खेडस्कर, अमोल आयवले, अक्षय भोसले, उमेश गायकवाड, गणेश भवर, आप्पासाहेब जाधव, संतोष टेकवडे, सुनील शिंदे, राजेंद्र खाडे, शाखा अध्यक्ष संदीप कांबळे, अतिश पाटील आदी उपस्थित होते.

## मनसेला ते अमान्य...

हिंदुस्थानचा द्वेष या एकमेव मुद्द्यावर जो देश तगला आहे, अशा देशातील कलाकारांचे सिनेमे प्रदर्शित करून देणं प्रकार मनसेला मान्य नाही. महाराष्ट्र सोडाच पण देशातील कुठल्याच राज्यात हा सिनेमा तिथल्या सरकारांनी प्रदर्शित होऊ नाही दिला पाहिजे असे राज ठाकरे यांनी जाहीरपणे म्हटले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात हा सिनेमा रिलीज होऊ दिला जाणार नाही. या आधी असे प्रसंग जेव्हा आले होते तेव्हाही राज ठाकरे यांनी विरोध केल्यानंतर मनसेने दिलेला दणका सर्वांना आठवत असेल. त्यामुळे आपण हा सिनेमा सिनेपोलिस चित्रपटगृहात प्रदर्शित करू नये ही अशी विनंती गजानन काळे यांनी सिनेमागृह प्रशासनास केली.

### ॲडव्होकेट ॲकॅडमीचे उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन; रामशेठ ठाकूर यांच्याकडून ५० लाखांची देणगी

# समाजासाठी वास्तू उपयुक्त ठरेल : फडणवीस

**नवी मुंबई, (वा.)** देशातील पहिली ॲडव्होकेट अकॅडमी महाराष्ट्रात साकारली जात आहे, याचा निश्चित आनंद आहे. यासाठी महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलचे मनःपूर्वक अभिनंदन! शासनाने या अकॅडमी उभारणीसाठी जागा दिली आहे. समाजाच्या दृष्टीने आणि शासनासाठी ही अकॅडमी उपयुक्त ठरेल, यात शंका नाही. ॲडव्होकेट ॲक्ट सुधारित करण्यासाठी प्रयत्न केला जाईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी केले. यावेळी राम ठाकूर यांनी ५० लाख रुपयांची देणगी दिली.



## विद्यावेतनाचा प्रस्ताव विचाराधीन

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, न्यायदानाचे क्षेत्र वेगाने बदलत आहे. नुकतेच उच्च न्यायालयाच्या इमारतीचे भूमिपूजन झाले तसेच आज ॲडव्होकेट अकॅडमी आणि संशोधन केंद्राचेही भूमिपूजन झाले आहे. या अकॅडमीसाठी शासनाकडून १० कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. या क्षेत्रात येणाऱ्या नवीन वकिलांसाठी विद्यावेतन देण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

## कार्यक्रमास मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमास राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे, बार कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष आणि राज्यसभा खासदार मनन कुमार मिश्रा, महाराष्ट्राचे महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ, गोव्याचे महाधिवक्ता देविदास पांगम, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोव्याचे चेअरमन संग्राम देसाई, माजी चेअरमन तथा विद्यमान सदस्य पारिजात पांडे, माजी खा. राम ठाकूर, आ. प्रशांत ठाकूर, वाय.टी. देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. या समारंभासाठी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र पारिजात पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली संतोष पवार, मनोज भुजबळ, सुनील तेलगे, राजेंद्र देशमुख आदींनी विशेष मेहनत घेतली.

# उद्या युवा कार्य प्रशिक्षण रोजगार मेळावा

**नवी मुंबई, (वा.)** युवा प्रशिक्षण योजना अंतर्गत प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये युवा कार्य प्रशिक्षण रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्याच्या सूचना माननीय मंत्री कौशल्य रोजगार उद्योजकता व नावीन्यता विभाग यांनी दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने शासकीय आद्योगिक प्रशिक्षण संस्था बेलापूर, जिल्हा- ठाणे या संस्थेमध्ये दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी १०:०० वा मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

रोजगारासाठी इच्छुक उमेदवारांसाठी कोकण विभागातील महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजक्ता व नावीन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना राबवली जात आहे. या उपक्रमांतर्गत तयार केलेल्या https://www.rojgar.ma-haswayam.gov.in या संकेतस्थळाच्या माध्यमातून रोजगार इच्छुक उमेदवार आणि रोजगार उपलब्ध करून देणारे उद्योजक जोडले जातील; अशी माहिती बेलापूर येथील औद्योर्गिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्यांनी दिली आहे.

## रोजगार प्रशिक्षणार्थ्यांना असे मिळेल विद्यावेतन

१२वी उत्तीर्ण शैक्षणिक अर्हतेसाठी प्रतिमहा विद्यावेतन रु.६ हजार, आय.टी.आय/पदविका शैक्षणिक अर्हतेसाठी प्रतिमहा विद्यावेतन रु. ८ हजार, पदवीधर/पदव्युत्तर शैक्षणिक अर्हतेसाठी प्रतिमहा विद्यावेतन रु.१० हजार असे आहे. वरीलप्रमाणे शैक्षणिक अहर्ता प्राप्त असलेल्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सदरील मेळाव्यात उपस्थित रहावे तसेच लिंकवरून आपली उमेदवारी निश्चित करावी, असे आवाहन बेलापूर येथील औद्योर्गिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य स. ज. पाटील यांनी केले आहे.

## राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदी अजिनाथ सावंत नियुक्त

**नवी मुंबई, (वा.)** अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कामोठे शहर अध्यक्षपदी अजिनाथ सावंत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष महादेव पाटील यांनी सावंत यांनी याबाबत नियुक्तीपत्र दिले आहे. सावंत हे पनवेल पालिकेच्या फेरीवाला समितीतदेखील सदस्य आहेत. तसेच सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यात ते नेहमीच अग्रेसर असतात.

### शोभिवंत वस्तू बनविण्याच्या उपक्रमाचे आयोजन; एक लाखाहून अधिक विद्यार्थी सहभागी

# विद्यार्थ्यांनी बनविल्या टाकाऊपासून वस्तू

**नवी मुंबई, (वा.)** प्लास्टिकमुळे पर्यावरणाला होणारा धोका लक्षात घेऊन एकल वापर प्लास्टिक आपल्या दैनंदिन वापरातून हद्दपार करायला हवे यादृष्टीने प्लास्टिकमुक्त शाळा ही संकल्पना महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शोभिवंत वस्तू बनविण्याच्या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



## विद्यार्थ्यांच्या वस्तूंचे प्रदर्शन

स्वच्छता ही सेवा पंधरवड्यानिमित्त शालेय स्तरावर प्लास्टिक बॉटल्सपासून शोभिवंत वस्तू बनविण्याच्या अभिनव उपक्रमाचे आयोजन नमुंमपा शिक्षण विभागाच्या वतीने शालेय स्तरावर करण्यात आले होते. यामध्ये नमुंमपाच्या ५७ प्राथमिक, २३ माध्यमिक शाळांप्रमाणेच खासगी ३३ शाळांतील १ लाख ५७० विद्यार्थ्यांनी सहभागी होत प्लास्टिकच्या बाटल्यांपासून शोभिवंत वस्तू तयार केल्या. अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी स्वहस्ते बनविलेल्या वस्तूंचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

# झाड कोसळून वाहनांचे नुकसान

**नवी मुंबई, (वा.)** दोन-तीन दिवस संतत पडणाऱ्या पावसाचा फटका कळंबोलीतील पदपथावर असलेल्या दहा ते बारा वर्षे वयाच्या वृक्षाला बसला. हे झाड उन्मळून पडल्याने ते रस्त्यावर उभ्या असलेल्या बाजूच्या गाड्यांवर कोसळले. त्यामुळे गाड्यांचे नुकसानही झाले. ही घटना समजताच कळंबोली अग्निशामक दलातील उपअधिकारी दिलीप पाटील यांनी आपल्या पथकासह धाव घेऊन पडलेले झाड मोकळे करून अन्य गाड्यांचेही नुकसान होण्याचे टाळले.



कळंबोली वसाहतीमधील मुख्य रस्त्यावर बस स्टॉपसमोर सेक्टर ३ मधील पदपथावरील जांभळाचे झाड शुक्रवारी पहाटे मुळासकट उन्मळून पडले. भले मोठे झाड असल्याने ते कोसळल्यानंतर बाजूला उभ्या असलेल्या गाड्यांवर पडले तसेच रस्ताही पूर्ण व्यापला गेला. ही घटनेनंतर अग्निशामक उपअधिकारी दिलीप पाटील यांनी आपल्या जवानांसह घटनास्थळी धाव घेतली.

### स्वच्छतेचा संदेश • पावसातही १ हजारहून अधिक नवी मुंबईकर उपस्थित; नागरिकांचा भरघोस प्रतिसाद

# 'स्वच्छता रन'मध्ये धावले नवी मुंबईकर

**नवी मुंबई, (वा.)** 'निश्चय केला, नंबर पहिला' अशा घोषणा देत १ हजारहून अधिक नवी मुंबईकरांनी रविवारी 'स्वच्छता रन' मध्ये सहभागी होत स्वच्छतेचा जागर केला. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा' पंधरवड्यात 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' अभियानांतर्गत आयोजित केलेल्या सर्वच उपक्रमांना नागरिकांचा भरघोस प्रतिसाद लाभत आहे. आजही नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या संकल्पनेतून पालिकेच्या आयकॉनिक मुख्यालय इमारतीसमोर आयोजित करण्यात आलेल्या 'स्वच्छता रन'मध्ये रात्रभर व पहाटे मोठ्या प्रमाणात पाऊस असूनही स्वच्छता ध्येयाने भारलेले हजारहून अधिक नागरिक अतिशय उत्साहाने धावले.

याप्रसंगी आमदार गणेश नाईक, महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचे मिशन संचालक नवनाथ वाठ, अतिरिक्त आयुक्त सुनल पवार व शिरीष आरदवाड, माजी आमदार संदीप नाईक तसेच महानगरपालिकेचे विभागाप्रमुख आणि अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आज आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेत लोकप्रतिनिधी, स्वच्छताप्रेमी नागरिक, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, विविध प्रकारच्या संस्था व मंडळांचे सदस्य, एनएसएस व इतर विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन पालिका आयुक्तांनी केले आहे.

## धावणे हा सर्वोत्तम व्यायाम

याआधी २२ सप्टेंबर रोजी याच ठिकाणी सायक्लोथॉनचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्येही ५०० हून अधिक सायकलपटू उत्साहाने सहभागी झाले होते. धावणे हा सर्वोत्तम व्यायाम असून या स्वच्छता रनच्या माध्यमातून स्वच्छतेप्रमाणेच आरोग्य जपणुकीचा संदेशही प्रसारित करण्यात आला अशी भूमिका आयुक्तांनी मांडली. स्वच्छता ही प्रत्येक घरापासून सुरू झाली तर घर, परिसर, राज्य, देश स्वच्छ राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## क्रीडा क्षेत्रातील संस्थांचे सहकार्य

स्वच्छता रनमध्ये सहभागी झालेले कन्याकुमारी ते काश्मीर धावण्याचा जागतिक विक्रम केलेले गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड होल्डर संजय शर्मा यांना आयुक्तांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. पालिका अधिकाऱ्यांमधून १० किमीची स्वच्छता रन पूर्ण करणारे प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. स्वच्छता रनच्या आयोजनात स्वच्छ नवी मुंबई मिशनच्या वुमेन आयकॉन रिचा समित यांची लेट्स सेलिब्रेट फिटनेस संस्था आणि द लर्नयार्ड या क्रीडा क्षेत्राशी संबंधित संस्थांचे सहकार्य लाभले.



## स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानचिन्हाचे वाटप




त्याचप्रमाणे १० किमी अंतराची स्वच्छता रन सर्वात जलद पूर्ण करणारे प्रथम ३ क्रमांकाचे मानकरी सुरज गोरे, मनोज गावित आणि गुणवंत जाधव यांचा पारितोषिके देऊन सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे सहभागी महिलांमधून सर्वाधिक कमी वेळेत अंतर पूर्ण करणाऱ्या ज्योती ठाकूर, ममता ठाकूर व सुनिता छैनानी या महिला धावपटूंना रेवती कैलास शिंदे यांच्या हस्ते सन्मानचिन्हे प्रदान करून गौरविण्यात आले.

## आज महामार्गांची महास्वच्छता मोहीम

रविवार, दि. २९ सप्टेंबर रोजी 'स्वच्छता ही सेवा' पंधरवड्यात 'महामार्गांची महास्वच्छता मोहीम' राबविली जात आहे. या अंतर्गत सायन-पनवेल महामार्ग व ठाणे-बेलापूर मार्गाची स्वच्छता सकाळी सातपासून करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या महामार्गांची स्वच्छता करताना रेवदंडा, अलिबाग येथील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे श्रीसदस्य मोठ्या संख्येने पद्मश्री, महाराष्ट्रभूषण डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी आणि डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली या महामार्ग सखोल स्वच्छता महामोहिमेत सहभागी होणार आहेत. त्यासोबतच नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन पालिकेकडून करण्यात आले आहे.

# नवरात्रीसाठी बाजारपेठ सजल्या

### पूजेचे साहित्य खरेदीसाठी महिलांची लगबग; साहित्य किमतीत वाढ

**नवी मुंबई, (वा.)** येत्या गुरुवारपासून सुरू होणाऱ्या नवशक्तीच्या उत्सवाचे स्वागत करण्यासाठी शहरातील बाजारपेठही सजली आहे. नवरात्र काळात लागणारे विविध साहित्य बाजारपेठेत विक्रीसाठी आले असून ही खरेदी करण्यासाठी महिलांची लगबग सुरू झाली आहे. पनवेल मार्केटध्ये नवरात्रीसाठी देवीचे घट खरेदीसाठी महिलांची गर्दी होत आहे. मागील वर्षापेक्षा यावर्षी महागाईचा फटका नवरात्र उत्सवालासुद्धा बसला असून गेल्या वर्षापेक्षा यावर्षी दहा टक्क्यांनी पूजेच्या साहित्याच्या किंमतीत वाढ झाली आहे.

शक्तीचे प्रतीक असणारा नवरात्र उत्सव हा उत्साहात साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने घरोघरी घटस्थापना करण्यात येते. काही जण मातीच्या घटाबरोबरच देवीच्या प्रतिकात्मक मूर्तीचीदेखील प्रतिष्ठापना करतात. हा उत्सव सुरू होण्यास अवघे दोन दिवस शिल्लक राहिल्यामुळे बाजारपेठेत उत्सवासाठी लागणारे विविध साहित्य खरेदी करण्यासाठी गर्दी होत आहे.

नवरात्रोत्सवात सार्वजनिक मंडळे करतात दुर्गा मातेची प्रतिष्ठापना घटस्थापनेसाठी आवश्यक असणारी मडकी, घट, मुकुट, फेटे, दागदागिने, मंदिर, तोरण, झालर, परडी, नाडा, आकर्षक झुंबर असे विविध साहित्य खरेदी करण्यास महिलांचे प्राधान्य आहे.

पितृपंधरवडा झाल्यानंतर नवरात्रोत्सव साजरा करण्यात येतो. दि. ३ ते १२ ऑक्टोबर या कालावधीत यावर्षी नवरात्रोत्सव साजरा करण्यात येणार आहे. गणेशोत्सवात घरोघरी गणेशमूर्ती बसवितात, मात्र नवरात्रोत्सवात मात्र फक्त सार्वजनिक मंडळे दुर्गा मातेची प्रतिष्ठापना करतात. त्यामुळे घरात घट बसविण्यासाठी आवश्यक साहित्यांची खरेदी करण्यासाठी गर्दी झाली आहे.

## भाजी मार्केट परिसरात विक्रेत्यांची गर्दी



घटस्थापना करण्यासाठी लागणाऱ्या वस्तू विक्री करण्यासाठी शहरात भाजी मार्केट परिसरात विक्रेत्यांनी गर्दी केली आहे. देवीच्या घटासाठी विधिवत पूजेसाठी लागणारे खण-साडी, बांगडी-ओटी तसेच घटाच्या पूजेसाठी पत्रावळीही बाजारात विक्रीसाठी दाखल झाली आहे. यामध्ये लहान-मोठी अशा दोन प्रकारची पत्रावळी आहे. तसेच पाच फळांमध्ये कवठ, कवंडा, सीताफळ, बेलफूल, पेरू यांचा समावेश आहे. हळद, कुंकू, कापूर, अगरबत्ती, गुलाल, धूपकांडी, देवीच्या पूजेसाठी लागणारी लोभाणदाणी, ऊददाणीही बाजारात आल्या आहेत.

## घटस्थापनेसाठी लागणाऱ्या वस्तूंचे दर

| | |
|---|---|
| देवीसाठी लागणारा लाल घट - | ७० रुपये |
| काळा घट - | ४० रुपये |
| परडी - | ५० रुपये |
| लाल कापड - | ६० रुपये |
| लांबवात, वस्त्रमाळ, फुलवात - | १५ रुपये |
| नारळ - | २० ते ३५ रुपये |
| मोठी परडी - | १५० ते २०० रुपये |
| मंडपी - | ४० रुपये |
| देवीचे शृंगार पाकीट - | ४० ते ८० रुपये |
| एका घटासाठी लागणारी काळी माती - | २० रुपये |

CMYK